साप्ताहिक साधना
३१ डिसेंबर ८३
दोन रुपये

# जॉर्ज ऑरवेल 1984



युद्ध म्हणजेच शांतता!
स्वातंत्र्यात गुलामगिरी आहे!
अज्ञान म्हणजेच ताकद!

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : एकतिसावा

¤

३१ डिसेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साह्याय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार


## सप्रेम नमस्कार १

'मारुती'ला सांप्रत नवा प्रतिस्पर्धी अवतार निर्माण झाला असल्याकारणाने नवे 'मारुती'स्तोत्र आवश्यक ठरत आहे; पण 'समर्था'च्या कुबडीचा आधार घेतल्यावाचून ते कसे साकार होणार? तसा आधार घेऊन नवे स्तोत्र सोबत सादर केले आहे—

**'मारुती' स्तोत्र**

'सुझुकी' इंदिरासूता जपानी दासमारुती
आणिली मागुनी नेली धूर्त दारिद्र्यनाशिनी ॥ १ ॥

आमदारा खासदारा पावना परितोषका
ठकारे पर्वताऐसी भारती पाहता नसे ॥ २ ॥

कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे पश्चिमेकडे
खटारे येथले सारे गतीसी तुळणा नसे ॥ ३ ॥

महाबळी प्राणदात्री संजिवा उठवी बळे
सौख्यकारी दुःखहारी राजपुत्रार्थ राजिवा ॥ ४ ॥

नासती तुटती चिंता क्रमांक देखुनी स्वये
'सुझुकी' येत वेगाने 'स्वगृही' नेत ती त्वरे ॥ ५ ॥

नको रे 'मारुती' गाडी मनेकापुत्र का वदे
'समाधी' गुच्छ ते दोन्ही देखता ताठते बळे ॥ ६ ॥

ही धरा सहा या श्लोकी लाभली शोभली बरी
'मारुती' फाडता छाती जपानी 'राम' तो दिसे ॥ ७ ॥

रामदासी अग्रगण्यू नेहरुकुळा मंडणू
'सुझुकी' धावता वेगे इंदिरा धन्य होतसे ॥ ८ ॥

१५ डिसेंबर ८३ — **श्री. वा. येवलेकर**, नाशिक

¤ आपला १० डिसेंबर १९८३ चा पर्यावरण विशेषांक (एक) वाचला. अंक खूपच आवडला. विशेषत: 'लेड पॉयझनिंग... डोळ्यांसमोर घडलेली घटना'—शरद गोगटे व 'मायनी तलाव पक्षी अभयारण्य'—जय सामंत यांचे लेख विशेष आवडले.

दोन्ही लेख वाचून आपणसुद्धा काही तरी केले पाहिजे याची तीव्रतेने पुन्हा जाणीव झाली. जास्तीकरून लेड पॉयझनिंगच्या दुष्परिणामाबाबत जनमत जागृत करून रंगाच्या कारखान्याला हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करणे भाग पाडावयास हवे. कारण फक्त श्री. गोगटेंनी राहण्याची जागा बदलून हा प्रश्न सुटणार नाही.

ह्या अंकाबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन! नेहमीप्रमाणे सामाजिक प्रश्नांची जाणीव देणारे असेच अंक आपण काढाल अशी आशा व्यक्त करतो.

१५ डिसेंबर ८३ — **म. वि. डिंगणकर**, डोंबिवली

¤ 'माणूस'चा दुसरा पर्यावरण विशेषांक मिळाला. त्याचप्रमाणे जागेअभावी या विषयावरील दोन लेख या अंकात देता आले नाहीत. ते लेख पुढील अंकात आपण प्रसिद्ध करणार आहात, हो विशेष सूचनासुद्धा वाचण्यात आली. वास्तविक पर्यावरण हा विषय कितीही महत्त्वाचा असला तरी त्यासाठी दोन खास अंक काढण्याची आवश्यकता होती असे मला वाटत नाही.

**क्षमस्व**

'माणूस'च्या मागील क्रिकेट विशेषांकात आधी जाहीर केलेला श्री. वि. वि. करमरकर यांचा लेख वेळेत न आल्यामुळे प्रसिद्ध करता आला नाही.

¤

'माणूस'च्या २४ डिसेंबर अंकाच्या मलपृष्ठावरील जाहिरातीत 'मिरज-इचलकरंजी' वार्तापत्रे ३१ डिसेंबर ८३ अंकापासून प्रसिद्ध होतील असे छापले गेले आहे. ही वार्तापत्रे येत्या ७ जानेवारी ८४ अंकापासून प्रसिद्ध होतील.

¤

त्यामुळे माणूसच्या अंकातील नेहमीच्या सदराना आम्ही वंचित झालो आहोत एवढे मात्र नक्की. पुरवणी पाने देऊनही हा विषय जनतेपुढे मांडता आला असता.

१९ डिसेंबर ८३ **रा. म. वैद्य**
कल्याण

□ सा. 'माणूस'चे पर्यावरण विशेषांक–एक आणि दोन वाचले. एका ज्वलंत, सर्वांगाने व्यापक परंतु सर्वांचेच दुर्लक्ष असणाऱ्या विषयावर सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अभिनंदन! वास्तविक या आघाडीवर केले जाणारे प्रयत्न क्षीण आहेत. निदान असे कार्य करणाऱ्या संस्थांना, व्यक्तींना वरील अंकामुळे प्रोत्साहन मिळेल असे वाटते. शिवाय यानंतरही ह्या विषयावर वेळोवेळी आपण साहित्य देण्याचे कबूल केलेतच. एक स्तुत्य उपक्रम म्हणून सा. 'माणूस'चे कौतुक. दुसरे महत्त्वाचे म्हणजे दि. २४।१२ चा सा. 'माणूस'चा क्रिकेट–विशेषांक येणार आहे. वास्तविक अंक–क्रिकेटचा मोसम सुरू झाल्यानंतर लगेच काढला असता तर बरे झाले असते.

१९ डिसेंबर ८३ **अरविंद य. वाघमारे**
परभणी.

□ आपल्या दि. ३ डिसेंबरच्या अंकातील श्री. कामत यांचा 'राणी, आम्हाला क्षमा कर' हा लेख छापल्याबद्दल अभिनंदन!

कोणाही खऱ्या अर्थाने सुसंस्कृत मनाच्या नागरिकाच्या मनातील विचार ह्या लेखात व्यक्त होत आहेत. येथील अनेक संस्था राणीची पायधूळ डोक्यावर घेण्यासाठी धडपडत होत्या. हे सर्व प्रकार भारतातील शिक्षित–उच्च पदस्थ नागरिकाच्या मनाचे उघडे-वागडे दर्शन घडवीत असतात. स्वतंत्र देशाचे नागरिक ही संज्ञा प्राप्त होण्यास हे प्रजाजन किती दूर आहेत ह्याची जगाला ओळख पटते. कदाचित राणीला असेही वाटेल की, येथल्या गडबडीचा खरा अंदाज न येऊन आपल्या प्रधानांनी उगाचच राज्य सोडले नाही ना?

३ डिसेंबर ८३ **शशिकांत शेजवळकर**
पुणे

□ 'माणूस' साप्ताहिकाचा १९८३ चा दिवाळी अंक वाचला. नेहमीप्रमाणेच सर्वांग-सुंदर व दर्जेदार साहित्याने तो नटलेला आहे.

या वर्षी त्यातील 'श्रीकृष्ण – एक मोठे स्वप्न' या विषयावरची श्री. श. शं. कुलकर्णी यांची चार पत्रे मला विशेष आवडली.

त्या लेखाचे सुरुवातीसच जे श्रीकृष्णाचे चित्र रेखाटलेले आहे ते तर फारच सुंदर आहे. सुंदर म्हणजे चित्रकलेच्या दृष्टीने तर सुंदर आहेच; पण अर्थपूर्ण आहे.

त्या एका चित्रात चित्रकाराने श्रीकृष्णाचे विश्वरूपदर्शन घडवले आहे व सर्व भगवत्-गीतेचे सार एका चित्रात चित्रित केले आहे.

त्या चित्रकाराचे मन:पूर्वक अभिनंदन!

२१ नोव्हेंबर ८३ **डॉ. रा. गो. पाठक**
एरंडोल

□ 'माणूस'चा अंतर्बाह्य सुंदर दिवाळी अंक वाचला. फार आवडला. अंकात रंजन आणि प्रबोधन यांचा उत्कृष्ट मिलाफ साधलेला आहे. विषयांचा वेगळेपणा आहे. काही लेख जरा लांब वाटतात; पण त्यांचा आवाकाच मोठा आहे. एक गौण स्वरूपाची त्रुटी, पान ४ किंवा ५ वर मासिकाचा पूर्ण पत्ता हवा होता. मी तो प्रकाशन डायरीतून मिळवला.

सई परांजपे यांच्यावरील लेख सर्वांत जास्त आवडला.

२३ नोव्हेंबर ८३ **श्री. म. वि. गोखले**
नागपूर

□ 'माणूस' दिवाळी १९८३ मधील 'लग्न आणि सहजीवन' हा लेख वाचला. अतिशय आवडला.

खरं तर लग्न ही प्रत्येकाच्याच आयुष्यातील महत्त्वाची घटना; पण त्याबद्दलच अशिक्षित तर सोडूनच द्या; पण सुशिक्षितही उदासीनच असतात असं मला वाटतं त्याला कारणं काहीही असोत. आर्थिक परिस्थिती, विचार करण्याची क्षमता, क्षमता असूनही समाजाला किंवा भोवतालच्या परिस्थितीला तोंड देण्याचं धारिष्ट्य अशी अजूनही खूपशी कारणं असू शकतील.

तेव्हा प्रत्येकाच्या आयुष्याचा–सबंध जीवनाचा प्रश्न ज्यावर अवलंबून आहे, त्यावर कोणीही १% सुद्धा, सारासारविचार करीत असतील की नाही, याबद्दल मला शंका आहे.

खरोखरच आपण म्हणता त्याप्रमाणे नवरा–बायकोचं सहजीवन हा दुसऱ्याचं मन, व्यक्तिमत्त्व, सवयी, स्वभाव, अपेक्षा समजून घेऊन साधलेला संवाद आहे

लग्न करताना, स्थळ पाहताना–स्वभाव या गोष्टीला सर्वांत कमी महत्त्व दिलं जातं. रूप, शिक्षण, पैसा, घर या लग्नाच्या बाजारातील महत्त्वाच्या गोष्टी मानल्या जातात. या गदारोळात दोघाचे स्वभाव जुळण्याला फारसं महत्त्व नसतं.

दिवस पुढे सरकत असतात. आपली कामं चालू असतात. जबाबदाऱ्या येतात–जातात. मुलं होतात, वाढतात. संकटं येतात–जातात; पण या सगळ्यातून नवरा–बायको एकमेकाच्या किती जवळ येतात, हाच खरा प्रश्न आहे.

सहजीवन हे एकमेकांना समजून घेणं, दोष विसरणं आणि गुण वाढवणं हेच आहे.

अशा विषयांवर खूप परिसंवाद, चर्चा, लेखन वगैरे घडत आणि शेवटी पुराणातील वांगी पुराणातच राहून जातात.

माझ्या मते हा लेख प्रत्येक लग्नउमेदवारानं वाचून, अभ्यासून त्यावर चिंतन केलं पाहिजे. आपले गुणदोष अभ्यासून त्याप्रमाणे जोडीदार निवडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

विषयाचा प्रत्येक कानाकोपरा या लेखात अत्यंत अभ्यासपूर्वक हाताळला आहे

इतका सुरेख लेख वाचून फार आनंद झाला. धन्यवाद!

असेच वैचारिक, उपयुक्त व ज्वलंत विषयावरील लेख आपणाकडून आम्हाला वाचायला मिळावेत हीच अपेक्षा!

५ डिसेंबर ८३ **विजया केतकर**
ठाणे.

□

**१९०३ मध्ये एरिक ब्लेअर जन्माला आला आणि २३ जानेवारी १९५० रोजी जॉर्ज ऑरवेल हे लेखनासाठी त्यानं घेतलेलं नाव ठसवून गेला. साधेपणा, सोपी भाषा, देशभक्ती, दलितांविषयीची क्रियाशील कणव, स्वातंत्र्य आणि माणुसकी यांच्यावरची अढळ श्रद्धा यांनी भारलेलं त्याचं आयुष्य लयाला गेलं तरी ‘ अॅनिमल फार्म ’ आणि ‘ 1984 ’ सारख्या शिळ्या न होणाऱ्या कलाकृतीमुळे त्याचा विसर सहजासहजी पडणार नाही...**

# जॉर्ज ऑरवेल आणि एकोणीसशे चौऱ्याऐंशी

**शिरीष सहस्रबुद्धे**

एकोणीसशे चौऱ्याऐंशी या नव्या वर्षाची पहाट उजाडत असताना जॉर्ज ऑरवेल-सारख्या पन्नास सालीच मरून गेलेल्या लेखकाची आठवण का करायची ? असं काय कर्तृत्व त्यानं गाजवलंय ?

तसा तर दरवर्षीच एकदा नव्या वर्षाच्या स्वागताचा सोहळा होऊन जातो. शुभेच्छांच्या गदारोळात कुणी धोक्याचा इशारा देणारा असलाच तरी त्याचा आवाज फारसा जोरकस लागत नाही. अगदी पोटापाण्यापुरतंच बघणारे असतात त्यांना तर अनुभवानं माहीत झालेलं असतं की, एकोणीसशे चौऱ्याऐंशी काय आणि चौऱ्याण्णव काय, बहुतेक सगळ्या वर्षांच्या तोंडवळा सारखाच असतो. पण थोडं वाचणारे आपणास पहाणारे जे असतात, जाणते असतात, त्यांनी चौऱ्याऐंशी सालाच्या सुरुवातीला तरी थोडं थबकावं, मागे वळून बघावं, पुढचा विचार करावा, एवढी तरतूद जॉर्ज ऑरवेल या ब्रिटिश लेखकानं करून ठेवलेली आहे, हे त्याची आत्ता आठवण यायचं मुख्य कारण !

आणखीही एक छोटसं कारण आहे. रुडयार्ड किपलिंग, थॅकरे या ख्यातनाम ब्रिटिश लेखकांप्रमाणेच जॉर्ज ऑरवेलसुद्धा जन्मानं भारतीय होता. म्हणजे त्याचा जन्म ब्रिटिश आईवडिलांपोटीच; पण भारतात झाला होता. त्याचे वडील त्या वेळच्या इंडियन कस्टम्समध्ये लहानशा हुद्द्यावर होते. बंगालमधल्या मोतिहारी इथं १९०३ मध्ये जॉर्जचा जन्म झाला, म्हणजे नुकतीच त्याच्या जन्माला ऐंशी वर्षं पुरी झाली. त्याचं शिक्षण मात्र ब्रिटनमध्ये झालं, तरी असं वाटतं की, भारतीय उपखंडाशी जन्मामुळे जुळलेला धागा पुढच्या आयुष्यातही अगदीच तुटला नाही. १९२२ मध्ये त्यानं साम्राज्याच्या पोलिसदलात नोकरी पत्करली ती ब्रह्मदेशात. या खात्याचं नावच ‘ इंडियन इम्पीरियल पोलीस ’ असं होतं. पाच वर्षं ऑरवेलनं पोलीस अधिकारी म्हणून दडपशाही करण्यात घालवली आणि अखेरीला तो साम्राज्यशाहीला पुरता विटला. लेखक व्हायची ऊर्मी उफाळून आली आणि त्यानं नोकरी सोडली. या पाच वर्षातल्या अनुभवावर आधारलेली ‘ बर्मीज डेज् ’ ही त्याची कादंबरी १९३४ मध्ये प्रसिद्ध झाली. पुढे दुसऱ्या महायुद्धात ऑरवेलनं बीबीसीमध्ये नोकरी केली तीसुद्धा भारतीय उपखंडासाठी प्रसारण करणाऱ्या विभागात.

एक सांगायचं राहून गेलं— जॉर्ज ऑरवेल हे लेखनासाठी घेतलेलं टोपणनाव. पाळण्यातलं नाव एरिक ब्लेअर. अर्थात जॉर्ज ऑरवेल हेच नाव इतकं फैलावलंय की, मूळच्या नावाची नोंद आता सरकारी कागदपत्रातच असली तर असेल. आणि तसं पाहिलं तर एरिक ब्लेअर हे नावसुद्धा जरा सपाटच. जॉर्ज ऑरवेल या नावाला जो नाद आहे, जे वजन आहे त्याचा प्रभाव निश्चित आहे— निदान एरिक ब्लेअरपेक्षा तरी जास्तच. टोपणनाव निवडताना त्यात अस्सल ब्रिटिशपणा असेल, याची दक्षता घेतलेली आहे. जॉर्ज हे एक खास ब्रिटिश नाव तर ऑरवेल हे सफोक परगण्यातल्या एका नदीचं नाव आहे. योगायोग असा की, ऑरवेलचं फक्त सत्तेचाळीस वर्षांचं आयुष्यसुद्धा प्रवाही, झुळझुळतं राहिलं. नाना तऱ्हेच्या आयुष्यक्रमाची चव चाखत, बऱ्यावाईट अनुभवाशी कुस्ती खेळत, कधी पराभूताच्या हालअपेष्टा सोसत ऑरवेल हिरीरीनं जगत गेला आणि स्वतःचं आणि आसपासचं जगणं टप्प्याटप्प्यानं शब्दबद्ध करीत राहिला. त्याचं प्रत्येक पुस्तक म्हणजे जणू आत्मचरित्राचा एकेक भाग होत राहिला.

आपणा भारतियाना जास्त जवळची वाटेल अशी आणखीही एक खास बात ऑरवेलच्या बाबतीत आहे—त्याचं पुष्कळसं आयुष्य चारचौघासारखं गेलं. पाश्चात्य प्रतिभावंताना अनेकदा ज्या विक्षिप्तपणाची, एककल्लीपणाची किंवा क्वचित विकृतीचीसुद्धा जोड लाभलेली असते, तिचा अंशही ऑरवेलच्या लिखाणात आणि जीवनात दिसत नाही. त्याच्याच आसपास वावरलेल्या जेम्स जॉइस, डी. एच्. लॉरेन्स यांची मनस्वी वृत्ती आणि बिनधास्त बडखोरी, सार्त्रची किंवा पिकासोची रूढ सामाजिक व कलात्मक संकेत झुगारून देण्याची ऊर्मी, काफ्काची नियतिवादातून आलेली आत्मग्लानी या आणि अशा मानसिक गुंत्याच्या वाटेनं ऑरवेलला जावं लागलं नाही. त्याची प्रवृत्तीही तशी नव्हती. तुलनेनंच सांगायचं तर वर उल्लेख केलेल्या मंडळीपेक्षा जॉर्ज बर्नार्ड शॉची जातकुळी ऑरवेलला जास्त जवळची होती. आयुष्यात गुंतागुंतीचे प्रसंग आलेच नाहीत असं नाही; पण ऑरवेलचा

कल प्रश्न सोपे करून, फोडून सोडवण्याकडे असायचा. जास्त गुरफटण्याकडे नाही. अतिशय कष्टाचं आयुष्य जगावं लागलं तरी, मनाविरुद्ध काही करावं लागल तरी शेवटी हलकेच तोल सावरायची जी कला तुम्हा आम्हा सामान्याना ठाऊक असते, ती ऑरवेललाही अवगत होती. त्याचा जन्म कनिष्ठ मध्यमवर्गातलाच. अशा घरच्या मुलान जेवढं शिकावं तेवढच म्हणजे शालान्त परीक्षेपर्यंत तो शिकला हुशारीमुळे शिष्यवृत्ती मिळाली म्हणून ईटनसारख्या बड्या शाळेत शिकायला मिळालं एवढच.

## कम्युनिस्ट शिक्का

एकोणिसशे तीन साली जन्मलेल्या ऑरवेलनं एकोणिसाव्या वर्षी शिक्षण थांबवून नोकरी घेतली ती पोलिसखात्यात. ब्रिटिश साम्राज्यवादाचा एक हस्तक म्हणून ज्या दडपशाहीत त्याला भाग घ्यावा लागला तिचा आणि तिथल्या दडपल्या जाणाऱ्या दुबळेपणाचा खोल ठसा त्याच्या मनावर उमटला. तिरिमिरीनं नोकरी सोडली ती हातात दुसरं काही नसताना, लेखक व्हायच या उमेदीनं. ते १९२७ साल होतं. एकूण युरोपात आणि इंग्लंडमध्येही बेकारी जबरदस्त होती. साठवलेले पैसे संपले. मग कामाच्या शोधात भटकंती सुरू झाली. ऑरवेलनं पॅरिस गाठलं. उणीपुरी दोन वर्षं तिथे काढली. १९२९ ते ३५ ही उमेदीची तारुण्याची वर्षं भारी खडतर गेली. पोटासाठी काय काय करावं लागावं ? शिकवण्या केल्या. फुटकळ बातमीदारी केली. दीड वर्ष पुस्तकाच्या दुकानात विक्रेता म्हणून नोकरी केली. पॅरिसच्या हॉटेलात पोऱ्या म्हणून कपबशा विसळल्या. मिळेल ते आणि मिळेल तेव्हाच जेवला. राहणं; झोपण गरिबाच्या, मजुरांच्या झोपडपट्ट्यात. एक पूर्णपणे वेगळं जग पहायला मिळाल. दारिद्र्य, आजार, गलिच्छपणा आणि त्यातूनही क्वचित डोकावणारा भलेपणा. अस जगणं काय फक्त परिस्थितीमुळेच अटळ होतं का ? ऑरवेल नतंर एकदा म्हणाला, की तेवढंच कारण नाही ब्रह्मदेशातल्या पाच वर्षात एका *अत्याचारी राज्यव्यवस्थेत मी सामील झालो* होतो त्याबद्दलचा अपराधीपणा मनावर ओझ्यासारखा साठला होता. तो धुवून टाकण्यासाठी ही फकिरी. यातनं लेखक आणि माणूस दोघेही घडत होते. गरीब मजूर भिकारी, भटके, गुन्हेगार, वेश्या, अपंग याच्या आयुष्याचं जे दर्शन ऑरवेलला या काळात घडलं, त्याचा ठसा त्याच्या निर्मितीवर वारंवार उमटत राहिला. ऑरवेलच पहिलं पुस्तक प्रसिद्ध झालं ते १९३३ मध्ये याच अनुभवावर आधारलेल 'डाउन अँड आउट इन पॅरिस अँड लंडन.' हे आत्मकथनात्मक पुस्तक ऑरवेलला लेखक म्हणून प्राथमिक मान्यता मिळवून देण्याइतक निश्चितं गाजल त्यानतरच्या 'बर्मीज डेज्' (१९३४) या पहिल्या कादंबरीनं ऑरवेल ललित लेखक म्हणून ओळखला जाऊ लागला. तोपर्यंत त्याच क्षेत्र वृत्तपत्रीय लिखाण, वृत्तांतलेखन आणि निबंध एवढच होतं. त्यानंतरची दोन पुस्तक 'अ क्लर्जिमन्स डॉटर' (१९३५) आणि 'कीप द अॅस्पिडिस्ट्रा फ्लाईंग' (१९३६) या दोन्ही कादंबऱ्या फारसं यश मिळवू शकल्या नाहीत. स्वत: लेखकालाही त्यापासून समाधान लाभलं नाही. आजही ऑरवेलच्या प्रमुख लिखाणात त्याचा समावेश केला जात नाही.

ऑरवेलच्या आयुष्यात १९३६ या वर्षात खूपच महत्त्वाच्या घटना घडल्या. एक तर लंडन सोडून हर्टफोर्डशायरमधल्या वॉलिंग्टन या छोट्याशा खेडेगावात तो स्थायिक झाला. परिस्थिती बेताचीच, कारण लेखनापासून मिळणार उत्पन्न तुटपुजच असायचं. मग दुकानदारी, कोंबड्या पाळणं आणि शेती उर्फ बागकामाचा जोडधंदा करायची कल्पना आली. वॉलिंग्टनमधल्या छोट्याशा घरात 'विविध वस्तु भांडार' सजलं. खरं म्हणजे घराचं नावच 'द स्टोअर' असं होतं. याच वर्षात त्यानं इग्लंडच्या उत्तर भागाचा दौरा केला. इग्लडमधल्या त्या काळच्या 'लेफ्ट बुक क्लब'चा सचालक आणि ऑरवेलच्या पुस्तकाचा प्रकाशक व्हिक्टर गोलँक्झ यानं ऑरवेला अशा दौऱ्याच आमंत्रण दिलं आणि ते प्रत्यक्षातही आणल. इंग्लडमधली त्या वेळची भीषण बेकारी आणि तिथल्या प्रचंड अशा खाणउद्योगातल्या कामगारांची ससेहोलपट ऑरवेला या दौऱ्यात जवळून पहायला मिळाली. खाणकामगारांच्या कुटुंबाबरोबर प्रत्यक्ष राहून त्यानं त्यांचं दु:ख जगण्याची धडपड, चिकाटी, कष्ट, प्रामाणिकपणा, व्यसनाधिनता, अडाणीपणा या सगळ्या बऱ्या वाईट गोष्टी अनुभवल्या. त्याचा वृतात लेफ्ट बुक क्लबनं १९३७ मध्ये 'द रोड टू वायगन पियर' या शीर्षकानं प्रसिद्ध केला. ऑरवेलबर कम्युनिस्ट असल्याचा संशय घेतला जात होताच. आता पक्का शिक्का बसला. क्यू. डी. लेविससारख्या समीक्षकांनी कवी डब्ल्यू. एच्. ऑडन आणि मंडळी या हौशी डाव्या गटात ऑरवेलला जमा करून टाकल; पण ती थोडी पुढची गोष्ट. उत्तर इंग्लंडच्या दौऱ्यावरुन परतल्यावर जॉर्ज ऑरवेलनं लग्न केल—९ जून १९३६ रोजी. एलिन ओ'शॉनेसी आणि ऑरवेल एकमेकाना त्या आधी पुष्कळ वर्षं परिचित होते. स्नेहाचं रूपांतर पूर्ण विचारानंतरच नात्यात झालं. लग्नसमारंभ चारचौघासारखाच जवळच्या छोट्या चर्चमध्ये झाला आणि लग्नाच्या पार्टीला रात्री फक्त आठ माणसं हजर होती, तरी ऑरवेलचं लहानसं खेडवळ घर अगदी भरून गेलं. बालमानसशास्त्रातला अभ्यास करणाऱ्या एलीननं तो अर्धवट सोडला आणि प्रमासाठी करियरकडे पाठ फिरवली. जॉर्ज आणि एलीन याचं समजूतदार सहजीवन हा जॉर्जच्या अस्थिर आणि ओढगस्तीच्या आयुष्याचा मोठा आधार होता. लेखकाच्या पत्नीला व्यवहारात करायला लागणारी तारेवरची कसरत एलीननं जबाबदारीनं पार पाडलीच; पण वाङ्मयाची चागली जाणही तिला असल्यामुळे दोघांमध्ये मानसिक दरी वगैरे पडण्याची वेळ आली नाही. कष्टात दिवस काढणारी एलिन तब्येतीन मात्र खंगत गेली आणि नवऱ्याला जरा बरे दिवस आले तेव्हा ते पहायला ती हयात नव्हती ! एलीन हे जॉर्ज ऑरवेलच्या व्यक्तिजीवनातल एक चटका लावून जाणारं प्रकरण आहे.

## वेगवेगळ्या विचारछटा !

एकोणिसशे छत्तीसच्या अखेरीस ऑरवेल सणक आल्यासारखा स्पेनला रवाना झाला, तो तिथल्या यादवी युद्धात सामील झाला. स्पॅनिश सिव्हिल वॉर म्हणून प्रसिद्धीला आलेली ही यादवी माजली ती जनरल फ्रॅन्कोची फॅसिस्ट राजवट आणि नवे क्रांतिकारक याच्यात जर्मनी आणि इटलीमधल्या

युद्धोत्सुक फॅसिस्ट हुकूमशहांनी फ्रॅन्कोला उघड मदत केली. इंग्लंड आणि युरोपातल्या इतर अनेक राष्ट्रांनी मात्र 'फॅसिझम कम्युनिझमपेक्षा मऊ, तेव्हा फॅसिस्टांकडून डावे क्रांतिकारक परस्पर निपटले गेले तर ठीकच. दोघेही एकमेकाकडून निखंदून निघाले तर फारच उत्तम,' अशा हिशेबानं तटस्तेची भूमिका घेतली. ऑरवेलच्या स्वभावाला मौजबघेपणा मानवणारा नव्हता. युद्धाच्या बातमीदारीचा उद्देश केव्हाच मागे पडला आणि प्रत्यक्ष लढाईतच ऑरवेलनं उडी घेतली. सर्वंकषवाद (टोटॅलिटेरिॲनिझम) आणि लोकशाही याच्यातला हा पहिला मोठा संघर्ष अशी त्याची श्रद्धा होती. समाजवादी लोकशाहीची स्थापना असा उद्देश होता. स्पॅनिश यादवी युद्धात दीड-एक वर्ष ऑरवेलनं भाग घेतला आणि त्याच्या आयुष्यातल ते मोक्याचं वळण ठरलं. एका भल्याथोरल्या भ्रमनिरासाला सुरुवात झाली. लढाई जारी असताना ऑरवेलला हळूहळू जाणवलं की, दोन्ही बाजूंमध्ये सर्वंकषसत्तावाद्यांचा भरणा आहे आणि यातलं कुणीही जिंकलं तरी तो विजय लोकशाहीचा असणार नाही. कम्युनिस्ट क्रांतिकारकांना सोविएत रशियाचं पाठबळ होतं खरं पण त्यातल्या लोकशाहीवाद्यांना त्याची बिलकुल सहानुभूती नव्हती. ऑरवेलसारखे जे लोकशाहीवादी स्वयस्फूर्तीनं लढ्यात उतरले होते, त्यांना जिंकू देण्याची रशियनाची आणि रशियावाद्याची तयारी नव्हती. फ्रॅन्कोइझमची जागा स्टॅलिनिझमला मिळायची होती. ऑरवेलला ही फसवणूक असह्य झाली आणि त्यानं विरोधी सूर काढला. तेव्हा त्याचाच जीव धोक्यात आला. अखेर आपल्याच बाजूनं लढणाऱ्या स्टॅलिनवाद्यांच्या हातून निसटून ऑरवेलला पत्नीसह इंग्लडमध्ये परत यावं लागलं. या विदारक स्वप्नभंगातून 'होमेज टु कॅटॅलोनिया' (१९३८) आणि 'कमिंग अप फार एअर' (१९३९) या पुस्तकांनी आकार घेतला. यातलं 'होमेज...' हा आत्मकथन आणि इतिहासकथन यांचा मिलाप आहे तर दुसऱ्या कादंबरीत येऊ घातलेल्या महायुद्धाचा आगाऊ इशारा आहे. ज्याच्याकडे अर्थातच दुर्लक्ष झालं

राजकारण हा ऑरवेलच्या जिव्हाळ्याचा मुख्य विषय झाला तो १९३७-३८ च्या आसपास; पण त्याची मुळं तपासून पाह्यची तर मात्र थोडं मागं जायला हवं. तसं म्हटलं तर 'समाजवादाचा सहप्रवासी' म्हणवून घेण्याची फॅशन १९२० नंतरच्या दशकातच इंग्लडमध्ये हळूहळू पसरत होती. ऑरवेल ईटनच्या शाळेत शिकत होता तेव्हाही वातावरणात समाजवादाबद्दल आस्था होती. ऑरवेल ब्रह्मदेशातून परतला आणि समाजातल्या दलित थरात मिसळला, तेव्हा रशियातल्या नव्या प्रयोगाकडे कौतुकानं-किंवा निदान कुतुहलानं-पहायचे दिवस होते. १९२७ ते २९ च्या भीषण आर्थिक मंदीचा फटका बसल्यानंतर तर सोविएत रशिया ही स्वप्निल दंतकथा वाटायला लागली. १९३० च्या दशकात कवी, लेखक, नाटककार, विचारवंत, समीक्षक या बुद्धिजीवी वर्गातल्या मोठ्या घटकावर डाव्या विचारसरणीचा चांगलाच गडद प्रभाव पडला. अर्थात समाजवाद, मार्क्सवाद, लेनिनवाद या छटा जशा उपलब्ध होत्या तशाच विविध घटकांवरच्या प्रभावाच्या छटाही कमीजास्त दाट होत्या. इंग्लंडमध्ये डब्ल्यू. एच. ऑडन, स्टीफन स्पेन्डर आणि लुई मॅक्नीस ही कवित्रिमूर्ती आणि त्यांच्या प्रभावळीतली लेखकमंडळी 'डावा गट' म्हणून प्रसिद्धीला आली. 'डाऊन अॅन्ड आउट इन् पॅरिस अॅन्ड लंडन' या पहिल्याच पुस्तकापासून कष्टकरी वर्गाविषयीची ऑरवेलची कळकळ उघड झाली होती. त्याच्या नावाचा उल्लेखही हळूहळू डाव्या पुरोगामी लेखकगटात व्हायला लागला. त्याचा प्रकाशक व्हिक्टर गोलॅन्क्झ हाच लेफ्ट बुक क्लब चालवीत असे, त्याच्याशी आलेल्या संबंधांमुळे ऑरवेलवरचा डावेपणाचा शिक्का पक्का झाला. समाजातल्या तळच्या थरातल्या हालअपेष्टाचं नुसतं चित्रण करूनच ऑरवेल थांबला नव्हता त्यावर उपाय योजला पाहिजे आणि तो सामाजिक व्यवस्थेतल्या आमूलाग्र बदलाच्या स्वरूपाचा असला पाहिजे, हेही त्यानं ठासून मांडलं. दलिताच्या दैन्याला कारण असलेल्या प्रस्थापित व्यवस्थेवर त्यानं कठोर टीका केली :

> 'भांडवलशाहीन आजपर्यंत काय मिळवलं याचा जर हिशेब केला, -ही मिळकत म्हणजे औद्योगिक क्रांतीचे भयाण परिणाम, एकामागोमाग एका संस्कृतीचा विनाश, शहररूपी घृणास्पद वारुळात कीडेमुंगीसारखी ठेचून भरलेली माणसं आणि सगळ्यात भयंकर म्हणजे गौरेतराची गुलामगिरी-तर ती व्यवस्था पुरातन सरंजामशाहीहून बरी असं म्हणणं अवघडच!'

भांडवलवादी समाजरचना योग्य दिशेनं प्रयत्न केले तर विरून जाईल या मार्क्सच्या सिद्धान्तावरही ऑरवेलचा विश्वास होता असं दिसतं. मार्क्सवादातल्या वर्गवादाच्या मूलभूत तत्त्वाचाही स्वीकार त्याच्या लेखनातून सहजपणे झालेला दिसतो. 'अ क्लर्जिमन्स डॉटर' या त्याच्या कादंबरीतली एक वर्गशिक्षिका वर्गातल्या मुलाचे तीन गट पाडते-कशासाठी तर त्यांच्या पालकांनी दिलेल्या कमीजास्त फीप्रमाणे त्यांना कमीजास्त कडक चोप देणं सोपं व्हावं म्हणून. पैसेवाल्याला खास सवलती नि आराम या व्यवहारी जगातल्या शिरस्त्याचा पहिला धडा शाळेतल्या मुलांना हा असा मिळतो. या सगळ्या काळात ऑरवेलची खूपच मानसिक घालमेल झालेली असणार, हे उघड आहे. एकीकडे राष्ट्रवादी आणि बुद्धिनिष्ठ, प्रवृत्तीचा मेळ, त्यातून सोविएत रशियाबद्दलच्या अंधभक्तीचा तिटकारा, पोथीनिष्ठ ठोकळेबाज मार्क्सवादाविषयी नावड आणि तरीही समाजवादी समाजरचनेच्या आवश्यकतेवर दृढ विश्वास, भांडवलदारी यंत्रणेकडून कष्टकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाबद्दलची अनुभवसिद्ध चीड या सगळ्या प्रवाहाचा एकमेकाना छेद दिल्यानंतर दिसतं ते एवढंच की, डाव्या विचारसरणीबद्दल आणि कृतीबद्दल ऑरवेलला निश्चित जिव्हाळा होता आणि त्या काळच्या इतर बोलक्या पुरोगाम्यांपेक्षा ऑरवेल आपल्या क्रियाशीलतेमुळे एक पाऊल पुढेच होता. १९३६ मध्ये त्यानं स्वीकारलेली लेफ्ट बुक क्लबची कामगिरी, त्यातून उद्भवलेलं 'रोड टू वायगन पियर', त्याच वर्षी स्पेनमध्ये यादवी युद्धात डाव्या क्रांतिकारकांचा सहानुभूतिदार म्हणून उडी टाकणं या घटना पुरेशा बोलक्या आहेत. मागे लिहिल्याप्रमाणे स्पॅनिश सिविल वॉर

हा त्याच्या वैचारिक आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा ठरला. हिटलरचा जर्मनी आणि स्टॅलिनचा रशिया यांच्यात झालेल्या अनाक्रमणाच्या तहानं हा वैचारिक बदल जास्त झपाट्यानं घडवून आणला. ऑरवेल स्पेनमध्ये असतानाच इंग्लंडमध्येही ही भ्रमनिरासाची प्रक्रिया सुरू झाली होती. रशियाला भेट द्यायची संधी मिळालेल्या मंडळींना पोलादी पडद्याआडची सर्वंकषता आणि व्यक्तिगत व कलात्मक स्वातंत्र्याची गळचेपी पाहून धक्का बसला होता. 'मुक्तिदाता' म्हणून गाजलेल्या साम्यवादाची स्टॅलिनचा छाप असलेली काळी बाजू हळूहळू दिसत गेली. स्टॅलिन–हिटलर दोस्तीच्या तहान शेवटच्या धक्क्याचं काम बजावलं. समाजवादानं फॅसिझमशी हातमिळवणी करावी हा क्रांतीचा विश्वासघात होता. चिनी आक्रमणानंतर आपल्याकडे कम्युनिस्टांना पळता भुई थोडी झाली होती, इथे तोच प्रकार अनाक्रमणामुळे झाला. स्टॅलिनचं समर्थन करणं फारच अवघड होऊन बसलं. त्यापेक्षा आपल्या निष्ठाचाच फेरविचार करणं सोप होतं, काळाची आणि परिस्थितीची तशी गरजही होती. ऑरवेलसुद्धा या सगळ्या मानसिक आणि वैचारिक चढउतारातून गेला. पोथीनिष्ठ रशियावाद्यापासून तो मुळात लांब गेलेला होताच; पण स्पेनमधून परतलेला ऑरवेल स्पेनमध्ये गेलेल्या ऑरवेलपेक्षा निश्चितच बदललेला होता. ज्याचे पाय बहुधा जमिनीवर असतात आणि क्वचितच स्वप्न पाहतात, त्याचा स्वप्नभंग विलक्षण दाहक असतो. ऑरवेलच्या बाबतीत हा नुसता तात्त्विक निष्ठेचा प्रश्न नव्हता. तो त्याच्या स्वत्त्वाचा–आयडेन्टिटीचाही–प्रश्न होता. जरा समजायला लागल्यापासन त्यानं आपली मध्यमवर्गीय प्रतिमा जाणीवपूर्वक टाकून द्यायचा आणि वर्गविहीन अस्तित्व जोपासायचा प्रयत्न केला होता. कष्टकरी वर्ग, भटके, खाणमजूर, बेकार याच्यात मिसळून राहण्यामागे एक निश्चित दृष्टी होती. त्यामागचा आरंभीचा 'निरीक्षण' हा उद्देश बदलून हळूहळू कार्या क्रातिसैनिकाचा अभिनिवेश निर्माण झाला होता. या नव्या स्वत्त्वाला, प्रतिमेला आव्हान मिळाल्यानंतर संपूर्ण घूमजाव करून प्रतिक्रांतिवाद्याच्या गोटात घुसणंही मानवण्यासारखं नव्हतं. या उलथापालथीतून ऑरवेल बाहेर पडला तेव्हा तो समाजवादाचा लढाऊ समर्थक नव्हता. जगात चालू असलेल्या समाजवादी समाजरचनेच्या प्रयोगांमधल्या छुप्या सर्वंकषवादाचा धोका त्याला जाणवलेला होता. मात्र कष्टकरी वर्गाविषयीची त्याची कळकळ अभंग होती. याच काळात त्याने ब्रिटिश मजूर पक्षाचे सभासदत्व स्वीकारले. लोकशाही आणि व्यक्तिप्रतिष्ठा या मूल्यावरची त्याची श्रद्धा आता विचारात सर्वात महत्त्वाच्या ठिकाणी जाऊन बसली. या मूल्याना चिरडणाऱ्या कुठल्याही शक्तीविरुद्ध लिहिताना त्याच्या लेखणीला अतिशय कडवट धार चढली. पाहण्यासारखी गोष्ट आहे की, ऑरवेल आपल्या फ्रस्टेशनला कुरवाळत बसला नाही. त्यान तडकाफडकी पक्षटदल करून भांडवलशाही किंवा फॅसिझमच्या आळवणीलाही सुरुवात केली नाही. पूर्वीइतक्याच हिरीरीनं–किंबहुना निकराच्या त्वेषान–त्यानं सर्वंकषवादाविरुद्ध (टोटॅलिटेरिॲनिझम) आघाडी उघडली. आयुष्याच्या शेवटच्या काळातलं त्याचं लिखाण त्यातनंच तेजाळलं.

## 'ॲनिमल फार्म'

'कमिंग अप फॉर एअर' ही ऑरवेलची कादंबरी युद्धाच्या घनदाट सावल्या घेऊनच आली. त्याला वाटणारी युद्धाची आशंका खरी ठरली. कादंबरी प्रसिद्ध झाल्यापासून तीन महिन्यातच दुसरं महायुद्ध पेटलं. ऑरवेलमधला कृतिनिष्ठ पुन्हा खडबडून उठला. सैन्यात भरती होण्यासाठी त्यान अर्ज केला. तो वैद्यकीयदृष्टचा अपात्र म्हणून फेटाळला गेला. छत्तीसाव्या वर्षीच त्याची तब्येत ढासळलेली होती. आयुष्यभराची वणवण आणि ओढवून घेतलेल्या हालअपेष्टा यामुळे क्षयाची भावना झालेली होती. पत्नीची तब्येतही तोळामासा होती. १९३८ मध्येच त्यान तीन-चार महिने आरोग्यधामात काढले होते. मग हवापालटासाठी मोरोक्कोला जावं लागलं तेही मित्राकडून उसनवारी करूनच. १९३९–४० दरम्यान त्यानं अनेक महत्त्वाचे निबंध लिहिले आणि वृत्तपत्रीय लिखाणही केलं. ऑगस्ट ४१ मध्ये बीबीसीच्या पूर्व विभागीय प्रक्षेपणखात्यात भारतीय उपविभागात निर्माता म्हणून तो रूजू झाला. दोन वर्ष हे काम त्यानं केल. वक्तृत्वाला अनुकूल असा प्रभावी आवाज नसूनही स्पष्टपणा, सोपेपणा आणि कळकळ यामुळे त्याची स्वतःची भाषणं यशस्वी ठरली. याच काळात युद्धाची पिछाडी साभाळणाऱ्या होमगार्ड दलातही तो स्वयंस्फूर्तीनं दाखल झाला होता.

एकोणीसशे त्रेचाळीस हे वर्ष खूप बरेवाईट बदल घडवून आणणारं होतं. या वर्षातच ऑरवेलच्या आईचं निधन झालं. आजारामुळे त्याला होमगार्ड्स् सोडून द्यावं लागलं. 'ट्रीब्यून' चा संपादक होण्यासाठी त्यानं बीबीसी सोडली. मुख्य म्हणजे या वर्षाच्या अखेरीला त्यानं 'ॲनिमल फार्म' ही कादंबरी लिहायला घेतली. फेब्रुवारी १९४४ मध्ये ती पुरी झाली. चार-साडेचार वर्षांच्या खंडानंतर आणि एका मोठ्या स्थित्यंतरानंतर पुन्हा कादंबरीकडे वळलेल्या ऑरवेलनं रूपककथा आणि राजकीय उपहास यांच एक बेमालूम, एकजीव रसायन निर्माण केल, आणि कारकिर्दीतला कलात्मक उंचीचा मानबिंदू गाठला. अनेक उत्कृष्ट जागतिक कलाकृतीच्या वाट्याला सुरुवातीला जे भोग येतात ते 'ॲनिमल फार्म' च्या नशिबातही होते. महायुद्ध संपेपर्यंत म्हणजे दीड वर्ष ही कादंबरी प्रसिद्धच होऊ शकली नाही. ज्या प्रकाशकांना तिचं मोल कळलं होत, त्यांना राजकारणाच्या लफड्यात गुंतायची भीती वाटत होती. अखेर ऑगस्ट ४५ मध्ये ती प्रकाशात आली आणि थोड्या अवधीतच हिट ठरली. जेमतेम शंभर पानांच्या या राजकीय रूपकाची मोहिनी राजनीतिज्ञांपासून शाळकरी विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांवर पडली, ती आजही कायम आहे.

'ॲनिमल फार्म' हा मुख्यत सर्वंकष हुकूमशाहीचा जळजळीत उपहास आहे. रशियन पद्धतीच्या हुकूमशाहीवर त्यातला तपशील आणि पात्रं बेतलेली असली, तरी त्यांच्या मागची सूत्र कुठल्याही हुकूमशाहीला तितक्याच जहालपणे लागू होतात. ऑरवेलनं भल्याभल्यांच्या टोप्या त्यात उडवल्या–त्याही गंमतीनं जोरजोरात हस्तांदोलन करतानाच, एखाद्यान सहजपणे दुसऱ्याचा हात पिळवटावा तसा. 'ऑल मेन आर इक्वल'

हे मार्क्सवादाच एक आधारतत्त्व. पण लेनिन-स्टॅलिनच्या रशियात ते कधीच प्रत्यक्षात आलं नाही. याचा उपहास ऑरवेलनं केला तो 'ॲनिमल फार्म' मधल्या सूत्ररूप घोषणेद्वारा – 'ऑल ॲनिमल्स आर इक्वल, बट् सम ॲनिमल्स आर मोअर इक्वल दॅन आदर्स !' एके काळचे क्रांतिकारक सत्ताधारी झाल्यावर कसे डोईजड होतात याचं चित्रण 'मोअर इक्वल' या परस्परविसंवादी शब्दप्रयोगातन जितकं भेदक झालं तितकं एखादं पुस्तक लिहूनही झालं नसतं.

'ॲनिमल फार्म'मध्ये घडतं ते असं– जोन्स या जुलमी मळेवाल्याच्या शेतीवरची गुरंढोरं बिथरतात आणि बंड करून त्याला पळवून लावतात. आता ती स्वतंत्र होतात, त्याबरोबर पोट भरायची जबाबदारी येऊन पडते. तेव्हा शेतीचं काम तर चालू राहयला हवं. मग जोन्सविरूदच्या बंडाचं नेतृत्व केलेली डुकरं पुढाकार घेतात आणि व्यवस्थापनाच्या नावाखाली सर्वसत्ताधीश होतात मळ्यात पिकणारी फळं आणि गोठ्यातनं येणारं दूध यांच्यावर त्यांचा एकाधिकार प्रस्थापित होतो. तोही जनसामान्यांचं भलं करण्याची ताकद त्यांना यावी म्हणून. त्याची आज्ञा पाळण्यात चुकारपणा झाला तर 'पहा मग, जोन्स परत येईल !' असा धाक घातला जातो. याउप्पर कुणी बंडखोर निघालाच तर इमानी राखणदार कुत्र्यांकडून त्याचा निकाल लावण्यात येतो. नेपोलियन आणि स्क्वीलर या डुक्कर नेत्याशी मतभेद व्यक्त करणाऱ्या स्नोबॉल या महत्त्वाकांक्षी डुकराला देशोधडीला लावण्यात येते. हळूहळू इतर प्राण्याच्या लक्षात येतं की, जोन्स जाऊन नेपोलियन डुक्कर आला एवढीच काय ती क्रांती. बाकी सगळं तेच तसंच. आपल हलाखीच, कष्टाचं आयुष्य होतं तसच आहे. याचा कळस होतो तो एका सध्याकाळी जनावरं कामावरून परततात तेव्हा त्यांना दिसतं की, डुकरं आता चाराऐवजी दोन पायावर चालायला लागली आहेत आणि माणसांच्या हातात असायचे तसेच चाबूक डुकराच्या हातात – म्हणजे पुढच्या पायात – फडकताहेत !

## अखेरचा जहरी हल्ला '1984'

'ॲनिमल फार्म'कडे बघण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत. कुणाला त्यात झार-लेनिन स्टॅलिन–ट्रॉट्स्की यांच्याच प्रतिमा फक्त दिसतात. कुणाला ती जगातल्या कुठल्याही क्रांतीची शोकांतिका वाटते. डाव्या टीकाकारानी 'ॲनिमल फार्म' आणि 'नाइन्टीन एटीफोर' या दोन्ही कादबऱ्या कम्युनिस्टविरोधी नसून फॅसिझम आणि भांडवलशाहीविरोधी आहेत असं दाखवायची खटपट केली. व्यापक समाजव्यवस्थेच्या तुलनेत व्यक्तीची होणारी दुरवस्था दाखवायचा प्रयत्न असही ॲनिमल फार्मच रसग्रहण करता येतं. मला स्वत्.ला या दोन्ही कादबऱ्या साम्यवादविरोधी आहेत अस म्हणण्यापेक्षा सर्वंकषवादविरोधी आहेत असं म्हणणं जास्त सयुक्तिक वाटतं. अशा व्यापक अर्थपूर्णतेमुळेच या कादबरीला टिकाऊ स्वरूपाची आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली असं वाटतं.

'ॲनिमल फार्म' मुळे ऑरवेलला लौकिक आणि पैसा दोन्हीचा लाभ झाला. आयुष्यभराची विवंचना कमी झाली. दुर्दैव असं की, त्या विवंचनेत साथ देणारी त्याची एलीन जून १९४५ मध्येच एका शस्त्रक्रियेनंतर मरण पावली. युद्धकाळात आणि त्या आधीही अर्धपोटी दगदग करून तिची प्रतिकारशक्ती सपत आली होती. तिच्या मृत्यूनंतर दोन महिन्यातच 'ॲनिमल फार्म' प्रकाशित झाली. ऑरवेलनं त्या सुमाराला फरान्स वगैरे युद्धग्रस्त भागाचा धावता दौरा केला. त्याची तब्येत आणखीनच बिघडत होती. १९४६ मध्ये स्कॉटलडच्या किनाऱ्याजवळच्या ज्यूरा बेटावर स्थायिक व्हायचं. त्यानं ठरवलं. त्याची धाकटी बहीण आणि १९४४ मध्ये त्यानं दत्तक घेतलेला मुलगा यांची सोबत त्याला होती. १९४६ मध्येच त्याच्या थोरल्या बहिणीचं निधन झाल. ज्यूरा बेट निसर्गरम्य होत; पण क्षयी माणसाच्या तब्येतीला हवामान अनुकूल नव्हत. १९४७ च्या प्रारंभी क्षयानं उचल खाल्ली असतानाच ऑरवेलनं 'नाइन्टीन एटीफोर' या शेवटच्या काहंबरीचं कच्चं लिखाण सुरू केलं. त्यावेळी तिचं शीर्षक 'द लास्ट मॅन इन युरप' अस योजलं होतं भविष्यकाळाच भेसूर चित्र रंगवणारी ही कादबरी अठ्ठेचाळीस सालेअखेर पुरी झाली, तेव्हा ४८ ची उलटापालट करून ऑरवेलनं तिला नाव दिल 'नाइन्टीन एटीफोर'

'नाइन्टीन एटीफोर' हाही सर्वंकषवादी समाजरचनेवरचा जहरी हल्ला आहे. पण 'ॲनिमल फार्म'चा सहजसाध्य विनोद त्यात नाही. यातला उपहास आणि विडबन जळजळीत लाव्हारसासारखे भाजून काढणारे 'ॲनिमल फार्म'च्या सूत्राप्रमाणेच या कादंबरीतही ऑरवेलनं तीन वाक्याचं एक सूत्र खेळवलं आहे. 'वॉर इज पीस, फ्रीडम इज स्लेव्हरी, इग्नरन्स इज स्ट्रेंग्थ !' निरनिराळ्या आवरणाखाली फैलावणाऱ्या सर्वंकषसत्तावादाला माणूस आज रोखू शकला नाही, तर जवळच्याच भविष्यात त्याची कशी सगळीकडून कोंडी आणि गळेचेपी होणार आहे, याचं विषण्ण करून सोडणारं चित्रण म्हणजे नाइन्टीन एटीफोर. ढासळत्या प्रकृतीशी सामना देत ऑरवेलनं ही कादंबरी पुरी केलं. त्याच्या त्या 'मूड'चा परिणामही कादंबरीत आहेच. 'मी इतका आजारी नसतो तर ही कादंबरी इतकी उदासवाणी झाली नसती' असं ऑरवेल स्वतःच म्हणाला. एका तऱ्हेनं ऑरवेलनं युद्धात पोळून निघालेल्या जगाला आपल्या मरणापूर्वीचा शेवटचा इशारा या कादंबरीतनं दिला. ती पुरी व्हायच्याआधी एकदा त्याला ग्लासगो इस्पितळात दाखल करावच लागलं होतं. १९४९ च्या सुरुवातीला ग्लूस्टरशायरमधल्या आरोग्यधामात आणि नंतर लडनच्या युनिवर्सिटी कॉलेज इस्पितळात त्याला हलवलं. प्रकृती थोडी सुधारली. याच वर्षात ऑक्टोबरमध्ये त्यानं दुसर लग्न केलं. सोनिया ब्राडनेल ही त्याची पत्नी 'होरायझन' मासिकाची सपादन सहायक म्हणून त्याच्या परिचयाची होती. दोघं एकमेकाना चांगल्याप्रकारे समजून घेऊ शकत होती. या लग्नामुळे ऑरवेलला थोडी उभारी आली. नव्या लेखनाचे बेत त्यान सोनियाला सागितले आता त्याला राजकीय प्रचारापासून थोड बाजूला जाऊन माणसातल्या परस्परसबंधांवर लक्ष केन्द्रित करायचं होतं. तशा एका कथेचा कच्चा आराखडाही त्यानं तयार केला. ती पुरी करायला मात्र तो हयात नव्हता.

२३ जानेवारी १९५० रोजी जॉर्ज ऑरवेलचं निधन झाल. अंतर्गत रक्तस्त्रावामुळे काही क्षणांच्याच दुखण्यानं त्याचा मृत्यू झाला, त्यावेळी तो फक्त सत्तेचाळीस वर्षांचा होता. साधेपणा, सोपीभाषा, देशभक्ती, दलिताविषयीची क्रियाशील कणव, व्यक्तीची प्रतिष्ठास्वातत्र्य आणि माणुसकी यांच्यावरची अढळ श्रद्धा यांनी भारलेलं त्याचं आयुष्य लयाला गेलं तरी विपुल विचार–त्यातही 'ॲनिमल फार्म आणि 'नाइन्टीन एटीफोर' सारख्या शिळ्या न होणाऱ्या कलाकृतीमुळे त्याचा विसर सहजासहजी पडणार नाही. पडू नयेही. □

जॉर्ज ऑरवेलच्या अजरामर साहित्यकृतींमध्ये 'ॲनिमल फार्म' आणि '1984' चं नाव घेतलं जातं.

आगामी वर्ष १९८४.

त्यानिमित्त ऑरवेलच्या '1984' या कादंबरीचा हा संक्षेप.

तळापासून हलवणारा...भेडसावणारा...जागं करणारा...

# हुकुमशाहीचे बायबल '१९८४'!

▫ अशोक पाध्ये

लंडनमधील त्या थंड दुपारी विन्स्टन स्मिथ-पक्ष सभासद नं. ६०७९-हा घाईघाईने 'व्हिक्टरी मॅन्शन' मध्ये शिरला. समोरच एक भव्य पोस्टर होते. भरदार मिशाचा मोठा चेहरा-गूढ हास्य. नजर पाहणाऱ्याकडे. त्याखाली छापले होते, 'बिग ब्रदरचे तुमच्यावर लक्ष आहे!' बिग ब्रदर! पक्षप्रमुख – ओशियानिया साम्राज्यातील सर्वोच्च व्यक्ति. विन्स्टनच्या सातव्या मजल्यावरील बद फ्लॅटमधून टेलीस्क्रीनचा आवाज येत होता. निरनिराळ्या पदार्थांच्या उत्पादनाचे आकडे निवेदक वाचत होता. दार उघडून तो आत शिरला. टेलीस्क्रीनच्या पड्याखालील एक बटण त्याने दाबून प्रकाश व आवाज कमी केला. हे एकच बटण होते बंद करण्यासाठी मुद्दामच बटणे ठेवली नव्हती. त्याने पक्षसभासदाचा निळा गणवेश उतरवून ठेवला व खिडकीतून बाहेर पाहिले. समोर इमारतीवर बिग ब्रदरचीच पोस्टर्स लावली होती. पक्षाची घोषवाक्ये इतक्या उंचीवरूनही वाचता येत होती.

'युद्ध म्हणजेच शांतता!'
'स्वातंत्र्यात गुलामगिरी आहे!'
'अज्ञानात ताकद आहे!'

जवळच एक हेलिकॉप्टर गस्त घालत होते. उडता उडता एकदम ते खाली आले व एका खिडकीसमोर स्थिर राहिले. त्यात पोलीस होते. 'थॉट पोलीस!' विचार आरक्षी! प्रखर दुर्बिणीतून नागरिकाच्या हालचालीवर लक्ष ठेवणारे! त्याचे विचार ओळखणारे! वैचारिक गुन्हे पकडणारे! 'मिनिस्ट्री ऑफ लव्ह' चा खास विभाग. विज्ञानाच्या साहाय्याने नागरिकावर सतत नजर ठेवणारा विभाग.

विज्ञान किती प्रगत झाले होते! टेलीस्क्रीन सारख्या साधनावरून कल्पना येते. टेलीस्क्रीन. दूरचित्रवाणीचा पारदर्शक धातूचा एक लाबट चौकोन. त्यातून चित्रे व आवाज प्रगट होई. त्याचवेळी पडद्यासमोरील दृश्ये व आवाज सूक्ष्म असला तरी ग्रहण करून प्रक्षेपित केला जाई. अत्यंत चपटे असे हे पडदे कुठेही टांगता येत. त्यामुळे शासनाची नजर तुमच्या दैनंदिन कार्यक्रमावर सतत राही. सार्वजनिक ठिकाणी तर भिंतीएवढाले भव्य टेलीस्क्रीनचे पडदे टांगले होते. रस्ते, चौक, उद्याने, स्वच्छतागृहे स्टेशन्स, थिएटर्स, ऑफिसे इ. सर्व ठिकाणी असल्य पडदे होते. कॉम्प्यूटर व निरीक्षक याना कोणतीही संशयास्पद हालचाल तत्क्षणी टिपता येत असे.

विन्स्टनला टेलीस्क्रीनचा भयंकर तिटकारा होता. कुठेही गेले तरी हे पडदे, त्यातून ठेवली जाणारी नजर, त्यातून होणारा शासनाचा प्रचार, बातम्या व संगीत. एकात अशक्य होता. तो खोलीतील एका कोपऱ्यात आला. हा कोपरा टेलीस्क्रीनच्या टप्प्याबाहेर होता. त्याने हळूच एक कोरी डायरी बाहेर काढली तो लिहू लागला. केवढा गुन्हा करीत होता तो! खासगी डायरी ठेवण्यास बंदी होती. तुम्ही लिहिलेले शब्द, बोललेले वा मनातील शब्द हे सारे शासनापासून लपविण्या सबंदी होती. त्याने डायरीवरील १९६१ हे वर्ष खोडले व खाली लिहिले १९८४.

तो थांबला. या क्षणाची किती आतुरतेने तो वाट पाहत होता! मुक्त विचार कागदावर सोडणे केवढे चित्तथरारक आहे! पण आता ते शब्दच आठवेनात. धैर्य गळून गेल्यासारखे त्याला वाटले. काही क्षणानंतर मात्र डायरीच्या दुसऱ्या पानापासून त्याने सुरुवात केली.

'...३ मार्च १९८४! काल रात्री सिनेमाला गेलो होतो. सर्व फिल्मस् युद्धावरच्या. आघाडीवरील जिवंत चित्रण. शत्रूच्या निर्वासितांनी जहाजे भरून जात होती. आणि आमची हेलिकॉप्टर्स खाली येऊन त्याच्यावर गोळ्यांचा पाऊस पाडत होती. सर्व प्रेक्षकवर्ग खूष दिसत होता. शत्रूवरील सूडाने हर्षभरित होत होता. एका बाईने तिचे मूल घट्ट आवळून धरले होते. हेलिकॉप्टरमधून एक बॉंब शेवटी खाली टाकला गेला! स्फोट! तुटलेले अवयव सर्व दिशाना उडाले.

एका लहान मुलाचा हात तुटून वर उडत होता. हेलिकॉप्टरमधील कॅमेरामनने त्यावरच दृश्य केंद्रित केले. तुटका हात वर उडत होता, अन् लॉंग शॉटचा क्लोजअप होऊन तो प्रेक्षकांपर्यंत येत होता. बाल्कनीतील राखीव जागेत पक्षसभासद बसले होते. त्यांच्याकडून सतत टाळ्या पडत होत्या. खाली मजूरवर्गात बसलेल्या एका स्त्रीला हे दृश्य सहन झाले नाही. ती किंचाळू लागली, 'थांबवा! ...थांबवा ही फिल्म!!...' डोअरकीपरने पोलिसाकरवी तात्काळ तिला बाहेर काढली. चित्रपट चालूच होता. प्रेक्षक हसत होते. बाल्कनीतून टाळ्या पडतच होत्या...'

विन्स्टन क्षणभर थांबला. आपण हे काय लिहितो आहोत? याला काही अर्थ आहे का? कैफियत, साहित्य, इतिहास यापैकी काय आहे हे? इतिहास! जो कोणी पुसून टाकू शकत नाही असा इतिहास!! पण आता हे शक्य आहे. इतिहास सहज पुसता येतो. एवढेच नव्हे तर नवीन इतिहास तयार करता येतो. जुन्याची नावनिशाणीही उरत नाही या प्रचंड प्रक्रियेत आपली डायरी केव्हाच वाहून जाईल. जगात सर्वत्र असेच चालले आहे काय? तिन्ही राष्ट्रे याचाच अवलंब करीत आहेत काय? 'राष्ट्र'! हे नाव योग्य नाही. कारण जगातील सर्व राष्ट्रे साम्राज्यांमध्ये केव्हाच विलीन पावली. साम्राज्य! स्वाहाकारी साम्राज्य! अमेरिका खंड व इंग्लड मिळून 'ओशियानिया' हे साम्राज्य उदय पावले. युरोप, आफ्रिकेचा काही भाग व आशियाचा काही भाग मिळून 'युरेशिया' हे साम्राज्य निर्माण झाले. उरलेला अतिपूर्वेकडचा भाग मिळून 'ईस्टेशिया' हे साम्राज्य तयार झाले. आफ्रिकेचा बराच

भाग अजून कोणाकडेच नव्हता. तो मिळविण्यासाठी व दुसरे साम्राज्य संपूर्ण घशाखाली घालण्यासाठी या तिन्ही महासत्तांमध्ये सतत युद्ध चालू होती. कोणत्याही दोन महासत्ता एकमेकाला भारी असल्याने दोघानी मिळून तिसऱ्यावर उठणे हाच पर्याय सर्वांनी सतत अवलबिला होता. कालांतराने पहिली व तिसरी महासत्ता शत्रुत्व तात्पुरते बाजूला ठेवून अचानक दुसऱ्यावर उलटत. अशा युद्धांना अंत नव्हता.

विन्स्टनला हे सारे असह्य झाले होते. युद्धामुळे वस्तूंची टंचाई, जादा कर, जादा श्रम, महागाई वगैरेमुळे कोठेही स्वास्थ्य लाभत नव्हते. दडपण, ताण, भीती याखाली मनाने किती काळ टिकाव धरावा ? शासनाची सतत रोखलेली नजर. ती चुकविणे अशक्य होते. कोणाजवळ मन मोकळे करावे ? अगदी रक्ताच्या नात्यातील प्रिय व्यक्तीदेखील शासनाकडे आपल्या मताची चुगली करणार. त्यातून तो तर पक्षसभासद. त्याच्यावर शासनाची अधिक भिस्त. शेवटी लिहिण्याने मन मोकळे होत असेल तर डायरी लिहिण्याचाही धोका त्याने पत्करला.

युद्ध हे सतत चालूच रहाणार होते. आपापल्या जनतेवर राज्य करण्यासाठी युद्धाच्या वातावरणाची आवश्यकता. प्रत्येक राजवटीला भासे कारण पक्षातील मतभेद व जनतेच्या मागण्या यांना चिरडणे मग सोपे जाई. पक्षाच्या उद्दिष्टांपैकी एक होते 'सर्व जग जिंकणे व मनुष्याचे स्वतंत्र विचार ओळखून ते कायमचे नष्ट करणे.' दुसरे उद्दिष्ट होते 'युद्धात लक्षावधी माणसे त्यांना कळावयाच्या आतच काही सेकंदात ठार करणे.' शासनाच्या अवाढव्य प्रयोगशाळा, हजारो शास्त्रज्ञ व अमाप पैसा या कामी राबविण्यात येत होता.

८० टक्के जनता कष्टकरी वर्गातली. मजूरवर्ग ! त्यावर पक्षाच्या बाहेरच्या वर्तुळातील सभासद, याची संख्या १५ टक्के त्यावरती पक्षाच्या आतील वर्तुळातील सभासद, यांची संख्या ५ टक्के. सर्वांच्यावर एकच व्यक्ती. पक्षप्रमुख ! समजाचे वरचे थर व मूठभर राज्यकर्ते टिकून राहण्यासाठी युद्ध आवश्यक ठरत होते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे जादा संपत्तीचे उत्पादन केले जाई. त्याचे जर सर्वांना वाटप केले तर प्रत्येक कुटुंबाला घर, रेफ्रिजरेटर, मोटार यानी युक्त असे राहणीमान वाटयास येईल. सर्वांचेच राहणीमान उंचावल्यावर सपत्तीसाठी सघर्ष नाहीसा होऊन तो फक्त सत्तेसाठीच होतो. अशा वेळेस सत्ताधारी व्यक्तींना युद्ध किंवा तत्सदृश परिस्थिती उपयोगी पडते. त्यामुळे संपत्तीचे जे जादा उत्पादन होईल ते युद्धासाठी खर्च करता येते. अशा स्थितीत राहणीमान उंचावण्याचा व पर्यायाने सत्ता संघर्षाचा धोकाच टळतो. राज्यकर्त्यांना अंतर्गत विरोध टळल्याने शांतता लाभते. म्हणूनच पक्षाचे घोषवाक्य होते, 'युद्ध म्हणजेच शांतता !'

याशिवाय विरोध नष्ट करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे काल्पनिक अंतर्गत शत्रू निर्माण करावयाचे. एखादी संघटना देशद्रोही आहे असे जाहीर करून त्याच्याविरुद्ध जनतेला सतत चेतवत रहावयाचे. आपल्या सर्व विरोधकांना या संघटनेचे हस्तक ठरविले की मग त्यांना चिरडणे सुलभ जाते. विन्स्टनला आठवले, गेल्या आठवडयात दोन मिनिटे 'निषेध' पाळण्यासाठी ऑफिसातील सर्व कर्मचारी एकत्र जमले होते. समोरच्या पडद्यावर गोल्डस्टीन भाषण करताना दिसू लागला. गोल्डस्टीन ! पक्षाच्या प्रमुख नेत्यापैकी एक. नंतर फुटून निघालेला. 'ब्रदरहूड' नावाची स्वतःची शिस्तबद्ध सघटना त्याने काढली. वेळोवेळी शासनाला त्रास देणारी ! घातपात घडविणारी ! पडद्यावर गोल्डस्टीन आपल्या भाषणात हल्ले चढवीत होता पक्षसिद्धातांचा खोटेपणा सिद्ध करीत होता. पक्षप्रमुखावर बेदरकार तोडसुख घेत होता. किती भयानक ! किती बेडर ! म्हणून पक्षाने त्याला अतिरेकी, प्रतिगामी व जनताद्रोही ठरविले. ब्रदरहूडला परदेशातून मदत मिळते असे शासनाला कळले. गोल्डस्टीन व त्याची संघटना याच्यावर बंदी घातली गेली. पण सर्वांना कळलेच पाहिजे की, देशद्रोही कसा असतो ? त्यासाठी फिल्म दाखविली जाई. त्या वेळी सर्वांनी दोन मिनिटे निषेध पाळावयाचा असे. साहित्य निर्मिती-यंत्रावर काम करणारी तरुण ज्यूलिया विन्स्टनच्या पुढेच बसली होती. प्रेक्षकातून निषेधाच्या आरोळया उठत होत्या. ज्यूलिया हिचा आवाज सर्वांच्यावर ताण करणारा होता. शेवटी तिने प्रक्षुब्ध होऊन हाताशी एक शब्दकोश आला, तोच पडद्यावर भिरकावला. तोडाने 'हरामखोर ! हलकट ! नीच ! डुक्कर !' असा शिव्यांचा जप चालू होता. आता पडद्यावर शत्रूसैनिक चाल करून येताना दिसू लागले. हेही दृश्य विरघळले आणि बिग ब्रदरचा चेहरा पडद्यावर आला. सर्वांच्या चेहऱ्यावर सुटकेचे भाव पसरले. शांतता पसरली. पक्षाची घोषवाक्ये पडद्यावर झळकू लागली तरी बिग ब्रदरचा चेहरा होताच. सर्वांनी मग डोळे मिटले अन् खोल आवाजात, खर्जात, सावकाश एका सुरात ते गुणगुणू लागले, 'बिऽऽऽग् ब्रऽऽदर ! बिऽऽग् ब्रऽऽदर !' असे अर्धे मिनिट चालले. या साऱ्याचा परिणाम विन्स्टनवर झाला, पण पक्षास प्रतिकूल असा ! त्याला गोल्डस्टीनऐवजी ज्यूलियाचाच राग आला. बिग ब्रदरबद्दल द्वेष वाटू लागला. सर्वांनी डोळे मिटल्यावर मान खाली घालून त्याने हळूच नजर वळविली. त्याला ओब्रायन दिसला. पक्षाच्या आतल्या वर्तुळातील हा सभासद, हॉलमधील सर्व सभासदाचा वरिष्ठ. बुद्धिमान व धाडसी म्हणून त्याची ख्याती होती. धिप्पाड शरीराच्या ओब्रायनने बोटाच्या चिमटीत नाक पकडले होते. डोळे मिटलेले होते. त्याने डोळे उघडून सहज विन्स्टनकडे बघितले. तत्क्षणी त्याला विन्स्टनच्या मनातील भाव समजले व संमतीदर्शक मान हलविली. विन्स्टनला तो एकदम आपला त्राता वाटला ! नक्कीच ओब्रायन हा 'ब्रदरहूड'मध्ये असणार—शंकाच नाही. या प्रसगानेच डायरी लिहिण्याचे विन्स्टनने मनावर घेतले होते. त्याने डायरीवर नजर वळविली नकळत त्याने अर्धे पान लिहून ठेवले होते.

'बिग ब्रदर मुर्दाबाद !'
'बिग ब्रदर मुर्दाबाद !'
'बिग ब्रदर मुर्दाबाद !'

एवढ्यात दारावरील घंटा वाजली. त्याच्या पोटात धस्स झाले. कोणीतरी असावे. नक्कीच ! थॉट पोलीस ! किती कार्यक्षम ! वैचारिक गुन्हा होताच तात्काळ हजर ! भीतीने तो आक्रसला. पुन्हा घंटा वाजली. घटा कसली ? मृत्युघंटाच ती ! खुर्चीवर एक भित्रा उंदीर होऊन तो थरथरत बसला होता. जे कोणी असेल ते एकदाच घंटा वाजवून निघून जाईल असे त्याला वाटले होते. आणि आता तिसऱ्यांदा घंटा वाजली. उठणे भाग होते.

पायात कष्टाने बळ आणून तो दारापाशी गेला. दार उघडले. खालच्या मजल्यावरील मिसेस पार्कीसन दारात उभी होती. वॉश बेसिनचा नळ फुटून तिच्या घरात सर्वत्र पाणी झालेले होते. 'तात्पुरती दुरुस्ती करा' म्हणून ती विन्स्टनला विनंती करीत होती. कोंडून ठेवलेला श्वास त्याने बाहेर सोडला. किती घाबरलो होतो आपण! उगाचच काल्पनिक भय आपण बाळगतो. कदाचित जनतेच्या या वृत्तीमुळेच राज्यकर्ते स्थिर राहू शकत असतील.

डायरी बंद करून त्याने लपवून ठेवली. त्यावर गुप्त खून म्हणून मातीचा एक बारीक खडा विवक्षित जागी ठेवून दिला. तिच्याबरोबर खाली जाऊन त्याने दुरुस्ती आटोपली; पण वरती खोलीत आला तेव्हा त्याला कळले की, आपण फार घामाघूम होऊन गेलो आहोत. त्या बाईच्या दहा-बारा वर्षांच्या दोन मुलानी खेळत खेळत विन्स्टनभोवती फेर धरला होता. 'देशद्रोही!' म्हणत त्याच्यावर पिस्तुल रोखले होते. त्या बाईने आपल्या मुलांना आवरले. पण जाता जाता त्या कार्टीनी गलोलीतून विन्स्टनच्या मानेवर एक दगड मारलाच. त्याने डायरी लिहिली होती, गुन्हा केला होता— म्हणून त्याच्या मानेवर गोळी झाडण्यात आली होती, असेच त्याला वाटले. पण तरीही ती मुले भयानकच वात्रट होती. रस्त्याने मजूर-वर्गातील एक वृद्ध बाई बिग ब्रदरच्या पोस्टरमध्ये पाव गुडाळून घेऊन जात होती. या मुलानी मागून जाऊन तिचा झगाच पेटवून दिला. जबर भाजल्याने तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. मुलांचा तरी काय दोष? त्यांना शाळातून टेलीस्क्रिनवरून पुस्तकातून तसेच शिक्षण. दिलेले असे. कितीतरी मुलांनी आपल्या आईबापांचे पक्षविरोधी संवाद पोलिसांना कळवून त्यांना पकडून दिले होते.

विन्स्टन डायरीपाशी बसला. पण त्याचे हृदय धडधडत होते. हे सारे कशासाठी लिहावयाचे! वर्तमानकाळासाठी तरी निश्चित नाही. त्याने डायरीचे पहिले पान उघडले व लिहिले,

'ज्या काळात व्यक्तीच्या विचारात भिन्नता असते व तरीही विचारावर बंधने नसतात, अशा भूतकाळाला व भविष्यकाळाला अर्पण.'

त्याने डायरी बद करून कपाटात लपविली. कुणी हात लावलेला कळावा म्हणून त्यावर मघासारखाच एक मोहरीएवढा खडा विशिष्ट ठिकाणी ठेवून दिला रात्री. अथरुणावर अग टाकताच त्याला झोप लागली. कित्येक दिवसांत अशी छान झोप आली नव्हती. सकाळी टेलिस्क्रीनवरील बाई तीन–चार वेळा हाका मारून त्याला जागे करीत होती.

आता व्यायाम सुरू! ती सागत होती, सूचना देत होती, स्वत: करून दाखवीत होती आणि टेलिस्क्रीनद्वारा सर्वांच्या हालचालींवर नजर ठेवीत होती. नजर! शासनाच्या या नजरेपासून सुटकाच नाही का? कुठेही जा, ही नजर सतत पाठलाग करीत असते. पोस्टर्स. टेलीस्क्रीन, हेलीकॉप्टर्स, गुप्त पोलीस, थॉट–पोलीस. एका वेळी किती डोळे आपणावर रोखून आहेत? यातून कुठे तरी फट असेलच. सर्वांची नजर चुकवून ओब्रायनने नाही का आपणास दाद दिली! आपणही मार्ग काढू. वाटते तेवढे शासनाचे लक्ष नाही.

'विन्स्टन, तू चुकतो आहेस. नीट कर.' टेलिस्क्रीनमधील शिक्षिका त्याच्यावर खेकसली. त्याची विचारशृंखला खळकन तुटली. चला! दिवस सुरू झाला!

ऑफिसात क्युबिकलमध्ये तो बसला होता. त्याचे काम रेकॉर्ड्स खात्यात होते. समोरच्या हवेच्या पाईपमधून कागदाच्या चार गुंडाळया टेबलावर येऊन पडल्या. पहिली गुंडाळी उलगडून त्याने वाचली.

...३–१२–८३ च्या टाइम्सच्या अकातील बिग ब्रदरच्या भाषणासंबंधी 'दैनिक आज्ञा' सदरात अत्यंत असमाधानकारक मजकूर असून अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीचा त्यात उल्लेख आहे. सर्व मजकूर परत लिहून तो वरिष्ठांकडे मंजुरीसाठी पाठवावा...

समोरच्या तबकडीवरील आकडे फिरवून हवा असलेला टाइम्सचा अक त्याने पाईपमधून आणवून घेतला. मजकूर वाचल्यावर त्याला समजले, की अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती ३ डिसेंबरला खरोखरच अस्तित्वात होत्या. नंतर त्याना शासनाने नाहीसे केले असावे. विन्स्टनने 'स्पीकराईट' यंत्र पुढे ओढले व त्या व्यक्तीचा उल्लेख टाळून बिग ब्रदरचे भाषण नव्याने तयार करून तो बोलू लागला. यंत्रातील कागदावर आपोआप मजकूर उमटला गेला. सर्व झाल्यावर कागदाची पहिली गुडाळी व टाइम्सचा अंक भिंतीतील एका भोकात टाकून दिले. हवेने ते आत खेचले जाऊन शेवटी एका भट्टीत पडून नष्ट झाले. कागद पाईपमधून उगवले. विन्स्टन कामात बुडून गेला.

पण त्या दिवशी कामात त्याचे लक्ष लागत नव्हते. त्याचे काम म्हणजे नवीन धोरणाप्रमाणे घडलेल्या घटनांबद्दलचा मजकूर बदलावयाचा. जुन्या घटना, बातम्या, भाषणे इत्यादि सारी नवीन धोरणाप्रमाणे चुकीची किंवा विसगत ठरत असतील तर त्याबद्दलचा मजकूर जिथे जिथे आहे तेथून तो काढून नवीन घालावयाचा. नवीन मजकूर असा तयार करावयाचा की, तो बदलला आहे असे वाटता कामा नये. इतका तो बेमालूम मिसळला गेला पाहिजे. सर्व जुनी वृत्तपत्रे, सदर्भ कागद रेकॉर्ड, वगैरे काढून तपासून ते नष्ट करावयाचे व त्या जागी नव्याने तयार झालेली वृत्तपत्रे, कागद पण मागील तारखाचे— ठेवून द्यावयाचे. मग कोणीही कुठेही जुने कागदपत्र चाळावेत. त्यात कधीच वावगे, आक्षेपार्ह त्याला दिसणार नाही.

नवीन सुधारित मजकूर लिहिताना त्याच्या हातून त्या दिवशी खूप चुका होत होत्या. जुन्या इंग्लिश भाषेतील शासनाने बाद केलेले शब्द वापरले गेले. बदललेला मजकूर सभोवतालच्या मजकुरांत चपखल बसेना तो ठोकळ्यासारखा उठून दिसू लागला. मजकूर बदलण्याची सफाई आज विन्स्टनला सोडून गेली होती अनेक रद्द केलेले कागद त्याने 'मेमरी होल'मध्ये टाकून नष्ट केले. मेमरी होल! विस्मृतीची दरी! इमारतीत प्रत्येक भिंतीला ठराविक अंतरावर भोके होती. या भोकांत टाकलेला कागद प्रवास

**'विन्स्टन तू चुकतो आहेस. नीट कर.'—टेलिस्क्रीनमधील शिक्षिका त्याच्यावर खेकसली.**

करीत करीत हवेच्या झोतावाटे शेवटी भट्टीत जाऊन पडे. ही भट्टी तळघरात २४ तास चालू असे. एकदा रद्द केलेला जुना मजकूर या भोकात टाकला की, त्याचे अस्तित्व सर्व रेकॉर्ड्समधून पुसले जावयाचे. 'मेमरी होल!' किती सार्थ नाव दिले होते.

मधली सुट्टी झाली. लंचसाठी विन्स्टन तळघरातील कॅन्टीनमध्ये उभा राहिला. त्याचा नंबर येताच यंत्रातून एक ट्रे बाहेर आला. त्यात एक पाणीदार सूप असलेली बशी, पावाचा तुकडा, चीजचा बारीक चौकोन, बिनदुधाची 'व्हिक्टरी कॉफी' असलेला कप, एवढ्या गोष्टी होत्या. त्याने नंतर नाणे टाकून 'व्हिक्टरी जीन' यंत्रातून मिळवली कोपऱ्यातील एक टेबल पकडले आणि तो खाऊ लागला. त्याच्या पाठीमागून आवाज आला म्हणून त्याने मागे वळून पाहिले. तो साईम होता. त्याची टकळी सुरू झाली. शत्रुपक्षाकडील कैद्यांना सार्वजनिक-रीत्या फाशी देण्याच्या कार्यक्रमास का आला नाहीस म्हणून तो चौकशी करीत होता.

'विन्स्टन, तू यायला हवे होतेस. अरे, टेलीस्क्रीनवर पहाण्यात खरी मजा नाही. प्रत्यक्ष पहाताना वेगळीच मजा येते. तरी देखील त्या कैद्यांचे पाय बांधलेले, मला पटले नाही. पाय बांधले नसले म्हणजे फाशी जाणारा कसा तडफडतो ते छान दिसते.!'

'तुझी नवी डिक्शनरी काय म्हणतेय?' विषय बदलण्याच्या हेतूने विन्स्टनने त्याला विचारले.

जुनी इंग्लिश भाषा हळूहळू बाद करण्यात आली. त्या जागी नवीन 'न्यूस्पीक' भाषा जागा घेत होती. सर्व शासकीय कामकाज याच भाषेत चालत होते. जुने काही शब्द वगळावयाचे, काही नवीन शोधावयाचे. रूढ झालेले नवीन शब्द कालांतराने पुन्हा सुधारून त्या जागी आणखीन दुसरे शब्द आणावयाचे. शेवटी सर्व भाषा संपूर्णपणे बदलली जाईल. साईम म्हणाला,

'"फार छान! मी सध्या विशेषणावर काम करीत आहे. रोज हजारो शब्द नष्ट करतो. उदा. good शब्द घे. विरुद्ध अर्थी bad शब्द आहे. त्याची काय जरुरी? Ungood ह्या शब्दाने काम भागते. अधिक चांगले, अधिक good सांगावयाचे असेल तर अत्युत्कृष्ट, अप्रतिम वगैरे शब्द तरी कशाला? Plusgood शब्द वापरा. ह्याही पेक्षा अधिक दर्शवावयाचे असेल तर *Doubleplusgood* हा शब्द वापरा. हा एवढा सारा खटाटोप का चालला आहे माहीत आहे? विचारांची व्याप्ती कमी करण्यासाठी. सध्या आपल्या मनाला आपणच शिस्त लावावी असे शासन सांगते आहे. शेवटी वैचारिक गुन्हा करणेही अशक्य ठरेल. प्रत्येक संकल्पना एकाच शब्दाने व्यक्त केली जाईल. त्यातल्या अर्थांच्या असंख्य छटा व्यक्त करणारे सर्व शब्दच काढून टाकले जातील! 'स्वातंत्र्यात गुलामगिरी आहे' असे आज सांगावे लागते. पण 'स्वातंत्र्य' शब्दच वापरातून नाहीसा केला तर त्यामागची कल्पनाही उखडावयास मदत नाही का होत? सर्व वाङमय नवीन भाषेत अनुकूल असे शब्द त्यात घालून, प्रसिद्ध केले जाईल त्या वेळी खरी क्रांती पुरी होईल. ही वेळ इ. स. २०५० मध्ये येईल. ही सर्व मूळ कल्पना बिग ब्रदरची बरं का!'

एवढयात टेलीस्क्रीनवरील संगीत थांबले. बातम्या सुरू झाल्या. निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनाचे वाढते आकडे सांगितले जाऊ लागले. 'राहणीमान सुधारत आहे, अन्न, औषधे, गॅस वगैरे आवश्यक पदार्थांचे वैपुल्य आहे' प्रगत संख्याशास्त्र प्रगतीचा दावा करीत होते! विन्स्टनने डोळे मिटले. पूर्वीपेक्षा रेशनवरचा चॉकोलेटचा कोटा कमी करून २० ग्रॅमवर आणला होता. पण टेलीस्क्रीन सांगत होता,

'उद्यापासून चॉकोलेटचे रेशन वाढवून २० ग्रॅमपर्यंत करण्यात आलेले आहे. कारखाने, कचेऱ्या यातून या घोषणेचे स्वागत केले जात असून निरनिराळ्या संघटना सरकारचे अभिनंदन करीत आहेत. जनता उत्स्फूर्तपणे पाठिंबा-मोर्चे काढीत आहे...!'

विन्स्टन मनात म्हणाला, 'अरे किती खोटे बोलाल? तुम्हाला पचणार नाही ते!'

त्याने डोळे उघडून आजूबाजूला पाहिले. खोटे पचलेले दिसत होते. सर्वांना रेशन कमी केलेले माहिती असूनही सर्वांच्या चेहऱ्यावर तसा भाव दिसत नव्हता. असत्यमेव जयते!

कसली ही माणसे! पक्षसभासद झाले की मनुष्यत्व संपते काय? त्यांच्याकडून कसली अपेक्षा ठेवावी? पण बिचारे ते तरी काय करणार? त्यांच्यावर किती तरी बंधने आहेत.

रात्री डायरी लिहिताना त्याच्या मनात आले की *टेलीस्क्रीनमुळे आपणही मनातील* चीड त्या वेळी दर्शविली नाही. पोस्टर्स, टेलीस्क्रीन, थॉट-पोलिस या सर्वांची नजर! अनेक नियम, कायदे, बंधने! या सर्वांखाली आपले मन गुदमरते आहे. स्वत्व नाहीसे झाले आहे. स्वत्व नाहीसे होते आहे. त्याने डायरीत लिहिले,

'...मजूरवर्गाकडूनच आता काही आशा ठेवली पाहिजे. पक्षात दुफळी होणे कठीण. झालीच तर ती दडपणे त्यांना फार सुलभ आहे! मजूरवर्गाला अजून जाग येत नाही. त्यांना जाणीव झाली म्हणजे ते उठाव करतील. पण कुणीतरी आधी उठाव केल्याखेरीज त्यांना जाणीव येणे कठीण आहे. यांच्यात कसलीच आकांक्षा निर्माण होऊ नये म्हणून ते काळजी घेतात. फक्त खालच्या पातळीवरील देशभक्तीची भावना जिवंत ठेवली आहे. कारण कमी रेशन देण्यास व जादा काम करवून घेण्यास या भावनेचा उपयोग होतो. इतकेही करून त्यांच्यात असंतोष असला तरी तो एकत्र करून इच्छित दिशेने त्याचा झोत फेकण्यासाठी त्यांच्याजवळ कसलेच तत्त्वज्ञान, माध्यम नाही. ही परिस्थिती कायम राहावी म्हणून आपल्या इतकी त्यांच्यावर बंधने नाहीत. म्हणून तर पक्ष म्हणतो की, पशू व मजूर मुक्त आहेत...!'

दिवे मंद होऊ लागले. लवकरच ते बंद होण्याची सूचना होती. त्याने बिछान्यावर अंग टाकले. टेलीस्क्रीन चालूच होता. त्याच्या मनातील विचार धावतच राहिले.

क्रांति-पूर्व काळ तो आठवत होता. भांडवलशाही राज्यव्यवस्था होती. पण तरीही आतापेक्षा तेव्हा आपण निश्चित सुखी असलो पाहिजे. त्या काळातील दृश्ये धुक्यात हरवल्यासारखी दिसत होती. तपशील कळत नव्हता. त्यांनी सर्व इतिहास पुसून टाकला व अनुकूल इतिहासाची रचना केली. सर्व रेकॉर्डस, पुरावे बदलून टाकले. आपण रोज रेकॉर्डस खात्यात काय करतो? खोटा इतिहास रचत असतो. अन् आपले खाते 'मिनिस्ट्री ऑफ ट्रुथ' मध्ये आहे. किती विरोधाभास! स्मृतीला कितीही ताण दिला तरी क्रांतिपूर्व काळातील समाजजीवन त्याला

आठवेना कदाचित मजूरवर्गातील वृद्धाच्या स्मृतीत काही शिल्लक असेल तरच कळेल. सधी मिळेल तेव्हा गुपचूप त्याच्या वस्तीला भेट दिली पाहिजे.

पाईपमधून कामाचे कागद त्याच्या पुढ्यात येऊन पडले. त्याची विल्हेवाट लावत असतानाच त्याबरोबर आलेले टाइम्सचे जुने अर्धे पान चुकून आलेले त्याला दिसले. रुदरफोर्ड आणि त्याचे दोन सहकारी पक्षाच्या एका कार्यक्रमाला न्यूयॉर्कमध्ये हजर असताना घेतलेला फोटो होता. खाली तारीख व नावे छापलेली होती. क्षणभर विन्स्टन टेलीस्क्रीनचे अस्तित्व विसरून हतबुद्ध झाला. काही दिवसापूर्वी याच तिघावर अतिरेकी, घातकी, पक्षद्रोही म्हणून खटला भरला होता. हेच तिघे पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकी होते. खटल्याच्या वेळी कबुलीजबाबात सांगत होते की, एके दिवशी आपण ओशियानियातून विमानाने पळून गेलो व युरेशियात उतरून शत्रूशी हातमिळवणी केली. पण याच तारखेला ते न्यूयॉर्कमध्ये हजर असल्याचा ढळढळीत पुरावा समोर होता, म्हणजे कबुलीजबाब खोटा होता तर! त्याचा उल्लेख असलेले टाइम्सचे सर्व जुने अंक बदलून त्या जागी नवीन प्रती ठेवण्यात आल्या होत्या. पण जुन्यां प्रतीचे हे फाटके अर्धे पान चुकून मागे राहिले होते आणि इतिहासाची साक्ष देत होते. त्याने घाईघाईने इतर कागदाबरोबरच ते पान नष्ट केले. काही दिवसात रुदरफोर्ड आणि सहकाऱ्याच्या नावाचा जिथे जिथे उल्लेख होता ते सर्व अंक, सर्व संदर्भग्रंथ बदलले जातील. छायाचित्रे, चित्रपट सर्वांमधून ते पुसले जातील इतिहासाच्या प्रवाहातून त्यांना अल्लाद उचलून टाकतील काढलेले रेकॉर्डही असेच परतु दुसऱ्या काहीजणांमुळे बदललेले जाईल. ते एकदाच इतिहास बदलत नाहीत. बदलाची क्रिया सतत चालूच असते पण असे का केले जाते? त्याने डायरीत लिहिले,

'हे सर्व काय चालले आहे ते कळते, पण असे करण्यामागचा नक्की हेतू काय आहे? असे का ते कळत नाही! का?'

पक्षाच्या अधिकृत माहितीखेरीज जे तुम्हाला कळते ते ग्राह्य धरू नका, असा पक्षाच्या प्रत्येक सभासदाला आदेश होता. त्याला हे पटत नव्हते. वरिष्ठाना आपली मते पटवावयास जावे तर वादात ते त्याचा सहज पराभव करू शकत होते. अगदी त्याच्या विधानांनी त्याचीच मते खोडून काढू शकले असते. तरीही आपली बाजू खरी आहे हे त्याला माहीत होते. त्याच्या मनात विचार आला, काही गोष्टी शब्दात पकडणे आपल्याला जमणार नाही. त्यासाठी शब्दांची आवश्यकता खरे म्हणजे नकोच होती. कारण कित्येक गोष्टी स्वयंसिद्ध आहेत. त्या पटवाव्या लागत नाहीत. दगड कठीण असतो. पाणी ओले असते. पदार्थ जमिनीवर पडतात. ह्यासाठी वादविवादाची जरूरीच काय? त्याने लिहिले,

'स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्य! त्याला दुसरा अर्थच असू शकत नाही. २+२=४ या गणितासारखे ते स्वच्छ व सोपे आहे. एकदा स्वातंत्र्य प्राप्त झाले की, नतरची प्रक्रिया आपोआप सुरू होते.'

विन्स्टन मजुरांच्या बकाल वस्तीतून हिंडत होता. सर्वत्र जुनी मोडकळीस आलेली घरे! दारिद्र्य! कळकटपणा! गुन्हेगारी! अर्वाच्य शिव्या! मुक्त सभाषण! मुलांचे दंगे! आरडाओरडा! एक नवे विश्वच वाटत होते. मुख्य म्हणजे कुठेही टेलीस्क्रीनचा पडदा नव्हता. किती सुदर गोष्ट! बिग ब्रदरची पोस्टर्स होती. पण त्याची दखल कोणीच घेत नव्हते. कामगारांचा एक गट तावातावाने बोलत त्याच्या पुढून गेला. कोणता आकडा येणार यावर ते पैजा लावत होते. 'मिनिस्ट्री ऑफ प्लेन्टी' कडून चालविल्या जाणाऱ्या लॉटरीसबंधी ते बोलत होते. लॉटरी हे त्याचे एकमेव आशास्थान होते. बिचाऱ्यांना काय ठाऊक पैसे न लावल्या गेलेल्या आकड्यांना भव्य बक्षिसे जाहीर केली जातात. अगदी थोडी रक्कम किरकोळ बक्षिसांच्या रूपाने वाटली जाई. किती भोळे जीव हे! तरीही त्यांच्याकडूनच अपेक्षित कृती घडेल.

विन्स्टन दारुच्या गुत्यातून, मंडईतून, केशकर्तनालयातून, दुकानातून हिंडला. अनेकाशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण क्रातिपूर्व कालखंडासबंधी कुणीच सुसंबद्ध बोलत नव्हते. त्याच्या मेंदूमध्ये स्मृतीच्या असंख्य अर्धवट तुकड्यांचा ढीग होता. आपण नक्की कसे होतो? आता कसे आहोत? अधिक दुःखी की अधिक सुखी? तुलनेसाठी भूतकाळ आवश्यक होता. तोच किती पुसट झाला. कित्येक गोष्टींचे महत्त्व त्या गमावल्या म्हणजेच कळते. येथे बिचाऱ्याना आपण काय गमावले हेच कळत नाही. फिरत असताना अचानक जवळपास शत्रूचा एक उडता बॉंब येऊन पडला. पाचपंचवीस बळी. किंकाळ्या. गर्दी, आगी, धावपळ. या गोंधळात त्याला सापडावयाचे नव्हते, तो चटकन जवळच्या जुन्या मालाच्या दुकानात शिरला. याच दुकानातून पूर्वी त्याने डायरी विकत घेतली होती. दुकानाचा वृद्ध मालक मात्र बरेच सुसंगत बोलत होता. त्याने बऱ्याच जुन्या वस्तू दाखविल्या. भूतकाळाचे भग्न अवशेष! आग्रहाने वरची खोली दाखविली. त्यातील पलंग विकाऊ आहे हेही सांगितले ती खोली मात्र त्याच्या मनात भरली. किती निवात! टेलीस्क्रीनची नजर व कटकट नसलेली! कोपऱ्यातील टेबलावर पुस्तकाची एक चळत होती. क्रातिपूर्व कालातील पुस्तकाच्या आशेने त्याने पाहिले. पण त्याची निराशा झाली. ती सर्व शासकीय प्रकाशने होती. मजूरवर्गाच्याही घराघरातून सर्व जुनी पुस्तके, कागदपत्रे जप्त करून त्यांनी नष्ट करून टाकली होती. तो खिन्न मनाने बाहेर पडला. तो वृद्ध मालक मात्र लक्षात राहील असा होता. बोलताना त्याच्या तोंडून एक जुनी कविता बाहेर पडली होती. किती सहज व सुदर काव्य! पुढल्यावेळी सर्व कविता त्याच्याकडून काढून घेतली पाहिजे. हा म्हातारा म्हणजे भूतकाळात डोकावणारी एक खिडकी आहे.

चालता चालता त्याच्या काळजाचा ठोका एकदम चुकला. समोरून ज्यूलिया येत होती. संध्याकाळची कम्युनिटी सेंटरवरील हजेरी चुकवून किती आडवाटांनी टेलीस्क्रीन चुकवीत चुकवीत तो येथे आला होता. तीही या वेळी येथे हा निश्चित योगायोग नाही. ती नक्कीच आपल्यावर लक्ष ठेवून असणार

**२ + २ = ४ तसे स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्य! त्याला दुसरा अर्थच असू शकत नाही.**

हेर! थॉट-पोलिसांची एजंट! बाजूच्या अंधाऱ्या बोळात जर मागून एकदम तिच्यावर घाव घातला तर कुणाला कळणारही नाही पण एव्हाना ती पसारही झाली होती.

आपण आता पकडले जाणार या कल्पनेने त्याचे धैर्य गळाले. त्यानी पकडण्यापूर्वीच आत्महत्या करावी असे त्याला वाटू लागले. अचानक नाहीसा होणाऱ्या माणसात आत्महत्या करणाऱ्याचे प्रमाण अधिक होते. पण आत्महत्येसही धैर्य लागते. तेवढे असते तर त्याने ज्यूलियाचाच खून नसता का केला! त्याला वाटले, आपण शत्रूशी कधीच झगडत नसतो. आपण आपल्या मनाशी झगडत नसतो. आता बाण धनुष्यातून सुटला होता. घटनांची मालिका सुरू होणार होती. अटक, छळ, मोडलेली हाडे, पाडलेले दात, गोठलेल्या रक्ताच्या केसातील गुठळ्या, कबुली जबाब, मृत्यू. शेवटी तो येणारच. मग आधी छळ करायची काय जरुरी?

नंतरच्या आठवड्यातील गोष्ट. तो ऑफिसच्या कॉरिडॉरमधून चालला होता. समोरून ती येत होती. तीच! त्याचा शत्रू! जवळ येताच ती घसरून पडली व त्याच्याशी टक्कर झाली. अभावितपणे त्याने हात धरून तिला उठविले. 'थँक यू!' असे पुटपुटत ती निघून गेली. पण जाताजाता टेलीस्क्रीनची नजर चुकवून तिने केवढ्या शिताफीने त्याच्या हातात एक चिठ्ठी सारली होती. केवढे धैर्य! त्याने क्युबिकलमध्ये जाऊन कामाच्या इतर कागदांबरोबर चिठ्ठी मिसळून दिली. तासाभराने एका कागदाआड धरून वाचली. फक्त चारच शब्द होते. किती धक्कादायक होते! किती अनपेक्षित होते!! 'मी तुमच्यावर प्रेम करते!' क्षणभर तो सुन्न झाला. मनाची अवस्था विचित्र झाली. या प्रकरणात पुढे पाऊल टाकावे काय? ती हेर असली तर? नसली तर? आणि आपण प्रतिसाद नाही दिला तर ती सूडाने काही करेल? जाऊदे. आता जे काय व्हायचे ते होऊ दे!

शहराबाहेरील *निर्जन भाग.* आजूबाजूला भरपूर झुडुपे. मधे एक रिकामी जागा. कुणालाही दिसणार नाही आणि झाडांमधून लपविलेल्या मायक्रोफोनच्या कक्षेत येणार नाही अशी. तो ज्यूलियाच्या मिठीत पहुडला होता. ती एक किती चतुर होती! तिने ही जागा शाळेच्या सहलीपासून लक्षात ठेवली होती. चौकातील गर्दीमध्ये त्याला हा पत्ता सांगितला होता. प्रेमासाठी केवढा धोका पत्करला होता! *अन् आपण...! तो म्हणाला,*

'तू किती माझ्यावर जीव टाकतेस. मी मात्र त्या वस्तीत तुझा जीव घेणार होतो.'

'तुला शक्य झाले नसते.'

'कशावरून म्हणतेस?'

'इतर पक्षसभासदांपेक्षा तू वेगळा वाटतोस. तू प्रामाणिक आहेस. तुझ्या चेहऱ्यावरील भावच सांगतात.'

'असं? मग बाकीचे सभासद कसे वाटतात?'

'हॅट्! बुभुक्षित! वखवखलेले लाडगे!'

'आणि आतल्या वर्तुळातील सभासद?'

'त्यांचे तर नावच घेऊस नकोस. हरामखोर हलकट!! /नीच!!!' तिचा सारा द्वेष उफाळून आला.

म्हणजे निषेध कार्यक्रमाच्या वेळी ती नाटक करत होती तर! ओब्रायनसारखेच नाटक. ओब्रायन! त्याच्यासारखा बुद्धिमान माणूस स्वस्थ बसणार नाही. कारण आपल्यापेक्षा तो अधिक स्वातंत्र्यप्रेमी, सावध व धाडसी वाटतो. म्हणजे ब्रदरहूडचा तो कार्यकर्ता असणार हे उघड आहे एकदा त्याला भेटले पाहिजे आणि ज्यूलिया? होय, तिच्यासह जाऊ. *केव्हा तरी तिला विचारुया.*

'तू कोणत्या विभागात काम करतेस?'

'अश्लील वाङ्मयनिर्मितीच्या.'

'काय?' त्याला आश्चर्य वाटले.

'होय, आमच्या विभागात सर्व स्त्रियाच आहेत. कदाचित अश्लीलतेला स्त्रिया बळी पडत नसाव्यात अशी त्याची समजूत असेल. आम्ही हे सर्व वाङ्मय मजूरवर्गासाठी तयार करतो. काही पुस्तिका तर 'आक्षेपार्ह' आहेत अशी समजूत होण्यासाठी गुप्तपणे एजंटांमार्फत विकल्या जातात. चोरटे वाङ्मय वाचल्याचा आनंद त्यांना घेऊ द्यावयाचा असतो म्हणून.'

त्याला वाटले, श्लील काय अन् अश्लील *काय. कॅथरीनला स्त्रीपुरुषसंबंध किती लाजिरवाणे* वाटावयाचे! शेवटी ती विभक्त झाली. एरवी किती सुस्वभावी पत्नी होती! पण ऐन वेळी तिची गात्रे थंड पडावयाची नि आपली पेटून उठायची. ती तरी काय करणार? शाळेपासूनच कामभावनेविरुद्ध धडे देण्यात आलेले आहेत. सभासदांचे लैंगिक सुख त्यांना मंजूर नाही. पण पक्षाला सभासदसंख्या कमी होऊ द्यायची नाही. म्हणून *प्रजोत्पत्तीच्या उद्दिष्टाने नाईलाजाने लग्नास* परवानगी दिली जाते. एक खास समिती सभासदांच्या जोड्या ठरविते. प्रणयाचा एवढा राग का केला जातो? प्रणय! नाजूक प्रणय! तो कसा असतो ते आता आपल्याला कळले ज्यूलियाबरोबरच्या शृंगाराने मन कसे तृप्त झाले! केवढा भयंकर गुन्हा हा! परत परत करावासा वाटणारा! धाडस केले व नशिबाने साथ दिली तर असेच आपले दोघांचे गुप्त जीवन कंठू या.

अखेर तो ज्यूलियासह ओब्रायनला घरी भेटला. स्पीकराईट यंत्रापाशी पक्षाच्या नवीन योजनांबद्दल तो बोलत होता. विन्स्टन येताच त्याने एक बटण दाबून टेलीस्क्रीन बंद केला.

त्याने आश्चर्याने विचारले,

'तुम्ही हे बंद करू शकता?'

'होय. फक्त आतल्या वर्तुळातील सभासदांनाच अर्ध्या तासाची खास सवलत आहे. प्रोला आता.'

विन्स्टन थोडा वेळ थांबला. नंतर चाचरत म्हणाला,

'आमचा असा समज आहे की पक्षाविरुद्ध प्रचार, कट चालू आहेत व त्यात तुमचा हात आहे. तुम्हाला पक्षधोरण व बचलित समाजव्यवस्था आवडत नसून तुम्ही ब्रदरहूडचे कार्यकर्ते आहात. आम्हाला पक्षाचा तिटकारा वाटतो. आता सहन होत नाही. आम्हाला तुमच्यात सामील करून घ्या, नाही तर तुमच्या इच्छेला येईल, तशी आमची विल्हेवाट लावून टाका. आता सर्व काही तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे.' एका दमात बोलल्याने त्याला धाप लागली होती.

ओब्रायन बोलू लागला,

'तुम्हाला वाटते तेवढे सोपे काम नाही. वेळप्रसंगी खून पाडावे लागतील. हजारो निरपराध माणसांना घातपाताने ठार करावे लागेल. एखादे वेळेस तान्ह्या मुलाच्या तोंडावर अॅसिड फेकावे लागेल, भावना बाजूला ठेवून नाईलाजाने हे करावे लागेल. परकीयांच्या साहाय्याने देशविरोधी कृत्ये, ब्लॅकमेल, अफरातफर, गुप्त रोगाचा प्रसार सर्व काही करावे लागेल, की जेणेकरून

पृष्ठ २१ वर

शहरी आणि ग्रामीण पर्यावरण प्रश्न भिन्न आहेत, ही भूमिका येथे विशद करून सांगायचं कारण असं की, आपल्या देशात अजूनही दोन्ही विभागांसाठी सुसूत्र, एकसंध असे पर्यावरणविषयक धोरण नाही. यामुळे शहरी भागात पर्यावरण विषयक प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती आढळते. तसेच ग्रामिण प्रश्नांचे पर्यावरणविषयक वेगळेपण आणि सध्याच्या ग्रामिण विकासाच्या योजनांमुळे पर्यावरणाचा होणारा विनाश निदर्शनास आणण्याचा येथे प्रयत्न केला आहे. ह्या चर्चेमुळे सध्याच्या (भारताच्या) परिस्थितीत पर्यावरणविषयक धोरण कसे असावे ह्यावर थोडा प्रकाश पडू शकेल.



रवींद्र संगवई

# ग्रामीण आणि शहरी पर्यावरण

## प्रश्न वेगळे, उत्तरेही वेगळी

पर्यावरण ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे.

जमीन–पाणी–हवा, सूक्ष्मजीव, वनस्पती व पशुपक्षी आणि मानव ह्यांचे परस्परसंबंध, नैसर्गिक संतुलन सांभाळणं यालाच पर्यावरण विकास म्हणायला हरकत नाही. पर्यावरण विषयक ह्या घटकांचा शहरी भागाच्या आणि ग्रामीण भागाच्या संदर्भात विचार केला तर वेगवेगळे प्रश्न समोर दिसतात.

शहर आणि ग्रामीण विभागातील एकूण जीवनपद्धतीच भिन्न आहे. शहरे, व्यापार, उद्योगधंदे, दळणवळणाची केंद्रे असल्यामुळे लोकसंख्येची घनता अधिक, तर खेड्यात शेती व कुटिरोद्योग प्रमुख पण लोकसंख्येची घनता कमी आहे. शहरी क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्रात चालणाऱ्या भिन्न उद्योगांमुळे (Industry) त्यांची रचनाही विशिष्ट आहे. तिथे निर्माण होणाऱ्या गरजांमुळे निसर्गावर पडणारा ताणही वेगवेगळा आहे.

◻

भारतात शहरी क्षेत्रात लोकसंख्येच्या २३.७ टक्के लोक राहातात. लोकसंख्येची घनता दर चौरस कि. मी. मागे चारशे आहे. ( Commerce trade ) किंवा कारखाने, शासनकेंद्रे असलेली शहरेच येथे अभिप्रेत नाहीत तर औद्योगिक वसाहती, खाणी, औष्णिक वीजकेंद्रे, अणुभट्ट्या याही शहरांचीच 'एक्स्टेशन्स' आहेत. माणूस आणि यंत्रे यांनी शहरे बनलेली असतात असे म्हणायला हरकत नाही.

वरील परिस्थिती ध्यानात घेतली तर पर्यावरण प्रदूषणाचा (जमीन–पाणी–हवा या तिन्ही बाबींचा) प्रश्न शहरात अत्यंत निकडीचा आहे. दुसरा अप्रत्यक्ष प्रश्न म्हणजे शहरी गरजा (उद्योगधंद्याच्या) भागवण्यासाठी शहराशिवाय इतर (म्हणजेच ग्रामीण (?) भागावर पडणारा ताण आणि त्यातून होणारा पर्यावरणविनाश.

पाण्याच्या प्रदूषणाची काही प्रमुख कारणे आहेत. मानवी मलमूत्र व इतर ड्रेनेज (Sewage), कारखान्यांतून उत्सर्जित होणारी द्रवरूप प्रदूषके, औष्णिक भट्ट्यांतून समुद्रात सोडले जाणारे पाणी ही काही आहेत. शेतीत वापरली जाणारी जंतुनाशके, कीटनाशके देखील पाण्यात वाहून येतात. शेतीतून देखील ह्या स्वरूपात प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होत आहे.

मानवी मलमूत्र (Sewage) व इतर ड्रेनेज हा प्रत्येक शहरातला प्रश्न. सीवेजच्या विल्हेवाटीची किंवा सीवेज डिस्पोजलची सध्याची व्यवस्था अत्यंत मागासलेली आणि म्हणूनच घातक आहे. सीवेज वाहून आणणे आणि सीवेजवर प्रक्रिया (Sewage treatment ) करून नदीत, नाल्यात, तलावात किंवा समुद्रात सोडणे असे तीन भाग ह्या प्रक्रियेचे आहेत. शहरातील घराघरातून मोठ्या नलिकांतून 'सेप्टिक टँक्स' मधले सीवेज वाहून आणले जाते. वाढत्या लोक-

सख्येच्या घनतेमुळे सीवेज पाईप्सची संख्याही मोठी असते. तसेच पिण्याच्या पाण्याचे नळ जमिनीखालूनच टाकलेले असतात. हे नळ व सीवेजपाइप्स एकमेकाना समातर असतात, छेदून जातात. अनेक जुने झालेले पाइप्स फुटतात व स्वच्छ पाणी, सीवेजची सरमिसळ होत, होण्याची वाढती शक्यता आहे. मुबई, कलकत्ता यासारख्या मोठ्या शहरातून अनेकदा नळाच्या पाण्यातून अनेक घातक बॅक्टेरिया, इतर सूक्ष्मजीवच नव्हे तर अळ्या सुद्धा येतात ते ह्याच कारणामुळे. घराची गर्दी आणि वरील धोके टाळण्यासाठी शहर नियोजनाची ( Town Planning ) आवश्यकता आहे.

## हवा–पाण्याचे प्रदूषण

शहराचे सर्व सीवेज मोठ्या 'प्राइमरी टॅक्स' मध्ये साठवून गाळ खाली साचल्यावर वरचे पाणी सरळ नदीत, समुद्रात फेकले जाते. आपल्याकडच्या बहुसंख्य शहरात हीच पद्धत अवलबली जाते. यात नायट्रोजन व फॉस्फरसचे प्रमाण जास्त असल्यामुळे पाण्यातील बॅक्टेरिया आदीची क्रियाप्रक्रिया वाढते व पाण्यातले ऑक्सिजन संपुष्टात येते. तसेच पाणी वापरास व पिण्यास अयोग्य बनते. एवढेच नव्हे तर दृष्टीसदेखील ती अति गलिच्छ बनतात रोजच्या रोज एवढ्या मोठ्या प्रमाणावर सीवेज, नदी, समुद्रात सोडले जाते की, नैसर्गिक विघटनाचा वेग त्या मानाने कमी पडतो. यामुळेच 'युट्राफिकेशन' होऊन वॉटर हार्यासिथसारख्या वनस्पतीची प्रचंड वाढ होते व पाण्यातील इतर जलचर, प्राणी याचे अस्तित्व धोक्यात येते. (डिऑक्सिजनेशनमुळे )

सीवेज मुळे उत्पन्न होणारा धोका टाळण्यासाठी 'सेकंडरी ट्रीटमेंट टॅक्स' किंवा पुर्नप्रक्रिया हौद बाधण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे सीवेजमधील ७०–७५ टक्के नायट्रोजन व फॉस्फरसचे विघटन होते. तशी ही बाब खर्चिक आहे; पण ह्यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर परिणामाची दखल घेतल्यास तो खर्च अयोग्य होणार नाही.

पिंपरी–चिंचवडच्या परिसरात सेप्टिक टॅक्स फुटल्यामुळे लोकाना ज्या अजागळ, दुर्गंधीयुक्त आणि घातक स्थितीत राहावे लागते ते ज्यांनी पाहिले असेल, त्याना ह्या प्रश्नाचे गांभीर्य पटेल. मध्यंतरी महाराष्ट्रातल्या एका गावी सीवेज ठिकठिकाणी पाइप्स फुटल्यामुळे शहराचे रूपांतर एका भयंकर उकिरड्यात झाल्याची बातमी आली होती. मुबईतून तर अशा बातम्या नेहमीच येतात.

पाण्यात प्रदूषण निर्माण होण्याचे दुसरे कारण म्हणजे कारखान्यांतून नदी–नाले–समुद्र यात टाकले जाणारे उत्सर्जित पदार्थ. रासायनिक खताचे, औषधांचे, पेपर-मिल्स, रेयॉन-मिल्स, कापड-कारखाने वगैरे कारखान्यांतून अनेक रसायने, जी विषारी ठरण्याची शक्यता असते, पाण्यात सोडली जातात. पिंपरी–चिंचवड–परिसरात प्रदूषणविषयक कायदा कितपत अमलात आणला जातो याची पाहाणी करण्यात आली तेव्हा बरेच कारखाने कायद्याच्या पालनाचा भास निर्माण करण्यासाठी दिवसाऐवजी टाकाऊ रसायने रात्री नदीच्या पाण्यात सोडत असल्याचे आढळून आले !

अशा प्रदूषकांची जंत्रीच तयार करता येईल; पण तो उद्योग इथे करण्याची गरज नाही. विषयाच गांभीर्य पटलं म्हणजे झालं. ह्या प्रदूषकांमुळे पाण्यातील सर्वच सजीवांना –प्राणी आणि वनस्पतींना–धोका निर्माण होतो. मोठ्या प्रमाणावर जलचर, जलवनस्पती मरतात किंवा मग अशी रसायने अन्नसाखळीत वाढत जाऊन अपायकारक अशी सिद्ध होतात.

हवेच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर डिझेल व पेट्रोलच्या वाहतुकीसाठी आणि कारखान्यांसाठी आणि कोळसा इत्यादी इतर इंधनाचा कारखान्यामधून होणारा वापर कारणीभूत ठरतो. So, (सल्फर डायऑक्साइड), Co, (कार्बन मोनॉक्साइड, क्लोरिन),Br, (ब्रोमियम),P, (फॉस्फरस), HV. CI. (हायड्रोक्लोरिक ॲसिड वाफ), $Co_2$, ( कार्बन डायऑक्साइड ) सारखी अनेक प्रदूषके कारखान्यामधून हवेत टाकली जातात. मुबईच्या चेंबूर परिसरात व आता बहुतेक साऱ्या औद्योगिक वसाहतीत हे साऱ्याच्या नित्य अनुभवाचेच झाले आहे. ॲसिडस्मुळे पावसाळ्यात 'ॲसिडरेन्स' पडण्याची शक्यता असते. त्यामुळे जमीनही खराब होते–ॲसिडिक बनते वातावरणातले कार्बन–डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्याचा दूरगामी परिणाम तपमान वाढवण्यात होतो. धुरामुळे शहरांच्या आसपास झाडाच्या पानावर कार्बनकण साठून झाडाची हवा स्वच्छ (फोटोरेस्पिरेशन) करण्याची प्रक्रिया कमी होते. अनेक प्रकारच्या उत्सर्जक वायूमुळे हवेतील ऑक्सिजनचे सापेक्ष प्रमाण कमी होते. घशाचा त्रास, अधत्वाचा धोका, कॅन्सर, कातडीचे रोग, दाताचे रोग निरनिराळ्या कारखान्यांतल्या कामगाराना झाल्याचे आढळून आले आहे. क्रूड पेट्रोल रिफायनरीज, सुपर थर्मल पॉवर प्रोजेक्टस्मधून प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या हवेच्या प्रदूषकाचे परिणाम संपूर्ण वातावरणातील नैसर्गिक वायूचे संतुलन बिघडवण्यास .कारणीभूत होतात.

हवा आणि पाणी याच्यातील प्रदूषणाचे भय वाटण्याचे कारण म्हणजे वाढते औद्योगीकरण. हा आज विकासाचा मानदड आहे. त्यामुळे उद्योगधंदे, शहरे वाढणारच. तेव्हा हे प्रदूषणाचे प्रमाणही तेवढेच वाढत जाऊन माहीत असलेल्या धोक्याना किंवा सध्या माहीत नसलेल्या नवीन धोक्याना तोड द्यायची पाळी येऊ नये, यासाठी प्रदूषणाबद्दल आतापर्यंत आपल्या देशात व परदेशांत झालेल्या अभ्यासाचे निष्कर्ष वापरून सुधारित प्रदूषणविरोधी कायदे (ज्यात पळवाटा रोखता येतील) करून अंमलबजावणीची काळजी घेणे जरूर आहे.

'नॉइज पोलूशन' किंवा अतिआवाजामुळे होणारा त्रास सर्व शहरी भागात जाणवण्याइतपत आहे. वाहने, कारखाने, विमाने, रेल्वे वगैरेंमुळे हा त्रास होतोय; पण सध्या तरी त्याचे परिणाम अत्यत दूरगामी असल्यामुळे (१५–२० वर्षे किंवा जास्त आवाज असल्यास ५–१० वर्षांत ऐकण्याची शक्ती कमी होते.) त्याची दखल घेण्याची कोणाला गरज वाटत नाही.

शहरात पुरेशी झाडी नसणे हादेखील तेवढाच महत्त्वाचा प्रश्न. भरपूर उद्यानामुळे, झाडामुळे नैसर्गिकरीत्या हवा स्वच्छ होण्यास, हवेचे तपमान कमी होण्यात, हवा खेळती राहण्यास मदत होते. शहरात सध्या केवळ कावळे अन् चिमण्या तग धरून आहेत. इतर पक्ष्याचे प्रमाण सतत कमी होत चालले आहे, ती झाडी नष्ट होत चालल्यामुळेच.

ॲटॉमिक रिॲक्टर्समधून समुद्रात टाकल्या जाणाऱ्या उष्ण पाण्यामुळेही समुद्रातील

जलवनस्पती (ज्या इतर जलचराच्या पोषणास आवश्यक असतात) नष्ट होतात. तसेच मोठ्या प्रमाणावर पाण्यातील मासे मरण्यास, कमी होण्यास कारणीभूत होते. येथेही हे पाणी आधी किनाऱ्यावर हौदामध्ये थंड करून मग सोडणे आवश्यक आहे. रिएक्टर्समधून लिकेज किंवा घातक आयसोटोप्स पाण्यात 'लिक' होऊन मिसळण्याची अजून आपल्या देशात वार्ता नाही; पण गतवर्षी अमेरिकेत या प्रकारामुळे निर्माण झालेल्या प्रचंड धोक्यामुळे लोक हादरून गेले होते.

शहराचे 'एक्स्टेंशन्स' म्हणता येणारी खाणी, मोठे वीजप्रकल्पदेखील पर्यावरणास घातक ठरली आहेत, होऊ पाहताहेत. दोन उदाहरणे दिली तर या प्रश्नाची गंभीरता लक्षात भरेल 'कुद्रेमुख आर्यन ओअर' प्रकल्प सरकारने पाचशे करोड रुपये खर्चून उभा केला–इराण, इराकला लोखंड पुरवण्यासाठी; पण ह्या वेळेस मोठ्या प्रमाणावर जंगलाचा विनाश करावा लागला आणि पुढेही साहजिकपणे होणार आहे. त्याची सामाजिक आणि पर्यावरणाविषयी किंमत ध्यानात नाही घेण्यात आली.

कुतीपुझानदीवर सायलेंट व्हॅली धरण-प्रकल्प उभा करून भारतातले एकुलते एक ट्रॉपिकल रेन' फॉरेस्ट नष्ट करण्याची योजना केरळ सरकारने केवळ पतप्रधानाच्या इच्छेखातर सोडली हे आपले महत् भाग्य. असाच एक प्रकल्प उत्तर प्रदेश सरकारने, कोणताही भूशास्त्रविषयक अभ्यासाशिवाय आखलाय. तो म्हणजे विष्णुप्रयागला अलकनंदेवर *आशियातला सर्वांत उंच धरण बांधण्याचा!* ह्या धरणामुळे वीज निर्माण होईल खरी, पण भारताचे एक प्रमुख पर्यटक स्थळ. आणि वनस्पतीशास्त्रज्ञाचं आकर्षणाचे ठिकाण व्हॅली ऑफ फ्लावर्स पाण्याखाली जाईल–एक मोठे नैसर्गिक जंगल नष्ट होईल.

अशा मोठ्या प्रकल्पांची आखणी होताना पर्यावरणाविषयी विचार होण अत्यंत आवश्यक आहे. विष्णुप्रयागच्या धरणामुळे भूकंपाची शक्यताही वर्तवली जाते.

□

ग्रामीण भागाच्या पर्यावरणाचा विचार करताना तेथील लोकांच्या गरजा, त्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती व तीतून उत्पन्न होणारे पर्यावरणविषयी प्रश्न हे मुद्दे ध्यानात घ्यायला हवेत. तसेच ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न (आर्थिक) सोडवण्यासाठी सरकारने आखलेल्या आणि राबवलेल्या नवीन योजनामुळेसुद्धा पर्यावरणावर कसे दुष्परिणाम होताहेत हे बघणं आवश्यक झाल आहे.

## सामाजिक वनीकरण नीती

अन्नधान्याखालोखाल जळाऊ इंधन, जनावरांसाठी चारापाणी, अवजारे, घरे यासाठी लाकुड ह्या पर्यावरणविषयक परिणाम करणाऱ्या गरजा आहेत. बिगरसरकारी जमिनीवरील सर्व झाडीवर, रानावर वाढत्या लोकसंख्येमुळे प्रचंड आक्रमण होऊन जवळपास जगलखात्याशिवाय इतर जंगले नष्ट झाली आहेत किंवा होत आली आहेत. देशात लागणाऱ्या एकूण इंधनापैकी ५० टक्के इंधन अन्न शिजवण्यासाठी वापरले जाते. अन्न शिजवण्यासाठी लागणाऱ्या इंधनापैकी ९० टक्के गरज अजूनही लाकूड, गवऱ्या–शेण, शेतीतून उरणार चाराकचरा यावर भागवली जाते

एकंदर १०३ कोटी हेक्टर जमिनीवरील चराउ कुरणापैकी बहुतेक जमिनीवर अतिक्रमणे झाली आहेत किंवा ती निकामी आहे अशा तऱ्हेने बिगरसरकारी जमिनीवर जगले व कुरणे न राहिल्यामुळे आता बऱ्याच ग्रामीण भागात लाकूड विकत घ्यावे लागते आणि चाऱ्यासाठी शेतीवर अवलबून राहावे लागते. (तेथेही किमान जमीनधारणा कायद्याची केवळ २०% अंमलबजावणी झाल्याने फक्त मोठे शेतकरीच जनावरे पोसू शकतात.)

तात्पर्य असे की, मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपत्ति नष्ट झाल्याने जमिनीची धूप होणे, सुपीक जमीन वरचेवर कमी होणे, दुष्काळ अनियमित पाऊस ह्यासारख्या परिणामांची पातळी खालावत चालली आहे. शेतातून मिळणाऱ्या चाऱ्याचा मोठ्या प्रमाणावर जनावरांच्या चाऱ्यासाठी उपयोग होत असल्याने शेतजमिनीना नैसर्गिक खत मिळणे बंद झालं आहे. वाढत्या लोकसंख्येच्या दबावामुळे जमिनी 'फॉलो' किंवा पडिक ठेवणे अशक्य झाले आहे. कृत्रिम खतांच्या अधिकाधिक वापरामुळे जमिनीतील नैसर्गिक मूलद्रव्यांचे प्रमाण सतत कमी होत चालले आहे. जमिनीतील सूक्ष्म जीवाचा विनाश होऊन जमिनीत नैसर्गिकरित्या वनस्पतीपासून' सोनखतापासून मिळणाऱ्या द्रव्याचे विघटन करून जमिनीची सुपीकता कायम ठेवण्याची प्रक्रिया कृत्रिम खताच्या वापरामुळे नष्ट होत आहे. कृत्रिम खतामुळे 'खार जमिनी' –(टाकाऊ) वाढत चालल्या आहेत.

इतर क्षेत्रावरची जगले नष्ट झाल्यामुळे ग्रामीण गरजाचा भार अर्थातच प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या राखीव जंगलावर पडतो. आदिवासीचेही जंगलातून उच्चाटन झाल्यामुळे (किंवा होत असल्यामुळे) उपजिवीकेसाठी जगलातील लाकूड चोरून विकून पोट भागवण्याऱ्याची सख्या वाढत चालली आहे.

ग्रामीण गरजा– (इंधन, चारा, लाकूड) यासाठी सरकारने सामाजिक वनीकरणाची नीती अवलंबिली आहे. राखीव जंगले सोडून असलेल्या इतर सर्व जमिनीवर वृक्षरोपण करून शक्यतो सर्व जमिनीचा झाडे वाढवण्यासाठी उपयोग करण्याचे ठरवण्यात आले पण इथे देखील ग्रामीण लोकाना उपयोगी अशी ताल, तमाल, कदंब, पळस, महुवा, चिंच, तून, सौंदड, बेहडा, हिरडा, चंदन पिंपळ, वटवृक्ष, येकन, टाकळी, अंजन, आपटा यासारख्या झाडाची लागवड करण्या ऐवजी निलगीरी (युकॅलिप्स) कूबाभूळ, साग, पाइन्स इत्यादी व्यापारी कारणासाठी लावण्यात येणारी झाडेच मोठ्या प्रमाणात राखीव वनाशिवाय इतर क्षेत्रात लावण्यात आली. त्यातही 'ट्री फार्मिंग' किंवा व्यापारी कारणासाठी वापरता येणाऱ्या झाडाची लागवड हाच एक कार्यक्रम यशस्वी ठरला आहे, पण त्याचा तसा सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने उपयोग नाही. तसेच अशी एकाच प्रकारची झाडे शेतावर वाढवल्याने शेतजमीन लवकर नापीक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नैसर्गिक (त्या त्या भागाची काही जंगले किंवा झाडाचा समुदाय ही वैशिष्टये असतात.) झाडाची वाढ होत नसल्यामुळे जमिनीचे शोषण होऊन त्या निकामी होण्याचीच शक्यता अधिक 'मोनोकल्चर्स'मुळे जमिनीतील पाण्याची पातळी कमी होण्याचा संभवही आहे. तसेच अनेक प्रकारची झाडे असल्यामुळे जमिनीला स्थैर्य येते व अशा जगलांवर अनेक पशुपक्ष्यांची गुजराण होऊ

शकते. जी झाडे पशुपक्ष्याना चारा, अन्न पुरवू शकत नाहीत ती पर्यावरणाच्या सतुलनाच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत ट्री फार्मिगला विरोध असण्याचे कारण नाही परंतु इतर जमिनीवर तरी मोनोकल्चर्स वाढवण्यात येऊ नयेत

पर्यावरणाच्या दृष्टीने खरं तर सर्वात महत्त्वाचा प्रश्न सरकारी मालकीच्या (२३% एकदर जमिनीपैकी) जंगलाचा. पर्यावरणखात्याच्या नवीन अहवालाप्रमाणे सध्या केवळ अर्धा टक्का जमीन जगलानी व्यापलेली आहे. इतर जमिनीवरची जंगले राजकीय दबाव–राजकारण, कॉन्ट्रॅक्टर्सचा बेगुमानपणा आणि वनखात्याचे भ्रष्ट कर्मचारी अधिकारी यांच्या कारवायामुळे नष्ट झाले आहे. दरवर्षी साधारण दहा लाख हेक्टरवरची जंगले नष्ट होतात व पुनर्वनीकरणाचा वेग दरवर्षी साधारण ५ लाख हेक्टरऐवढा आहे.

पण पुनर्वनीकरणातील महत्त्वाचा दोष म्हणजे सरकारचा व्यापारी उत्पन्न मिळवण्याचा दृष्टिकोन. आतापर्यंत नष्ट झालेली वनेदेखील ह्याच व्यापारी हेतूमुळे नष्ट झाली. केवळ पेपरमिल्स, पेपरपल्प, रेयॉन-उद्योग व लाकूड–उद्योगातले व्यापारी याना योग्य ते लाकूड पुरवणे हाच उद्देश ठेवला जात आहे एकदर पर्यावरणाच्या स्थैर्याच्या दृष्टीने, नैसर्गिक चक्रे, ऋतुचक्रे योग्य तऱ्हेने चालवण्यासाठी पॉलिकल्चर जंगले आवश्यक आहेत. भारतातल्या जंगलामध्ये जवळपास ३५००० प्रकारच्या वनस्पती आणि ५०० प्रकारचे पशुपक्षी सापडतात. त्या सर्वांचा बळी देऊन वनीकरणाच्या नावाखाली युकॅलिप्टस, सुबाभूळ, सात्र, पाइन अशा निवडक जातीची पैदास करून वनखाते आपले 'पर्यावरणविषयक अज्ञान दाखवत आहे. हिमालयात पाइन्स, उत्तर प्रदेशात तराईमध्ये युकॅलिप्टस्, छोटा नागपूर आणि बिहारमध्ये सात्र, कर्नाटकात युकॅलिप्टस, अदमानमध्ये सात्र आणि युकॅलिप्टस लावला जात आहे तोही प्रचड प्रमाणावर नैसर्गिक जगले तोडून ! नुकताच मध्यप्रदेश सरकारने ४० हजार हेक्टर जमिनीवरील जंगल नष्ट करून युकॅलिप्टस लावण्याचा आदेश काढला ! मुळात अशी 'प्लँटेशन्स' लावण्यात वनीकरणाचा उद्देश नसून व्यापाराचा हेतू आहे.

देशाच्या ३३ टक्के विभागावर वनक्षेत्र असणं अनेक दृष्टींनी आवश्यक आहे हे आपण केव्हाच मान्य केले आहे आणि जंगलांचे फायदे (पर्यावरणविषयक) बऱ्याच प्रमाणात दूरगामी असतात. सपूर्ण हवामानाचा रोख कायम राखण्यासाठी नैसर्गिक जंगल अधिक योग्य आहेत. अशा जगलात (ट्रॉपिकलरेन फॉरेस्टस् किंवा 'डेसीडचुअस् फॉरेस्टस्.') वनस्पती व पशुपक्षी यामध्ये वैविध्य असल्यामुळे ती एकमेकाना पूरक, उपकारक ठरतात. अन्नासाखळीमध्ये वैविध्य येऊन अशा वनांना अधिक स्थैर्य येते. अशा विविध वनस्पतीमुळे जमीन चागली राहाते. पाण्याची पातळी कायम राहाते. अधिक मातीनिर्मितीही होत राहाते. पाऊस नियमित पडतो मध, डिंक, हिरडी, बेहडा, तमाली इ. अनेक उपयोगी वस्तू अशा रानातून मिळतात.

वनखात्याने व्यापारी गरजा, शहरी गरजा भागवण्यासाठी वनशेतीचा प्रचार, पुरस्कार करणे जास्त योग्य ठरेल. राखीव वनाना बळी देण्याचे कारण नाही.

शेवटी सरकाने सामाजिक वनीकरणासाठी राखून ठेवलेली रक्कम पाहिली की सामाजिक वनीकरणाच्या उद्दिष्टाची चेष्टा केल्यासारखी वाटते ! सहाव्या योजनेंतर्गत केवळ दहा कोटी रुपयाची तरतूद आहे !

ग्रामीण व शहरी भागातील विशिष्ट आणि विविध प्रश्नाचा स्वतत्रपणे विचार करून पर्यावरण साभाळण्याचे दूरगामी उद्दिष्ट ठेवूनच धोरणं आखली गेली पाहिजेत. मुख्य म्हणजे आर्थिक विकास म्हणजे पर्यावरणविनाश असा जो विरोधाभास निर्माण होत आहे तो टाळला पाहिजे. त्यासाठी विविध केंद्रीय राज्यसरकारांच्या योजनामध्ये पर्यावरणविषयक एकसंध, ठाम अशी भूमिका असणं आवश्यक असल्याचं जाणवतं.

शहरी आणि ग्रामीण भागातील पर्यावरणविषयक प्रश्नाचा थोडक्यात परामर्श घेतल्यावर दोन्ही भागात वेगवेगळ्या प्रश्नांना तोड देण्यासाठी, सोडवण्यासाठी काम करण्याची तेवढीच निकड आहे हे स्पष्ट आहे.

---

## 'अस्तित्वात असलेली जंगले तोडण्यास बंदी'
## नवीन प्रस्ताव

केंद्रीय पर्यावरणखात्याने केंद्रीय मंत्रिमंडळाकडे सादर केलेल्या नवीन 'वनधोरणामध्ये' हे कलम सुचवण्यात आले आहे' अस्तित्वात असलेल्या सर्व वनाचे त्यातील पशुपक्ष्यांसहित पूर्ण संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. मध्यप्रदेश सरकारने चाळीस हजार हेक्टरवरील नैसर्गिक वन नष्ट करून युकॅलिप्टस्, साग यांची लागवड करण्याचा आदेश दिल्यावर पर्यावरणखात्याने प्रा. माधव गाडगिळाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली ह्या अभ्याससमितीने नैसर्गिक जगलाचं अस्तित्व निसर्गसतुलन सांभाळण्यासाठी आवश्यक असल्याच प्रतिपादन केलं आहे. सरकारच्या जगलाचे व्यापारीकरण करण्याच्या धोरणावर टीका करण्यात आली आहे १८ कोटी निरुपयोगी जमिनीवर जंगल आणि चराऊ कुरणे वाढवून इंधन, चारा, लाकूड या गरजा भागवता येतील असेही सुचवले आहे. राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये याची सख्या वाढवावी आणि जगलांचे वनस्पती आणि प्राणी याच्या पूर्ण वैविध्यांसह सरक्षण करण्याची गरज प्रतिपादन केली आहे.

---

आजच्या पर्यावरणविषयक प्रश्नाचे मूळ माणसाच्या मनोवृत्तीत आहे. ही मनोवृत्ती जोवर बदलत नाही, तोवर पर्यावरणाचा प्रश्न ' सुटला ' असं म्हणता येणार नाही. मनुष्येतर सर्व जीव-योनींचा विचार ' पर्यावरणा 'त अभिप्रेत आहे; तो जेव्हा होईल तेव्हाच हा प्रश्न सुटेल.



●

दिलीप कुलकर्णी

# मानवकेंद्री पर्यावरणनीतीत मूलभूत बदल आवश्यक

पाश्चात्यांच्या प्रभावामुळे वा आपल्याला जाणीव झाल्यामुळे म्हणा, पर्यावरण-विषयक दृष्टिकोन आता आपल्या येथेही तयार होत आहे. अनेक व्यक्ती व संस्था या दृष्टीने विचार व कार्य करण्यास पुढे येत आहेत. प्रदूषणाच्या प्रश्नाने आपल्याकडे पाश्चात्य देशांएवढे मोठे स्वरूप अजून धारण केलेले नाही हे खरे असले, तरी आपण वेगाने त्या दिशेने जात आहोत. त्याचबरो-बर प्रचंड प्रमाणावर होणारा वनविनाश ही आपल्यापुढची प्रमुख समस्या आहे. समस्या हाताबाहेर जाण्यापूर्वीच सोडविणे चांगले असल्याने, पर्यावरणविषयक तयार होत असलेल्या जाणिवेचे व दृष्टिकोनाचे स्वागतच केले पाहिजे.

या विषयावर प्रसिद्ध होणारे साहित्य मी शक्य तेवढे वाचतो. या वाचनातून अलीकडे मला असे वाटू लागले आहे की, आपला पर्यावरणविषयक दृष्टिकोन अधिकाधिक मानवकेंद्री होत चालला आहे. पर्यावरणाचा विचार करताना, असे वागणे हे ' पर्यावरण ' या शास्त्राशीच विसंगत आहे असे मला वाटते. हा मानवकेंद्री पर्यावरणविचार आपण जेवढ्या लवकर सोडू तेवढे चांगले.

आपला विचार ' मानवकेंद्री ' आहे असे मी म्हणतो तेव्हा त्यामागच्या कारणांचे थोडे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. पर्यावरणविषयक लिखाणात, भाषणात किंवा प्रदर्शनात जी माहिती सांगितलेली असते, तिच्यात मानवी मृत्यूची भीती ही प्रामुख्याने जाणवते. ' अमुक अमुक गोष्ट अशीच चालू राहिली तर त्यामुळे मानवी जीवनाला धोका उत्पन्न होईल ', अमक्या गोष्टीमुळे अन्न-धान्याचे उत्पादन कमी होऊन मानवांतील उपासमारी वाढेल ' अशा प्रकारची विधाने सतत डोळ्यांपुढे येतात. ' मानवाला ' अन्न मिळणार नाही, ' मानवाला ' प्रदूषित पाणी प्यावे लागेल, ' मानवाला ' इंधन मिळणार नाही अशा प्रकारची मानवकेंद्री, स्वार्थमूलक भूमिका हल्लीच्या पर्यावरण–विचारामागे आढळते आणि कारणांच्या बाबतीतच अशी मानवकेंद्री भूमिका गृहीत धरल्याने उपायही मानवकेंद्रीच राहतात. मानवाला इंधन मिळ-णार नाही म्हटल्यावर त्यावरचा उपाय म्हणून मानवाला अधिक चांगले इंधन देणारी झाडे लावली जातात. असे करताना आपण पर्यावरणाचा विचार कोठे करतो? पर्यावरण म्हणजे फक्त ' मानव ' का? इतर जिवांचा विचार यात येतच नाही की काय?

अलीकडेच रॅशेल कार्सन या अमेरिकन लेखिकेचे ' सायलेंट स्प्रिंग ' हे पुस्तक वाच-ण्यात आले. अन्नधान्याचे उत्पादन वाढण्या-साठी अमेरिकेत प्रचंड प्रमाणात कीटकनाशके वापरली गेली. त्यामुळे निसर्गातील जीवन-शृंखलेत या विषांचा शिरकाव झाला व परिणामतः पशु-पक्ष्यांच्या अनेक जाती नष्ट झाल्या. इतके करूनही किडीचा त्रास काय-मचा संपला का? – तसेही नाही. निर-निराळ्या किडी पिकांवर पडतच राहिल्या– काही नव्या, तर काही प्रतिकारशक्ती वाढून पुन्हा जोमदार झालेल्या. अन्नधान्याची पिके फस्त होतच राहिली. मग डीडीटीसारख्या आणि त्याच्याहून कैक पटींनी अधिक विषारी असणाऱ्या द्रव्यांचा आकाशातून पाऊस पाडून मानवाने काय साधले? वनस्पती, कीटक, पक्षी आणि मासे यांच्या संहाराचे ' सायलेंट स्प्रिंग ' मधील वर्णन वाचताना अंगावर काटा येतो. मानवाच्या गरजा भाग-वण्यासाठी इतर जिवांचा जगण्याचा हक्कही आपण नाकारणार का?

मी मानवकेंद्रीपणा म्हणतो तो याला. निसर्गतः असलेली मिश्र वने तोडून त्याजागी माणसाला (त्यांच्यातील एका गटाला) पैसा

**' माणूस 'चे दोन पर्यावरण विशेषांक (१० व १७ डिसेंबर) नुकतेच प्रसिद्ध झाले. जागेअभावी दिलीप कुलकर्णी व रवींद्र संगवई यांचे पर्यावरणविषयक दोन महत्त्वाचे लेख त्या अंकात प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. ते या अंकात दिले आहेत. –संपादक.**

मिळवून देणारी सागाची झाडे लावणे; डोंगरउताराचा विचार न करता तेथे रस्ते बांधणे हीसुद्धा मानवकेंद्रीपणाचीच उदाहरणे आहेत. पर्यावरणवादी अशा गोष्टींना विरोध करतात हेही मला मान्य आहे; पण हा विरोधही पुन्हा मानवकेंद्रीच असतो! मूठभराच्या हिताऐवजी सर्व मानवाचे हित पर्यावरणवादी पाहू इच्छितात, एवढाच काय तो फरक. याला फार तर 'व्यापक स्वार्थ' असे म्हणता येईल. हा 'पर्यावरणाचा' विचार खचितच नव्हे.

## पर्यावरणाचा विचार म्हणजे काय?

पर्यावरणाचा विचार म्हणजे निसर्गव्यवस्थेत सहभागी असणाऱ्या प्रत्येक दुव्याचा विचार. आपण जेव्हा 'निसर्गाची साखळी' असे म्हणतो, तेव्हा एकमेकांत गुतले गेलेले निसर्गघटक आपल्याला अभिप्रेत असतात. प्रत्येक घटकाचे इतर अनेक घटकावर असलेले अवलंबित्व आपल्याला अभिप्रेत असते आणि मनुष्य जोवर अशा प्रकारे इतर अनेक गोष्टींवर अवलंबून आहे, तोवर इतर घटकाचा विचारही तितकाच आवश्यक आहे.

विनोबांच्या 'मधुकर' मध्ये 'फायदा काय' नावाचा एक सुदर लेख आहे. आपल्या मानवकेंद्रीपणावर त्यात फार अर्थगर्भ टीका आहे. विनोबा लिहितात– 'हरएक गोष्टीचा फायदा पाहण्याची पुष्कळांना सवय जडून गेली आहे. सूत कातण्यापासून फायदा काय येथपासून स्वराज्य मिळण्यापासून फायदा काय येथपर्यंतचे सर्व प्रश्न विचारले जातात. ह्या फायदावादी लोकानी आपली फायदेशीर बुद्धी जरा पुढे चालविली तर ते तत्त्वज्ञानाचे शिखर गाठतील. तत्त्वज्ञानाच्या शिखरापासून हे लोक एकच प्रश्न मागे आहेत. तो प्रश्न म्हणजे 'फायद्यापासून तरी फायदा काय?' हा होय. एक मुलगा आपल्या बापाला म्हणतो, 'बाबा, गाई–म्हशीचा फायदा आपल्याला रोज प्यायला सापडतो, पण वाघ, सिंह, साप ह्यांचा काय हो फायदा? बाप उत्तर देतो, 'सगळी सृष्टी माणसाच्या फायद्यासाठी आहे असा आपला विनाकारण गैरसमज होऊ नये हाच त्यांचा फायदा.'

आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, मानव जन्माला येण्यापूर्वीच एक संतुलित निसर्गव्यवस्था अस्तित्वात आहे. मानव हा तिच्यातील एक घटक म्हणून जन्माला आला आहे. या निसर्गव्यवस्थेत मानवाइतकेच स्थान इतर वनस्पती, कीटक, प्राणी, पक्षी यानाही आहे. हा निसर्ग उपभोगण्याचा मानवाइतकाच त्यानाही अधिकार आहे आणि हा अधिकार सर्वांनी मान्य केला पाहिजे. माणसाला आपला जीव जितका प्यारा आहे, तितकाच इतर कोणत्याही प्राण्याला, पक्ष्याला किंवा झाडाला त्याचा जीव प्यारा आहे. त्यामुळे आपल्या कधीही पुऱ्या न होणाऱ्या गरजा भागविण्यासाठी इतर जिवाची हत्या करणे हा अक्षम्य गुन्हा आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' हे तत्त्व मी अमान्य करीत नाही; पण आपल्या सुखासाठी निसर्गातील इतर किती जिवाची हत्या करायची याला मर्यादा हवीच. जोपर्यंत आपण अपरिग्रहाचे (गरजा कमीत कमी करून संग्रहही कमीत कमी करण्याचे) पालन करीत आहोत, तोवरच 'जीवो जीवस्य जीवनम्' हे तत्व सागण्यात अर्थ आहे. या संबधात एक महत्त्वपूर्ण गोष्ट आपण पाहिली असेल. ती म्हणजे करमणूक म्हणून इतर प्राण्याची हत्या फक्त माणूसच करतो. इतर प्राणी हे करीत नाहीत. 'पोटापुरता पसा पाहिजे' ही वृत्तीच सर्व प्राणी दाखवितात.

या ठिकाणी एक गमतीशीर गोष्ट आठवली. 'धर्मयुग' साप्ताहिकात 'कार्टून कोना' असतो. त्यातला तो लुकडा माणूस आणि ढब्बूजी एका मेजवानीला जाणार असतात. लुकडा माणूस ढब्बूजीला विचारतो, 'काय ढब्बूजी, आज तुम्ही माणसाप्रमाण जेवणार की जनावराप्रमाण?' ढब्बूजी म्हणतो, 'जनावरांप्रमाण!' तो मनुष्य हातभर वर उडतो आणि आश्चर्याने विचारतो, 'ते का?' ढब्बूजी शांतपणे उत्तरतो, 'कारण जनावर पोट भरल्यावर खाणं बंद करत!'

'पोट भरल्यावरही खात राहण्याचा' असा प्रकार माणूस का करतो? आपण याचा कधी खोलवर जाऊन विचार करतो का? यामागे कोणते कारण आहे हे आपण पाहिले आहे का? पर्यावरणाच्या प्रश्नाचा आणि याचा खूप निकटचा संबंध आहे.

आपण करीत असलेल्या कृतीतून समाधान मिळावे, आनद मिळावा असा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. हा आनंद मिळवण्याची साधने म्हणजे आपली इद्रिये. ही सर्व इद्रियें बहिर्मुख आहेत. म्हणजेच बाहेरून येणाऱ्या संवेदनापासून ती अनुभव मिळवतात. 'अनुकूलवेदनीयं सुखम्' ही सुखाची व्याख्या. त्यामुळे ज्या ज्या वस्तूपासून अनुकूल हवासा वाटणारा अनुभव मिळतो, त्या वस्तूचा उपभोग घेण्याची मानवाची प्रवृत्ती आहे. त्यासाठी पैसा हवा. जास्त वस्तूचा उपभोग घ्यावयाचा तर जास्त पैसा हवा. या पैशाच्या हव्यासापायी सर्व प्रश्न उभे राहतात. भारत आणि पाकिस्तानमध्ये भाडण लावून देऊन अमेरिकेतील शस्त्रोत्पादनाचे कारखाने चालतात आणि मानवता, विश्वबंधुत्व, शांती, सहकार यासारख्या उच्च नैतिक मूल्यांना धाब्यावर बसवून जैविक युद्धे खेळली जातात. शत्रूचा प्रदेश वाळवंटून टाकला जातो! पर्यावरणाच्या या हानीविरुद्ध कोणी कोणाकडे दाद मागायची?

या ज्या 'पैसा' नामक वस्तूच्या मागे आपण धावतो, तिचा वास्तवपूर्ण विचार आपण कधी केला आहे का? या वस्तूची गंमत अशी आहे की, आपले सर्व जीवन तीभोवती फिरत असूनही निसर्गव्यवस्थेत पैशाला 'दमडी'चीही किंमत नाही! ज्या गोष्टीची जितक्या निकडीची गरज, त्या प्रमाणात सुलभतेने ती वस्तू निसर्गाने दिली आहे. सर्वांत मुख्य गरज हवेची. नाक असेल तेथे हवा आहे. नतर क्रमाक्रमाने पाणी, अन्न या वस्तू येतात. त्याची सुलभता त्या प्रमाणात कमी होत जाते. जर पैसा ही अत्यावश्यक गोष्ट असती, तर निसर्गाने हात असेल तेथे पैसा दिला नसता का? (आर्थिक संबधाचा विचार करून समाजाची घडी नीट बसवू म्हणणाऱ्या आणि जगापुढचे प्रश्न सोडवू म्हणणाऱ्या विचारवंताना हे कधी जाणवलेच नाही का? अर्थव्यवस्थेचा 'अर्थ' हा जो पाया, तोच अशा प्रकारे हवेत विरला की, त्यावरची इमारत ढासळण्यास अवधी कशाला? 'इकॉनॉमी' आणि 'इकॉलॉजी' या परस्परवर्ज्य किंवा परस्परांशी व्यस्त प्रमाणात असणाऱ्या गोष्टी आहेत. आपल्याला यांपैकी काय हवे आहे?)

या विवेचनावरून असे दिसून येईल की,

खरा आनंद कोणता हे ठाऊक नसल्याने हे सर्व घडते. उपभोगातून मिळणारा आनंद किंवा सुख आपण पराकोटीचे मानल्याने हे घडते; परतु 'सुखम् आत्यन्तिकम्' हे जर 'बुद्धिग्राह्यम् अतीन्द्रियम्' असेल, तर इद्रियांद्वारा सस्पर्शज ज्ञानातून मिळणारा आनंद निश्चितच कमी प्रतीचा मानावा लागेल आणि 'ये हि संस्पर्शजा भोगा दु.खयोनव एव ते' हे वचन आजची पाश्चात्य देशांची परिस्थिती पाहिल्यास खरे असल्याचेच दिसून येते. उतू जाईल एवढी समृद्धी असूनही आंतरिक समाधान किंवा आनद नाही हीच पाश्चात्य समाजाची खंत आहे

अपरिग्रहाच्या विचारापर्यंत आपण येऊन पोहोचतो ते यामुळेच. टिळकांनी 'गीता-रहस्यात'त 'सुखाचा अपूर्णांक' माडला आहे :

$$\text{मिळणारे सुख} = \frac{\text{सुखोपभोग}}{\text{सुखेच्छा}} = \frac{\text{पूर्ण झालेल्या गरजा}}{\text{असलेल्या गरजा}}$$

यात अंशापेक्षा छेद नेहमीच मोठा असल्याने अपूर्णांकाची किंमत नेहमीच शून्याच्या जवळ असते! आपला प्रयत्नही छेद कमी करण्याऐवजी अश वाढविण्याचा असतो. ते करताना सहाजिकच निसर्गसतुलन मर्यादेपलीकडे ढळते आणि त्यामुळेच पर्यावरणाचे प्रश्न उभे राहतात

सास्कृतिक उन्नती झाल्यामुळे माणसाच्या गरजा पशूपेक्षा वाढल्या आहेत, हे उत्तर यावर कोणी देऊ नये. शरीरधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्राण्याच्या गरजा सहज भागतील अशी व्यवस्था निसर्गात आहे. डास पकडण्यासाठी बेडकाना नायलॉनची जाळी लावावी लागत नाहीत, बेडूक मिळण्यासाठी सापाना बेडकाची 'अंडी उबवणीकेंद्रे' काढावी लागत नाहीत, गवत मिळावे म्हणून गाईंना जमीन नांगरून गवताचे बी पेरावे लागत नाही, की गाईंचे ताजे मास मिळावे म्हणून सिंहाना गोशाळा स्थापाव्या लागत नाहीत. बाकी सर्व प्राण्यांना त्यांच्या शारीरिक गरजा उपलब्ध करून देणारा निसर्ग माणसाच्या बाबतीतच कृपण होईल? (आणि इतकी 'सास्कृतिक उन्नती' होऊनही ९९ प्रतिशत माणसे अजूनही 'आहार–निद्रा–भय–मैथुन' यापलीकडे गेलेली नाहीत याकडे आपण सोयिस्कर दुर्लक्ष करीत नाही ना?)

हा दृष्टिकोन एकदा लक्षात घेतला आणि त्याप्रमाणे आचरण ठेवले, तरच पर्यावरणाचा प्रश्न सुटेल. आपल्या आजच्या 'गरजा' अपरिग्रहाची मर्यादा ओलांडून खूपच पुढे गेल्या आहेत, हे कोणासही मान्य व्हावे. पाश्चात्याचे भोगवादी तत्त्वज्ञानच याला, कारणीभूत आहे. एखाद्या देशाची 'प्रगती'ही दरडोई साखरेचा खप किंवा दरडोई इंधनाचा वापर अशा फूटपट्टीने मोजली जाते. गरजेपेक्षा अधिक वस्तूंचा उपभोग व संग्रह यामुळे वाढतो व या मनोवृत्तीचेच दूरगामी परिणाम होऊन निसर्गसतुलन ढळते. 'Nature is sufficient for man's need, but not for man's greed' असे गाधीजीनी म्हटले आहे. अपरिग्रहाची मर्यादा ओलाडल्यास–need संपून greed सुरू झाल्यास–सहाजिकच निसर्ग अपुरा पडतो आणि निसर्ग ही आपल्या पितामहाची संपत्ती असल्याप्रमाणे वागणाऱ्या माणसांकडून निसर्गसंहार सुरू होतो. स्तेयमूलक समाजरचनेचा पाया या वृत्तीमुळे बळकट होतो.

आजच्या पर्यावरणविषयक प्रश्नाचे मूळ या मनोवृत्तीत आहे आणि म्हणूनच ही मनोवृत्ती जोवर बदलत नाही, तोवर पर्यावरणाचा प्रश्न 'सुटला' असे म्हणता येणार नाही. मनुष्येतर सर्व जीव-योनीचा विचार 'पर्यावरणा'त अभिप्रेत आहे आणि तो जेव्हा होईल, तेव्हा'च' या प्रश्नाची तड लागेल. आपण जेव्हा सर्व जीव-योनीचा विचार करू, तेव्हा सहाजिकच पाश्चात्याचे बिनबुडाचे जडवादी तत्त्वज्ञान सोडून देऊन सर्वभूतात्मैक्याची शिकवण देणाऱ्या, अद्वैतवादी, आध्यात्मिक तत्त्वज्ञानाकडे आपल्याला वळावे लागेल पर्यावरणाचा मूलगामी विचार येथपर्यंत येऊन पोहोचतो. मानवाला दीर्घकालपर्यंत इंधन, शुद्ध हवा, पाऊस आणि कागद हवा म्हणून जंगले वाचवा म्हणणे, हे जडवादी, मानवकेंद्री तत्त्वज्ञान झाले. याउलट, निसर्गातील एक घटक म्हणून झाडाचे अस्तित्व कर्तव्यबुद्धीने मान्य करणे ही आध्यात्मिक दृष्टी झाली. सृष्टीतील विविधता कमी होऊन मानवाची करमणूक कमी होईल म्हणून सिंह वाचवा म्हणणे ही मानवकेंद्री दृष्टी झाली, तर सिंहांनाही माणसाइतकाच जगण्याचा अधिकार आहे या कर्तव्यभावनेने आणि आत्मौपम्यभावनेने सिंहांना न मारणे ही आध्यात्मिक दृष्टी आहे. अशा प्रकारे आपली वृत्ती जेव्हा होईल, तेव्हाच आजच्या स्तेयमूलक समाजरचनेला मूठमाती मिळेल आणि तेव्हाच पर्यावरणाचा प्रश्न खऱ्या अर्थानें सुटेल. पर्यावरणनीती ठरविणाऱ्याना आणि पर्यावरण-चळवळीत काम करणाऱ्याना इतक्या मूलभूत पातळीपर्यंत जाऊन काम करावयाचे आहे. पर्यावरणनीतीत हा मूलभूत बदल घडवून आणण्याची अपेक्षा पर्यावरण-चळवळीतील कार्यकर्त्यांकडून करावी का? □


माडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

–प्र. बा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक


# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

मूल्य : ३६ रुपये

# ही केवळ युवकांचीच मक्तेदारी...


## कमी खर्चात आयुर्विमा

लवकरच, तुमच्यावर अवलंबून असणारे माणूस घरात येईल. थोडक्यात, तुमचा विवाह होईल आणि यथावकाश तुम्हाला मुले होतील. कधी ना कधी, तुम्ही त्यांच्या संरक्षणासाठी आयुर्विमा पॉलिसी घेणारच आहात. मग, ती शक्य तो लवकर घ्या म्हणजे कमी खर्चात विमा घेता येईल. (वय कमी असतांना विम्याचा हप्ता कमी द्यावा लागतो.)

तरुण वय आणि उत्तम शरीर-स्वास्थ्य··· हीच आयुर्विमा उतरविण्याची उत्तम वेळ. आजारपणात अथवा वाढलेल्या वयात वाढीव विम्याचा हप्ता द्यावा लागेल. खाजगी अनामत योजना अथवा इतर बचतीच्या योजनांहून आयुर्विम्याचे निश्चित फायदे कोणते हे तुम्हाला आयुर्विमा एजंट नीट समजावून सांगेल.

व्यक्तिगत गरजा निभावणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या विमा पॉलिसी आहेत. उदा. हयातीनंतरचा विमा, हयातीतील विमा, वदलून घेता येणारा हयातीनंतरचा विमा इत्यादी. योग्य पॉलिसीची निवड करण्यासाठी तुम्हाला विमा-एजंट मार्गदर्शन करील. आजच त्याचा सल्ला घ्या अथवा नजिकच्या आयुर्विमा कार्यालयाशी अधिक माहितीसाठी संपर्क साधा.

भविष्यकाळातील वाढत्या गरजांसाठी आजच आयुर्विमा उतरवा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

पक्षाचे सामर्थ्य खच्ची होईल. शिवाय गुप्तपणे केल्याने तुम्हाला याचे श्रेयही मिळणार नाही. लपूनछपून हलाखीचे जीवन कंठावे लागेल. आमचा आदेश येताच शेवटी आत्महत्या करण्याचीही तयारी ठेवावी लागेल तुम्हास जमेल हे सारे ?'

विन्स्टन हे ऐकून गार पडला. तो म्हणाला 'होय. पक्ष नामशेष करण्यासाठी नाईलाजाने आम्ही हेही सारे करू.'

'पण आम्ही तुम्हा दोघांचा वियोग केला तर ?' ओब्रायनने विचारले.

'नाही !' विन्स्टनऐवजी ज्यूलियाच एकदम बोलली.

'ठीक आहे ! योग्य वेळी तुमच्याशी सपर्क साधला जाईल.'

काही दिवसांनी तीही वेळ आली. त्या वेळी विन्स्टन चौकात उभा होता. त्या सार्वजनिक चौकात भव्य व्यासपीठ उभे केले होते. सर्वत्र पताका लोबत होत्या. कापडी फलक सर्वत्र टागले होते. 'शत्रूचा नाश करा.' 'ओशिआनियाचा शत्रू– युरेशिया'; 'युरेशिया मुर्दाबाद' 'ओशिआनिया झिंदाबाद', 'एकच घाव – एकच धक्का. युरेशियाचा चक्काचूर' गेले आठ दिवस शासनाने ही प्रचारमोहीम हाती घेऊन युरेशिया विरोधी सप्ताह साजरा केला होता. युद्धाचा ज्वर सामान्यापर्यंत नेऊन भिडविला होता. आज त्याचा सागतासमारंभ. त्वेषपूर्ण भाषणे करण्यात प्रसिद्ध असलेला वक्ता व्यासपीठावरून बोलत होता. त्याच्या जिभेवरील विष लाउडस्पीकरमधून सर्वांच्या कानात ओतले जात होते. त्याच्या शब्दाचा तिखटपणा सर्वांना कवटाळून जात होता. भाषणातील जहालपणा सर्वांचा दाह करीत होता. नीच शत्रू ! हलकट शत्रू ! युरेशियाचा उल्लेख येताच जमावातून निषेधपर आरोळ्या उमटत. त्या संतापध्वनीत वक्त्याचे पुढील शब्द बुडून जात. अचानक एका किरकोळ माणसाने एक बोटभर कागद वक्त्याला दिला. बोलता बोलताच त्याने नजर टाकून त्यातील दोन-तीन शब्द वाचले. खंड पडू न देता त्याचे भाषण चालूच होते; पण...पण... आता भाषणात युरेशियाचा उल्लेख शत्रू म्हणून नव्हता, मित्र म्हणून होता. शत्रू होता इस्टेशिया ! नवीन शत्रू ! नवीन मित्र! पण भाषण तेच. फक्त नावे बदलली. ईस्टेशिया शत्रू तर युरेशिया मित्र झाला होता !

त्या गर्दीत ओब्रायनच्या हस्तकाने एक पुस्तक हळूच विन्स्टनला दिले. ब्रदरहूडची ती गाथाच होती. मजूरवस्तीतील 'त्या' दुकानावरील खोलीत तो ज्यूलियाबरोबर ते पुस्तक वाचत होता, अगदी निवातपणे. त्या मालकाचे किती उपकार ! किती उदारपणे ती खोली त्याने वापरावयास दिली होती. दोघानी मीलनाचे अनेक क्षण त्या खोलीत सुवर्णाचे करून टाकले होते !

त्या पुस्तकात गोल्डस्टीनने पक्षरचना, त्यांचे हेतू, कारणमीमासा, जनता व राज्यकर्ते याचे संबध, वगैरेची खरीखुरी तपशीलवार माहिती पुरविली होती. पक्षाचे दुष्ट हेतू उघडे पाडले होते. त्यात त्याने लिहिले होते की, 'सामाजिक सुधारणा होत होत शेवटी एक वेळ अशी येईल की, संपत्तीचे समान वाटप झालेले असेल. अशा वेळी सत्तेचे वाटप मात्र समान व्हावयास हवे अन् हे वरपासून खालपर्यंत असलेल्या सत्तेच्या साखळीपुढे व नोकरशाहीमध्ये अशक्य आहे. राज्यकर्ते व नोकरशाही जवळजवळ एकमेकात विलीन पावलेले असतात. यांच्या हातातील सत्ता अशा वेळी टिकूच शकत नाही. मग संपत्तीचे समान वाटपच होऊ न देणे हा विरुद्ध उपाय वापरावयाचा राज्यकर्त्यांना मोह होतो तोपर्यंत वैज्ञानिक प्रगतीमुळे व सर्वांच्या श्रमामुळे एवढी प्रचंड संपत्ती निर्माण झालेली असते की, कितीही कर लादले तरी खाली उरणारी सपत्ती बरीच असते. निदान सामान्य माणसाना स्वास्थ्य लाभू देण्याइतपत तरी. एकदा हे स्वास्थ्य लाभले की, माणसे सुखी होतात. सुखी माणसे मग आजूबाजूला बघतात. मूठभरांचे राज्य, सत्तेचे केंद्रीकरण हे दोष त्याच्या ध्यानात येतात. ही विसंगती दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातात. म्हणजे राज्यकर्त्यांच्या सत्तेत भागीदार निर्माण होणे अपरिहार्य ठरते. अशा वेळी सपत्ती सपेल असे स्वाहाकारी उद्योग सुरू करणे हितावह असते. युद्धजन्य परिस्थिती असणे हा एकमात्र उपाय अशा वेळी दिसतो, कोटयवधी रुपये अशा योजनावर ओतले जातात. शेवटी जी शस्त्रास्त्रे तयार होतात ती कालबाह्य म्हणून निकालात काढून काही दिवसांनी अधिक कार्यक्षम शस्त्रास्त्र–उत्पादनावर पैसा ओतला जातो. मुख्य म्हणजे या डावपेचाला जनता बळी पडते. राष्ट्रनिष्ठेच्या नावाखाली सामान्य माणसाला कसेही वाकवून राबविता येते. तो जादा कर भरण्यास कुरकुरत नाही, हा फार मोठा फायदा. यंत्रामुळे व जादा श्रमशक्तीमुळे पिरॅमिडसारख्या प्रचड वास्तू उभारणे, डोंगर फोडणे, बोगदे खणणे किंवा अगदी जागी खड्डे खणून पुन्हा ते भरणे, या प्रकारात श्रमशक्ती गुंतून राहते. ती राज्यकर्त्यांविरूद्ध वापरली जाऊ शकत नाही. प्रथम वस्तूचे प्रचड उत्पादन करून नतर त्याना अगदी आग लावून दिली तरी फार तर अतिरिक्त संपत्तीवर नियंत्रण ठेवता येईल; पण यात सत्ताधाऱ्याची साखळी टिकवून धरण्याचे सामर्थ्य असतेच असे नाही. युद्धसादृश्य परिस्थितीत मात्र सत्ताधाऱ्यांची आसने मजबूत ठेवण्याची ताकद असते. कारण अशा परिस्थितीत जनतेचा मानसिक विरोधच सपुष्टात येतो. पक्षाच्या सामान्य सभासदांकडूनही अशीच कष्टाची व राष्ट्रनिष्ठेची अपेक्षा ठेवली जाते; पण त्याचबरोबर तो निर्बुद्धपणे जीव ओतून पक्षध्येये साध्य करण्यासाठी कसे कार्य करतो हेही पाहिले जाते. अदृश्य शत्रूविरूद्ध सतत भय, द्वेष, राग, तिरस्कार या भावना जागृत ठेवल्या जातात. हे सर्व साधण्यासाठी युद्ध हवे. युद्ध नसेल तर ते उकरून काढले पाहिजे किंवा युद्धसदृश परिस्थिती घोषित केली पाहिजे.

पक्षाचे ध्येय सर्व जग पादाक्रांत करणे व त्यावर सत्ता चालविणे. यासाठी दोन प्रमुख गोष्टी मानल्या आहेत. कोठेही कुणाच्याही मनात स्वतत्र विचाराचा प्रादुर्भाव होणे अशक्य करणे व त्याचबरोबर एका क्षणात लक्षावधी माणसांना कसलीही पूर्वसूचना न देता ठार करणे ! या दोन हेतूवर आधारित

प्रचलित राज्ययंत्रणा उभी केली आहे. ही उद्दिष्टे जनतेपासून लपविली आहेत......'

पुस्तक वाचून झाल्यावर दोघेही सुन्न होऊन एकमेकाच्या अंगावर लोळत पडले होते. खालून मजूर-कुटुंबातील एका स्त्रीचे गाणे ऐकू येत होते. त्याच्या मनात आले; मजूर गाऊ शकतात, पक्षी गाऊ शकतात पण आपणास मात्र गाताच येत नाही. इच्छाच होत नाही. सर्व नैसर्गिक भावना मृत झाल्या आहेत काय? खरे म्हणजे आपण स्वतःच मृतप्राय आहोत. असून नसल्यासारखे. संपले आपले सारे.

तो म्हणाला, 'ज्यूलिया आपण मेलो आहोत. कशातच खरे म्हणजे अर्थ नाही.'

ती म्हणाली, 'होय रे! आपण संपलो आहोत.'

'होय, तुम्ही संपला आहात!!' अचानक खोलीत आवाज घुमला. विजेचा धक्का बसल्यासारखा तो उठून बसला. सावध नजरेने इकडे तिकडे पाहिले. मेंदूची विचारचक्रे सेकंदात वेगाने गरगरू लागली. तो ज्यूलियाला म्हणाला, 'हृया चित्रामागून आवाज येतोय.'

'होय, हृया चित्रामागून आवाज येतोय.' पुन्हा आवाज आला. चित्राचा खिळा भिंतीत ओढला गेला, आणि टांगलेले चित्र खाली पडले. त्यामागील टेलीस्क्रीनचा पडदा उघडा पडला.

ज्यूलिया म्हणाली, 'आता ते आपल्याला पाहू शकतील.'

'होय, आता आम्ही पाहू शकतो.' पुन्हा आवाज आला, 'मुकाट्याने खोलीच्या मध्यावर येऊन एकमेकांकडे पाठ करून मानेवर हात धरून उभे रहा. कसलीही हालचाल करू नका.' आवाजात जबरदस्त जरब होती. शिडीची दोन टोके खिडकीची काच फोडून आत आली. बाहेर हवेत एक हेलिकॉप्टर तरंगत होते. त्यातील पोलिसानी मशीनगनचा नेम धरून ठेवला होता. जिन्यावर धाडधाड पावले वाजू लागली. आता सर्व मार्ग खुंटले. गराडा पडला. शिडीवरून दोन पोलिसांनी आत उड्या टाकून प्रवेश केला. जिन्यावरून त्याचा अधिकारी आला. त्याचाच आवाज टेलीस्क्रीनमधून येत होता. तो आवाज ओळखीचा का वाटत होता, याचे कोडे विन्स्टनला उलगडले. अन् हा धक्का आतापर्यंतच्या प्रसंगावर सर्वात ताण करणारा होता. तो तोच होता. त्या दुकानाचा मालक! पण किती बदलला होता. त्याचे केस पांढरे नव्हते. चालताना तो वाकत नव्हता. चेहऱ्यावर सुरकुत्या नव्हत्या. नाक आखूड झाले होते. पस्तीशीच्या माणसाचा तो चेहरा होता. विन्स्टनला समजून चुकले; पण फार उशीर झाला होता. तो थॉट–पोलीस होता

¤

तो एका फळीवर जखडलेल्या अवस्थेत झोपला होता. शरीरात असंख्य ठिकाणी इलेक्ट्रोडस् व नळ्या खुपसल्या होत्या. डोक्याला तर फार ठिकाणी हे जाणवत होते. खोलीत कसलीतरी मोठमोठी यंत्रे होती. त्यावर, असंख्य बटणे, चाके, खटके, लुकलुकणारे दिवे, रंगीबेरंगी दिवे आणि बरेच काही होते. पांढऱ्या कोटातील शास्त्रज्ञ निर्विकारपणे आपले काम करीत होते.

आपल्याला केव्हा इथे आणले ते त्याला आठवेना. पकडल्यानंतर त्याचा अनन्वित छळ चालू होता. माराचे विविध प्रकार त्याने अनुभवले होते. उपास, फटके, चटके, ठोसे, चिमटे, चाप, या साऱ्यांचा त्याच्यावर पाऊस पडत होता. पावसाची एक सर येऊन गेली की दुसरी ... नंतर तिसरी ..., ..! असे सतत चालू होते. शरीराचा एकही भाग माराच्या तडाख्यातून सुटला नव्हता. शेवटी वेळेचे भान हरपले. मेंदूला समोरच्या कृतीचा अर्थ लावणे कठीण होऊ लागले. फटका–वेदना–किंकाळ्या या साखळीवरून वेडाच्या कड्यापर्यंत तो जाऊन पोहोचला. सर्वात धक्कादायक म्हणजे ओब्रायनने केलेली फसवणूक! विश्वासघात! मित्रद्रोह! प्रथम–पासून नाटक करीत आला होता तो सारा छळ त्याच्याच मार्गदर्शनाखाली झाला होता.

आता यातनाचे दुसरे पर्व सुरू! प्रगत विज्ञानाच्या साहाय्याने छळ. शरीराचे बाहेरून हाल केले. आता ते शरीरात वेदनेची रसायने ओतणार. कुठवर टिकाव धरावा! मृत्यू परवडला! पण तोही लवकर येऊ देणार नाहीत. तोपर्यंत ते पिचत ठेवणार. जमेल तेथवर सहन करून मनात विरोधी भावना जिवंत ठेवणे. मृत्यू येईपर्यंत हीच आपली जमेची बाजू! हेच आपले जीवन! हाच आपला त्यांच्यावरील विजय!!!

आता त्याना काय हवे? त्याना पाहिजे तसा कबुलीजबाब दिला नाही का? सभासदांच्या खुनाचा प्रयत्न, शासनविरोधी पत्रकांचे वाटप, सार्वजनिक निधीचा अपहार, लष्करी गुपिताची विक्री, शत्रूचा हेर, धर्माला मानणारा, सर्व काही त्याच्या मनाप्रमाणे कबूल केले. किती खोटे बोललो! एक गोष्ट मात्र सत्य. ते म्हणजे आपण पक्षाचे शत्रुत्व केले. हे खरे, तर मग बाकीचे काय खोटे? पक्षाच्या दृष्टीने गुन्ह्याची प्रत्यक्ष कृती झालीच पाहिजे असे नाही. नुसता तसा विचार हाही गुन्हा ठरतो. त्याने डोळे उघडले. ओब्रायन समोरच होता.

'विन्स्टन, तू म्हणजे वीणकामामधला एका चुकीचा टाका आहेस. म्हणून तुझ्यावर एवढे कष्ट घेत आहे. मी तुला आता प्रश्न विचारेन. त्याची उत्तरे मनापासून दिली पाहिजेस. खोटे बोललास, कळत नसल्याचा बहाणा करून अडाणी माणसाप्रमाणे बोललास किंवा गप्पच बसलास तर...!'

'तर काय?' विन्स्टनने कष्टाने विचारले. ओब्रायनने न बोलता यंत्रातील एक खटका सावकाश ढकलला. दुसऱ्या सेकंदाला विन्स्टनचे सर्व स्नायू आखडले. अवयव सांध्यातून तुटू पाहू लागले. शिरामधून उकळता रस वाहू लागला. पाठीच्या मणक्यातून जीवघेणी कळ उमटली. खटका मागे घेऊन ओब्रायन म्हणाला,

'फक्त चाळीस युनिटपर्यंतची ही वेदना आहे. आणि तबकडीवर शंभरपर्यंत आकडे आहेत' थोडे थांबून तो पुढे म्हणाला,

'पक्षाचे काळासंबंधी एक वाक्य आहे. ते कोणते?'

'जो भूतकाळावर नियंत्रण ठेवू शकतो तोच भविष्यकाळ नियंत्रित करू शकतो. अन् जो वर्तमानकाळावर नियंत्रण ठेवतो तोच भूतकाळावर नियंत्रण ठेऊ शकतो.'

'शाबास विन्स्टन! भूतकाळ कुठे असतो? अवकाशात? एखाद्या घन वस्तू–प्रमाणे?'

'नाही. तो कागदोपत्री व स्मृतीमध्ये असतो.'

'सर्व रेकॉर्डस् व सर्वांच्या स्मृती यावर आमचे नियंत्रण असते. म्हणजेच आम्ही भूतकाळ नियंत्रित करतो. खरे ना?'

'पण लोकाना आठवण्यापासून तुम्ही

कसे थोपवू शकाल? त्याच्या स्मृतीवर तुमचा ताबा कुठे आहे? माझ्या स्मृतीवर. तरी तुमचा ताबा कुठे आहे?'

'आमचा ताबा! आमच्या मते तुझ्या स्मृतीवर तुझा ताबा हवा. तो नाही म्हणून तर तुला येथे आणले. शिस्त लावण्याकरिता. पक्षाजवळ सत्य आहे. तू तुझ्या मनाला शिस्त लावलीस तर ते तुला दिसेल. तुला आठवते?. तू डायरीत लिहिले आहेस की, स्वातंत्र्याचा अर्थ स्वातत्र्य. २+२=४या गणितासारखाच.'

ओब्रायनने आपली चार बोटे उंचावली व तो म्हणाला,

'ही किती बोटे आहेत?'

'चार!'

'आणि पक्षाला जर पाच वाटत असेल तर मग किती आहेत?'

'तरीही चारच!'

विन्स्टनच्या शब्दांचा शेवट वेदनेत झाला. खटका पुढे ढकलला होता. तबकडीवरचा काटा एकदम ५५ पर्यंत गेला. शरीरातून घाम वाहू लागला. वातावरणातील हवा शोषली आहे असे त्याला वाटू लागले. तो घुसमटू लागला. पूर्वीसारखीच वेदना. पण आता त्याबरोबर हे घुसमटणे, ओब्रायनने खटला मागे घेतला व चार बोटे दाखवून विचारले,

'ही किती बोटे?'

'चार!'

तबकडीवरचा काटा ६० वर गेला,

'ही किती बोटे?'

'चार! चार!! किती वेळा सागू? चार!!!'

काटा पुन्हा झेपावला असला पाहिजे. दृष्टीसमोरील चारही बोटे थरथरल्यासारखी दिसत होती. तरीही ती चारच दिसत होती.

'किती बोटे विन्स्टन?'

'चार! थाबवा! थाबवा! चार!'

'किती बोटे?'

'पाच! पाच! पाच!'

'नाही विन्स्टन, तू खोटे बोलत आहेस. 'तू चारच बोटे दिसत आहेत,' असाच विचार करीत आहेस. पुन्हा बघ. किती बोटे?'

ओब्रायनच्या चार बोटाकडे पाहून तो म्हणाला,

'चार! पाच! चार! काहीही समजा-पण थाबवा आता हे सारे.'

ओब्रायनने खटका मागे ओढला!

'विन्स्टन, तू फार हळू शिकणारा आहेस.'

'पण मला चारच बोटे दिसत असताना खोटे बोललो तरीही बोटे चारच रहाणार. दोन अधिक दोन बरोबर चारच.'

'कधी कधी, विन्स्टन, याचे उत्तर पाच असू शकते, तीन असू शकते, काहीही असू शकते. तू प्रयत्न करावयास हवा. शहाणे बनणे एवढे सोपे नाही. आता पुन्हा बघू या.'

ओब्रायनचा हात खटक्यावर गेला. काटा ७० ओलाडून ७५ वर गेला. विन्स्टनने दात गच्च आवळून वेदना सहन करण्याचा प्रयत्न केला.

'किती बोटे विन्स्टन?'

'चार असावीत. शक्य झाले तर पाच देखील पहाण्याचा प्रयत्न करेन.'

'यातले तू काय पसंत करशील? खरे आहे ते पहाण्याचे का पक्षदृष्टिकोनातून पहाण्याचे?'

'अर्थात खरे तेच पहाण्याचे!'

या वेळी काटा ८० ओलांडून ८५ वर घुटमळला. तेथून ९० वर सरकला. डोळे मिटून घेतले, तरी बोटे दिसतच होती. पण चार नव्हती, असख्य होती. एकात एक मिसळत होती, एकाची दोन होत होती. त्याने मोजण्याचा प्रयत्न केला. पण जमत नव्हते. वेदनेची लाट ओसरली. डोळे उघडले. तरीही असख्य बोटे डोळ्यापुढे नाचतच होती.

'विन्स्टन, बोटे किती?'

'मला माहीत नाही. पण प्रामाणिकपणे सांगतो. चार, पाच, सहा, कितीही असतील, पण मला माहीत नाही.'

'उत्तम!' ओब्रायन म्हणाला, 'आम्ही पक्षाच्या शत्रूना प्रत्येक वेळी ठार करीत नाही. त्यांना फक्त बदलून टाकतो. त्यांचे शुद्धीकरण करतो.'

मधे काही वेळ गेला असावा. पहिल्या यत्राच्या जागी दुसरे यत्र आणून ठेवले गेले. अधिक चमत्कारिक दिसणारे.

'विन्स्टन, यावेळी तुला त्रास होणार नाही. पण तुझे सारे लक्ष माझ्यावर केंद्रित कर. माझ्या डोळ्यात पहा.'

खटके मागेपुढे झाले. चाके उलटसुलट फिरली. काटे तबकड्यांवर नाचू लागले. दिव्याची उघडझाप झाली. दुसऱ्या क्षणाला प्रचड स्फोटाचा आवाज त्याला ऐकू आला. आजूबाजूला कुठेच स्फोट झाला नसताना. डोळ्यासमोर लाख कँडलपॉवरचा दिवा पेटल्यासारखे वाटले. मेंदूत विचित्र काहीतरी झाले. नीट काहीच कळेना. तो आठवायचा प्रयत्न करू लागला. पण नीट सुसंगत आठवेचना. कुठेतरी स्मृतीत खड्डा पडला होता.

'विन्स्टन, घाबरू नकोस! मी तुला आत्ताच किती बोटे दाखविली होती?' ओब्रायनने चार बोटे दाखवून विचारले,

'चार!'

'ही पाच बोटे आहेत. तुला दिसत आहेत?'

'होय!' अन् खरोखरच त्याला आता पाच बोटे दिसू लागली होती. ओब्रायनने खूण केल्यावर यत्राच्या वायर्स सोडवून ती तेथून हलविली गेली.

'विन्स्टन, तू डायरीत लिहिलेस की, हे सर्व काय चालले आहे ते कळते. पण असे का आहे, ते कळत नाही. आता तूच सांग आम्हाला सत्ता का हवी?' ओब्रायनने विचारले.

विन्स्टनला वाटले, ओब्रायनच याचे उत्तर देणार की, पक्षाला स्वतःसाठी सत्ता नको असून केवळ समाजाचे आपल्या पद्धतीने भले करण्यासाठी सत्ता हवी. समाज हा दुर्बल व भित्र्या माणसाचा असल्याने त्यांना स्वातंत्र्य जतन करता येत नाही व सत्य पेलवत नाही. अशा वेळी अधिक बलवान माणसानी समाजाला गुगीत ठेवून, फसवून त्यांच्यावर राज्य केले तरच तो समाज सुखी होईल. स्वातंत्र्य व सुख ह्यातून बहुतेक माणसे सुखाचीच निवड करतात. राज्यकर्ते स्वातंत्र्याच्या मोबदल्यात सुरक्षितता व सुख देतात. म्हणून सत्ता हवी असते.

**'चार! पाच! चार! काहीही समजा – पण थांबवा आता हे सारे.'**

विन्स्टन म्हणाला, 'तुम्ही आमच्या भल्यासाठी राज्य करता अन् आम्ही राज्य करण्यास लायक नाही.'

'मूर्ख ! वाटेल ते बरळू नकोस. तू विचारपूर्वक बोलशील असे वाटले होते. ऐक लक्षपूर्वक. पक्षाला सत्ता हवी ती स्वतःसाठी ! केवळ स्वत.साठी !! संपत्ती, सुख, उपभोग असल्या गोष्टीत पक्षाला रस नाही. रस आहे तो फक्त सत्ता बाळगण्यात ! आम्हाला सत्ता हवी !! सर्वस्वावर निरंकुश सत्ता हवी !! इतिहासातील सत्ताधाऱ्यांपेक्षा आम्ही स्वच्छ विचार करतो. स्वत.ची फसवणूक करीत नाही. ढोंग करीत नाही. जर्मन नाझी व रशियन कम्युनिस्ट यांनी त्यांची कार्यपद्धत बरीच आमच्या जवळपास आणली होती; पण स्वत:चा खरा उद्देश ओळखण्याचे त्यांना धैर्य नव्हते. ते असे समजून चालले की, काही काळापुरतीच नाईलाजाने सत्ता हातात ठेवली पाहिजे. काही काळ वाटचाल केली, कोपऱ्यातील वळण संपले, की आलेच कल्पनेतील नदनवन ! आम्हाला असला भ्रम नाही. कोणीही सत्ता हातात घेतो ती नंतर त्याग करण्यासाठी नव्हे. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. सत्ता हे साधन नाही. सत्ता हे साध्य आहे. क्रांतीचे रक्षण करण्यासाठी हुकूमशहा अवतरत नसतो, तर हुकूमशाही आणण्यासाठी क्रांती घडविली जाते. छळाचे उद्दिष्ट हे 'छळ करणे' हेच केवळ असते. सत्ता मिळविण्याचे उद्दिष्ट सत्ताच असते. विन्स्टन, आम्ही सत्तेचे पुजारी आहोत. सत्ता हा आमचा देव आहे.'

ओब्रायनच्या चेहेऱ्यावरचे कठीण भाव एकदम नाहीसे झाले. तो शांत स्वरात पुन्हा समजावून देऊ लागला,

'आता सत्ता म्हणजे नक्की काय ते सांगतो. प्रथम हे लक्षात ठेव की सत्ता ही वैयक्तिक कधीच नसते. ती सामुदायिक असते कारण, एकट्या स्वतंत्र माणसाची सत्ता अत्यंत मर्यादित असते. तो इतर अनेक बाबतीत परावलंबी रहात असल्याने कधीच मुक्त नसतो. 'स्वातंत्र्यात गुलामगिरी आहे' हे पक्षाचे घोषवाक्य तुला माहीत आहेच. पण जर माणसाचा स्वतःचा एकटेपणा विलयास गेला, 'स्वत्व' नाहीसे केले, तो 'अहं' पासून मुक्त झाला आणि तो पूर्णपणे पक्षात विलीन पावला तर तो खरा 'सत्ताधीश' होईल व अमर होईल. आता दुसरी गोष्ट. खरी सत्ता ही माणसावर गाजविण्यात असते. अन् माणसावर म्हणजे त्यांच्या मनावर. आम्हाला नुसती शरणागती चालत नाही. कारण ती एक व्यावहारिक तडजोड असते. मनुष्याने मानसिकदृष्ट्याही शरण आले पाहिजे. त्याने मनातही विरोधी विचार आणता कामा नये. आमची इच्छा अशी आहे की, त्याच्या मनात मुळातच असा विरोधी विचार उद्भवता कामा नये. निर्जीव द्रव्यावरील सत्ता महत्त्वाची नाही. ती आम्ही मिळवल्यात जमा आहे.'

विन्स्टनला राहवेना. तो उसळून म्हणाला

'खोटे आहे ! तुम्हाला अजून हवामानावर नियंत्रण ठेवता येत नाही. गुरुत्वाकर्षणाच्या तत्त्वाविरुद्ध जाता येत नाही. रोगराई, वेदना, मृत्यू !'

ओब्रायनने त्याला हाताने खूण करून थोपविले. तो सांगू लागला,

'द्रव्यकणांवर आमचे नियंत्रण आहे, कारण आमचे माणसाच्या मनावर नियंत्रण आहे. वस्तुमात्राची स्थिती किंवा वास्तवता ही शेवटी मेंदूत असते. तुला हळूहळू सारे समजेल. आम्हाला अशक्य असे काही नाही. अधांतरी राहणे, अदृश्य होणे अशासारख्या गोष्टीही शक्य आहेत. मी मनात आणले तर साबणाच्या बुडबुड्यासारखा हवेत तरगू लागेन; पण मी तसं मनात आणीत नाही. कारण पक्षाच्या मनात तसे येत नाही.'

'तरीही शेवटी तुमची सत्ता त्रिकालातीत नाही. मनुष्य येण्यापूर्वी नव्हती. आणि विश्वातील या पृथ्वीवर अद्यापही नाही. आकाशातील तारे पहा. तुमच्या आमच्या आयुष्यात तिथे पोचण्यापलीकडच्या अतरावरती ते आहेत. असे अगणित तारे आहेत, तिथं तुमची सत्ता कुठे आहे ?'

'विन्स्टन, विश्वाचा व्याप केवढा ? ज्याच्या त्याच्या बुद्धीएवढा, मेंदूएवढा, मनाच्या विस्ताराएवढा. मन हेच खरे विश्व. मनापलीकडील बाह्यसृष्टीचा विचार करून काय उपयोग ? अन् तुला असे वाटते का, की आपण दूरच्या ताऱ्यावर पोहचू शकणार नाही ? पक्षाने मनात आणले तर तेही सहज शक्य होईल. तेवढे आमचे विज्ञान निश्चित प्रगतीपथावर आहे. माझी खात्री आहे की तू 'ही आत्मकेंद्रित विचारसरणी आहे' असे म्हणत असशील. खरे आहे ते. फक्त ती सामुदायिक आत्मकेंद्रित विचारसरणी आहे. माणसावर सत्ता म्हणजे त्याच्या मनावर सत्ता. आता मला सांग, अशी सत्ता कशी मिळवता येते ?'

'दुसऱ्यावर सक्ती करून, त्रास देऊन, दुःख देऊन, छळ करून.'

'बरोबर ! नुसता आज्ञाधारकपणा उपयोगाचा नाही. ती नुसती कृती असते. आज्ञापालन करताना त्रास झाला तरच कळते की तो स्वत.ची इच्छा पालन करतो आहे का पक्षाची इच्छा पालन करतो आहे. मनाची मूळची चौकट उद्ध्वस्त करून पक्षाला अनुकूल अशी त्याची पुन्हा जुळणी करण्यात खरी सत्ता आहे. हे करताना मनाच्या सर्व निष्ठा पक्षाकडे वळविण्यात इतर भावना आड येतात. त्यांचा विध्वंसही आवश्यक ठरतो. आईबाप व मूल, स्त्री व पुरुष, मित्र मित्र यांना जोडणारे सर्व दुवे आम्ही नष्ट केलेत. स्वतःच्या मित्रावर, पत्नीवर, मुलावर कोणीच विश्वास ठेवीत नाहीत.

भविष्यात तर ही नातीच नाहीशी झाली असतील. मुलांना त्यांच्या मातांपासून जन्मापासूनच दूर करून वाढविण्यात येईल. माणसांची कामभावना निपटून टाकली जाईल. सध्याच आमचे शास्त्रज्ञ यावर संशोधन करीत आहेत. जननद्रवाचा उत्सर्ग म्हणजे रेशन कार्डाचे नूतनीकरण करण्यासारखा उपचार ठरेल. पक्षाखेरीज कशावरच निष्ठा नसेल. पक्षप्रमुखाखेरीज कोणावरच प्रेम नसेल. शत्रूवर मिळवलेल्या विजयावेळी केलेल्या हास्याव्यतिरिक्त कोणतेच हास्य नसेल. कसलीच लालसा नसेल. फक्त सत्तेची वाढत जाणारी लालसा असेल.

शत्रूला तुडविण्यात आनंद सामावलेला असल्याने असे शत्रू कायम तुडविले जातील. नष्ट केले जातील. नसेल तर ते निर्माण केले जातील. कट, प्रतिकट, घातपात, विश्वासघात, अटक, छळ, पळवून नेणे, ठार मारणे, हे सर्व कधीही थाबणार नाही. दहशत व विजय हाच या नवीन जगाचा मूलभूत पाया असेल. गोल्डस्टीन ही व्यक्तिरेखा या जगात कायम जिवत रहाणार, पराभूत होण्याकरिता. गेली सात वर्षे शासनाने तुझ्याशी वागण्याचे जे नाटक केले ते असेच पिढ्यान् पिढ्या चालू रहाणार. अधिक

व्यवस्थितपणे. आम्ही असेच विजयामागून विजय मिळवीत रहाणार.

विन्स्टन, तू या साऱ्याला मान्यता देणार आहेस. अखेर तूही या अशा जगाचा एक अविभाज्य घटक बनणार आहेस.'

'मला नाही वाटत, तुमचे हे जग निर्माण होईल म्हणून. जर झालेच तर कधीतरी ते कोसळेल, नाश पावेल, तुमचा पराभव होईल. विश्वातील एखादे तत्त्व, एखादी शक्ती तुम्हाला अडवलेच.'

'तुला देव म्हणावयाचे आहे काय ?'

'नाही. मला माणसाच्या मनाची स्वयंभू मूलप्रेरणा म्हणावयाची आहे. तीच शेवटी तुमच्यावर मात करेल.'

ओब्रायनने थंडपणे बटनांशी चाळवाचाळव केली. विन्स्टनभोवतालचे बंध दूर झाले.

'विन्स्टन, समोरच्या आरशात आपले ध्यान पहा. शरीराची अवस्था आम्ही काय करू शकतो ते पहा. तुझ्या फासळ्या बघ, सुरकुतलेली त्वचा, त्यावरील जखमांचे डाग, अंगावरील घाण, उचकटलेली नखे हे सारे बघ. पडके दात बघ. हे तुझे शरीर पिचलेले आहे. कातडयाच्या पोत्यातील हाडाचे एक गाठोडे आहे. तुझ्या मनाची अवस्थाही आम्ही अशीच केली आहे. तू नुसता वेदनेने ओरडला नाहीस तर याचनेनं ओरडलास. तुझा आम्ही अपमान केला. तुझ्यावर थुकलो. तू तुझ्याच रक्तात, ओकारीत, मलमूत्रात गडबडा लोळलास. त्याची तुझ्या मनाला लाज वाटली नाही. तू आमची करूणा भाकलीस. तुझा स्वाभिमान नष्ट केला. तुझे मन शरीरासारखेच पिचले, मोडले. तू तुझ्या सर्व मित्राची माहिती आम्हाला दिलीस व त्यांचा विश्वासघात केलास. एखादी तरी कृती सांगशील काय की ज्यामुळे तुझे मन अभिमानाने भरून येईल ?'

ओब्रायन बोलताना विन्स्टनच्या चेहेऱ्यावर शरमेने व दुःखाने अश्रू ओघळत होते. तो हुंदके देत होता. पण ओब्रायनच्या शेवटच्या वाक्याने हुंदके थाबले. तो ताड्दिशी म्हणाला,

'होय, मी ज्यूलियाशी प्रतारणा केली नाही. तिच्यावर मनापासून प्रेम केले. माझ्या मनाचा हा कोपरा अजून पवित्र आहे. मला याचा अभिमान वाटतो.'

ओब्रायनचे डोळे बारीक झाले कपाळाला सूक्ष्म आठ्या पडल्या. थोडा वेळ तो काहीच बोलला नाही. अखेर तो म्हणाला.

'विन्स्टन, तुझ्यात सुधारणा आहे हे नक्की. पण ती बौद्धिकदृष्टया आहे. भावनात्मक सुधारणेस अजून वाव आहे. आता खरे सांग. बिग ब्रदर तुला आवडतो की नाही ?'

खोटे बोलण्याची मेंदूत ताकदच नव्हती. तो म्हणाला,

'नाही, मी त्याचा द्वेष करतो !'

'छान ! आता शेवटच्या अवस्थेतून तुला जावे लागेल. बिग ब्रदरशी नुसते आज्ञाधारक असून चालत नाही. त्याच्यावर प्रेमही करावे लागते.

खुर्चीला शरीर पट्टयानी पक्के जखडले गेले. डोक्यामागे रबरी पॅड घालून ते स्थिर ठेवले गेले. फक्त बुबळे तेवढी हलू शकत होती. समोरच्या टेबलावर एक विचित्र पिंजरा होता. त्याची एक बाजू अंतर्वक्र व माणसाच्या चेहेऱ्यासारखी होती. हा मुखवटा चेहेऱ्यावर बसविता येत होता पिंजऱ्यात दोन कप्पे होते. कशासाठी हे ?

पूर्वी यातनांची परमावधी झाली होती. आता यापेक्षा अधिक काही असू शकेल ? तेवढयात ओब्रायनने पिंजरा नीट दिसेल असा फिरविला. पहिल्या कप्प्यात बरेच उंदीर होते. सर्वांचा अर्थ मेंदूत लागावयास एक क्षणच लागला..

दुसऱ्या क्षणी विन्स्टनच्या मनात भीतीचा ज्वालामुखी उसळला. अंगातून घामाचे थबथबे वाहू लागले. विस्फारलेले डोळे खोबणीतून बाहेर पडण्याची धडपड करू लागले. आतापर्यंतच्या यातनावरील हा कळस होता.

'आम्ही पूर्ण विचार केला आहे नुसत्या वेदनेला अर्थ नाही. कित्येकदा त्यालाही माणसे मरेपर्यंत टिकाव धरतात. तरीही प्रत्येकाचा कोणता ना कोणता तरी भयगंड हा असतोच. तिथे तो माघार घतो.'

विन्स्टन रडू लागला.

'प्रत्येकाला आपले हे न्यून माहिती असतेच असे नाही. कुणी पाण्याला भितात, कुणाचे उंचावरून पाहताना डोळे गरगरतात, कुणी अधाराला भितात. विन्स्टन तुझा भयगंड 'उंदीर' हा आहे.'

होय ! त्याना माहोत झाले हे तो समजून चुकला. त्याच्यासमोर तो हतबल होता पण आता ? मृत्यू परवडला पण हे नको. उंदराबद्दलची भीती त्याच्या मनात खोलवर रुतून बसली होती.

ओब्रायनने सावकाश पिंजरा चेहऱ्यासमोर आणला, क्षणभर त्याला भोवळ आली. पिंजरा चेहेऱ्यावर बसविला गेला. भीतीच्या डोहात तो गटागळ्या खाऊ लागला.

'लक्षात ठेव ! हे उंदीर रानटी व भुकेलेले आहेत.'

श्वास बंद पडून तो गुदमरू लागला.

'मधले दार उघडताच दुसऱ्या कप्प्यातून येऊन ते तुझ्या चेहेऱ्यावर हल्ला चढवतील.'

शरीराने उसळी मारून बाहेर पडायचा निकराचा प्रयत्न केला.

'तुझ्या गालाला बीळ पाडून तोंडात ते शिरतील व तुझी मऊ जीभ ते खाऊन टाकतील.'

श्वास थांबला ! नाडी थाबली ! !

'तुझ्या डोळ्यात भोक पाडून तेही खाऊन टाकतील'

आता अखेर हृदयही थाबले ! भीतीच्या महासागरात तो तळाशी गेला.

ओब्रायनने कप्प्याच्या दाराचा खटका दाबला...क्लिक...!

दुसऱ्या क्षणाला हृदय जोरात चालू झाले. नाडीची घोडदौड सुरू झाली. अन् अखेर तो एकवटून किंचाळला,

'नो...! नो...थाबवा. थांबवा. तुम्ही म्हणाल ते मान्य आहे. सागाल ते करीन. अगदी मनापासून, माझ्यावर विश्वास ठेवा वाटल्यास... वाटल्यास हीच शिक्षा तुम्ही ज्यूलियाला दिली तरी हरकत नाही, मग तर तुमचा विश्वास बसेल ना ? पण मला नको. नको. दूर करा हे उंदीर.'

**'नो...! नो...थांबवा. तुम्ही म्हणाल ते मान्य; सांगाल ते करीन, माझ्यावर विश्वास ठेवा.'**

एकदम काळोख झाला. अंगाखालच्या खुर्चीतून तो खाली कोसळत होता. सर्व इमारतीमधून तो खाली गेला. पृथ्वीतून आरपार जाऊन तो अतराळात कोसळू लागला. ग्रहमाला, तारे, आकाशगगा, तारकाचक्रे ह्यातूनही तो कोसळतच राहिला. चेहेऱ्यावरच्या पिंजऱ्यासह ओब्रायन तरी त्याच्याबरोबर शेजारीच होता. आता सर्व विश्व संपले नुसती पोकळी उरली. अंधार...! विन्स्टन बेशुद्ध झाला. खट्! चेहेऱ्यावरून पिंजरा निघाला.

¤

नेहमीप्रमाणे विन्स्टन कॅफेमध्ये जीन पीत बसला होता. सध्या त्याचे कामही बदलले होते. शब्दकोशाची अकरावी आवृत्ती तयार करण्यासाठी असंख्य समित्या नेमल्या होत्या. त्यातल्या एका उपसमितीवर तो होता. आठवड्यातून दोनदा मिटिंग. काम थोडे पैसे भरपूर. उरलेला वेळ तो येथे घालवीत होता. कॅफेतील टेलीस्क्रीनवर चाललेले संगीत थावले. थोड्याच वेळात एक महत्त्वाचे निवेदन ऐकण्यासाठी तयार रहा म्हणून सांगितले गेले. त्याला वाटले, युरेशियाशी युद्ध चालू होते त्यासंबंधी बातमी असणार. त्याने डोळे मिटले. पापणीच्या आतल्या बाजूवर आफ्रिकेचा नकाशा उमटला. ओशियानियाच्या साम्राज्यात एक जाड काळा बाण नकाशावरून खाली येत होता. आपले सैन्य कोंडीत सापडले होते. दुसरा पाढरा जाड बाण काळ्या बाणाला छेदू पहात होता. काय होईल? कदाचित आपला पराभव? सर्व संपणार? स्वत.बद्दल त्याच्या मनात आले. पक्षरूढीप्रमाणे त्याचा मृत्यू पक्षाने ठरविल्या वेळीच होणार. कितीही दिवसांनी होईल कुठेही होईल. कॉरिडॉरमधून सहज जाताना ही मागून गोळी घातली जाईल

पूर्वी त्याला वाटले होते, कदाचित त्या क्षणी काही सेकंद जरी अगोदर किंवा गोळी घातल्यावर शुद्ध हरपण्यापूर्वी एकदा निमिष जरी मृत्यूची जाणीव झाली तरी पुरेसे आहे. त्या क्षणात त्या निमिषात पक्षाविरुद्ध जपून ठेवलेला द्वेष उफाळून येईल. गुडाळलेली स्प्रिंग उलगडेल! द्वेषाच्या ज्वालामुखीचा स्फोट होईल! कारण आता वरचे कवच नष्ट झाले असेल! कुणाचेही दडपण–धाक–ताण नाही. मृत्यूचा हा क्षण अगदी सेकंदाचा हजारावा हिस्सा असला तरी–रत्नमोलाचा ठरेल! कारण हेच जीवन असेल! मुक्त जीवन असेल! त्यांचा द्वेष करीत मरणे हेच स्वातंत्र्य! ह्यातेच त्याचा १०० टक्के पराभव आहे! फक्त त्यासाठी शरणागती पत्करून काही काळ त्याच्या मर्जीप्रमाणे वागले पाहिजे. विचार केला पाहिजे तोपर्यंत मनात खोलवर, कोपऱ्यात ही द्वेषाची ठिणगी जिवत ठेवली पाहिजे. ऐनवेळी या ठिणगीचे वणव्यात रूपांतर होईल.

पण त्यानी ही शक्यता सुद्धा हिरावून घेतली. त्याच्या मनाचे कोपरेन् कोपरे सर्चलाईट मारून पाहिले व स्वच्छ केले. त्यांना हवी होती तशीच त्यांनी त्याची पुनर्रचना केली. तो आता पक्षाचा व बिग ब्रदरचा कधीच द्वेष करू शकत नव्हता. पक्षद्वेष निर्माण होणेच अशक्य केले होते. त्याचे मनोविज्ञान किती प्रगत झाले होते! मोठ्या भिंगातून एखाद्या किड्याचे निरीक्षण करावे तसे थॉट-पोलीस गेली सात वर्षे त्याच्या आयुष्यावर नजर ठेवून होते. सात वर्षातील सर्व घटना त्यानी व्यवस्थित रेखित करून ठेवल्या होत्या. विन्स्टनला दाखविल्या होत्या. त्याचे मित्राबरोबरचे संभाषण, चौकातील ज्यूलियाबरोबरचे संवाद, तिच्याबरोबरची एकांतातील गोड कुजबूज, अगदी शृंगारातील उत्कट क्षणी तिने केलेले चित्कार, सर्व काही स्पष्टपणे साऊंड–ट्रकवर होते तिच्याशी झालेली पहिली टक्कर, झुडपाआडील भेटी, सकेतस्थळावरील प्रणयचेष्टा, चेहेऱ्यावरील सूक्ष्म हावभाव या सर्वांची फिल्म घेतली होती. त्याचा प्रत्येक शब्द, प्रत्येक कृती, मनातील विचारही त्यांच्या तडाख्यातून सुटले नव्हते. फार काय डायरीवर ठेवलेला विवक्षित जागेवरील बारका पांढरा खडाही त्यानी पुन्हा जसाच्या तसा ठेवला होता. केवढी ही कार्यक्षमता! किती सार्थ नाव! थॉट–पोलीस! तो त्याच्याबरोबर फार काळ मनात देखील कढूच शकला नव्हता. मनाच्या नीतिमूल्यावर ताबा ठेवला होता तोही अखेर भासच होता. नतर ज्यूलिया अचानक बागेत भेटली होती. फार बोलणे झालेच नाही. पण ती म्हणाली होती.

'आपली शरणागती सिद्ध करण्याकरिता आपण प्रिय व्यक्तीचा बळी देण्यास तयार झालो, ते केवळ भीतीपोटी नव्हते. मुळात मनात ही इच्छा कुठे तरी दडलेली असली पाहिजे. त्या क्षणाला ती पृष्ठभागावर आली एवढेच.' अखेर आपल्या प्रिय ज्यूलीचाही आपण विश्वासघात केला! किती तकलादू आपली नीतिमूल्ये!

त्यानी मनाचा एकेक पापुद्रा सोलून काढला. आतला किडका गाभा दूर केला. आत मन कसे स्वच्छ होते रिकामे होते, कोरे होते. चला संपले सारे!

छे! अजून फक्त थोडेच बाकी राहिले होते. त्याच्यात सुरू झालेली बदलाची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. टेलीस्क्रीनवर चाललेले मद सगीत थाबले. बँड वाजू लागला. ट्रंपेटचा आवाज कानठळ्या बसविणारा होता. कॅफेमधील वेटरही आपले काम थाबवून पाहू लागले. 'फ्लॅशन्यूज' निवेदन सुरू झाले. निवेदकाचा आवाज उत्तेजित झाला होता. बातमी आली. युद्धाची बातमी. अखेर आफ्रिकेत आपल्या फौजानी शत्रूवर विजय मिळविला होता! सपूर्ण विजय! कॅफेतून रस्त्यातून लोकांनी आनंदानं प्रक्षुब्ध होऊन आरोळ्या ठोकावयास सुरुवात केली. त्याच्या गोंगाटात शब्द अर्धवट ऐकू येत होते. 'गुप्तपणे आरमाराने मागून घाव घातला...अजोड युद्ध कौशल्य...तिन्ही दलाचा उत्कृष्ट मेळ... शत्रू समूळ उखडला...पाच लाख युद्धकैदी. ढासळलेले मनोधैर्य...सर्व आफ्रिका ताब्यात ...विजय...मानवी इतिहासातील परमोच्च विजय..!'

टेलीस्क्रीनमधून बाहेर आवाज ओतला जात होता. किती सैनिकांची कत्तल केली, किती जणांना वेठबिगार छावण्यात पाठविले जात आहे, वगैरे आकडे निवेदक हर्षाने वाचत होता. लोकाचे जमाव आनदाने रस्त्यावर नाचत होते.

पण विन्स्टनच्या पायात मात्र गोळे आले होते. त्याच्यात कोठेतरी फार मोठा बदल होणार असल्याची ती चिन्हे होती. ओब्रायनने केलेली मानसिक प्रक्रिया अजून संपली नव्हती. विन्स्टनच्या मनाच्या लंबकाचे एक टोक सात वर्षापूर्वी बिग ब्रदरपासून खूप दूर गेले होते. आंदोलन पावणारा हा लंबक ओब्रायनने कष्ट घेऊन मध्यभागी आणून स्थिर ठेवला होता. कुणी सागावे, पराजयाची बातमी आली असती तर विन्स्टनच्या विरोधी मनाने पुन्हा आंदोलने घेण्यास सुरुवात केली असती

काय ? तसे शक्यच नव्हते. ओब्रायनची मेहनत नक्कीच वाया जाणार नव्हती. पण अजूनही काही तरी राहिले होते. नुसती तडजोड नको, नुसते यांत्रिक आज्ञापालन नको, नुसती मानसिक अनुकूलता नको, मन आणखी एक पाऊल पुढे गेले पाहिजे व तेही स्वत: होऊन, अगदी आपोआप व नैसर्गिकपणे.

अखेर तो निर्णायक क्षण आला. बदल, शेवटचा बदल विन्स्टनमध्ये घडून आला. पहाता पहाता तो स्वप्नात गेला. एक सुखद स्वप्न ! ओब्रायनसमोर तो परत आला होता. त्याचे पूर्वीचे अपराध विसरले गेले होते. त्याचा आत्मा शुद्ध झाला होता. तो अपराधाची जाहीर कबुली देत होता. पांढऱ्या टाइल्सच्या भिंती असलेल्या कॉरिडॉरमधून जाताना त्याला कोवळ्या सूर्यप्रकाशातून चालल्यासारखे वाटत होते.

तो भानावर आला. त्याचे सर्व शरीर थरथरत होते. हातातला ग्लास सांडला. त्याचे मन त्याच्या नकळत आनंदाने नाचत होते. मान वर करून बिग ब्रदरच्या भव्य पोस्टरकडे त्याने पाहिले. बिग ब्रदर ! जणू पृथ्वीच्या चौथऱ्यावर उभा असलेला भव्य पुतळा ! आशियातील लोकांच्या आक्रमणाच्या प्रचंड लाटा या पुतळ्यावर आपटून निष्प्रभ झाल्या. दहा मिनिटांपूर्वीच येणाऱ्या बातमीबद्दल केवढा संशय मनात निर्माण झाला होता ! आपल्यापेक्षा बिग ब्रदर लक्ष लक्ष पटींनी सामर्थ्यवान आहे ! सत्य हे सामर्थ्यवान नसते काय ? तो नेहमीच बरोबर असला पाहिजे. एक चुकेल; पण अनेकांचा मिळून बनलेला पक्षाचा मेंदू कधी चुकेल काय ? आपलेच चुकत होते. बिग ब्रदरच्या चेहेऱ्यावरील मिशांखालील गूढ हास्य व त्याचा अर्थ इतक्या वर्षांनी त्याला उलगडला. आपल्याला सर्व समजावयाला इतकी वर्षे लागली ? चाळीस वर्षे ! ओ......! किती आपण मठ्ठ ! त्यांना आपण केवढा त्रास दिला ! त्यांनी आपल्यासाठी किती तसदी घेतली ! त्याच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले. जाऊ दे ! आता सर्व काही ठीक होईल. अखेर झगडा संपला नि त्याने विजय मिळविला, स्वत:वर ! शेवटी त्याला बिग ब्रदर आवडू लागला !! अगदी मनापासून !!!

# अज्ञातवासातला राजा बॉबी फिशर

श्रीकृष्ण रानडे

निरनिराळ्या असंख्य अफवा, त्यातून बांधलेले अंदाज व बॉबीच्या अनोख्या जीवनाची कहाणी हॉवर्ड ह्युजेसच्याच चमत्कृतिपूर्ण जीवनाशी स्पर्धा करू शकेल अशी आहे. प्रचंड लोकप्रियता, सहज आवाक्यात असलेली अमाप संपत्ति यांच्याकडे पाठ फिरवून बॉबी फिशर अज्ञात झाला या गोष्टीला दहा वर्षे झाली.

निरनिराळे असंख्य लोक, वार्ताहर, वकील व चहाते बॉबीच्या मागावर आहेत; परंतु त्यांच्या दुर्दैवाने फिशरने त्यांना स्वत:चा पत्ता अजिबात लागू दिलेला नाही.

परंतु बुद्धिबळजगतात मात्र फिशरचे आख्यान अजूनही प्रत्येक बुद्धिबळ-रसिकाच्या हृदयात जिवंत आहे. जेथे जेथे दोन किंवा अधिक हाडाचे बुद्धिबळखेळाडू एकत्र येतात तेव्हा अगदी ताजी फिशर-अफवा एकमेकांना ऐकविली जाते. अतिशय आत्मीयतेने त्याच्या गाजलेल्या खेळ्या पुन्हा खेळल्या जातात आणि मग अगदी अपरिहार्यपणे प्रत्येकाच्या मनातील एकच प्रश्न उसळी मारून बाहेर पडतो.

'१९७२ साली जगज्जेता झालेला हा अमेरिकन, जो आतापर्यंतच्या झालेल्या सर्व बुद्धिबळ खेळाडूंत अद्वितीय समजला जातो तो बॉबी पुन्हा एकदा तरी बुद्धिबळपटावर प्रतिस्पर्ध्याबरोबर मुकाबला करेल का ?'

सर्वसाधारणपणे बोलताना कोणालाच असे वाटत नाही की, बॉबी पुन्हा बुद्धिबळ-स्पर्धेत भाग घेईल. आता सगळ्या बुद्धिबळ-खेळाडू व वार्ताहरांचे डोळे लागले आहेत जागतिक बुद्धिबळस्पर्धेतील कोर्चनाय कास्पारोव्ह व स्मिसलॉव्ह–रिबली ह्यांच्या सामन्याकडे५ परंतु स्वप्नरंजनात दंग असलेल्या, आशावादी फिशर-चाहत्यांना मात्र स्वप्ने पडतात की, बॉबी एखाद्या ग्रॅन्डमॉस्टर-स्पर्धेत उतरत आहे !

पसाडेना ही अमेरिकेतील लोकांना माहीत असलेली फिशरची जनसंपर्कापासून दूर रहाण्याची जागा आहे. काही वर्षांपूर्वी जेव्हा येथे बुद्धिबळस्पर्धा चालू होती तेव्हा मात्र एका बुद्धिबळ खेळाडूने बॉबीला बरोबर ओळखले. स्पर्धेनजीकच्याच एका कॉफीशॉपमध्ये फिशर लोकांना अजिबात ओळखता येणार नाही अशा पायघोळ कोट, काळा चष्मा, दाढी व डोळ्यांवर ओढलेली हॅट या वेषात बसलेला होता. स्मिमित झालेल्या चाहत्याने जेव्हा बॉबीला गाठण्याचा प्रयत्न केला तेव्हा तत्क्षणी बॉबीने तेथून पलायन केले. अशा शपथेवर सांगितल्या जाणाऱ्या कथा मुळीच अशक्य नाहीत; परंतु ह्याही-पेक्षा सुरस व चित्रविचित्र वैचित्र्यपूर्ण फिशर-कथा ऐकविण्यात येतात. त्याचे जवळचे मित्र व माहितगार असे सांगतात की, त्याची जीवनपद्धति चमत्कारिक जरूर आहे.



**बॉबी फिशर**
**त्यानं दंतकथा निर्माण केल्या**

तो [illegible] स्वतः मोटार चालवीत नाही. त्याचेकडे फोन नाही, जवळ एक कपर्दिकही नाही. फक्त जवळ आहे, एक उरलेली मैत्रीण. ही पसाडेनात राहाणारी मैत्रीण मेट्रन ( परिचारिका ) म्हणून काम करते. ही बॉबीच्या सर्व पत्राची छाननी करते. त्याची सर्व माडी भरते, आणि त्याच्या प्रत्येक घटकेच्या वास्तव्याची माहिती फक्त तिलाच असते. गेली दहा वर्षे फिशर तिच्या सर्व सुखसोईंनी युक्त अशा घराच्या तळघरात मुक्काम ठोकून आहे. हे तिचे घर एका टेकडीनजीक असून येथील स्वस्त घरातच ह्या घरची गणना होते. कधीकधी मात्र फिशर येथून उठतो तो थेट लॉसएंजल्समध्ये टपकतो. तेथे छोटया छोटया हॉटेलातच तो मुक्काम करतो.

फिशर गुप्ततेच्या बाबतीत जवळजवळ पराकोटीला पोचलेला माणूस आहे असे म्हटले तरी चालेल. बॉबी अविवाहित असून आपली गुप्तता फुटेल ह्या भीतीने कोणी मैत्रिणीही जोडत नाही. त्याचे जे काही मूठभर बुद्धिबळमित्र होते त्यांच्याशीही फिशरने रागाने संबंध तोडून टाकले आहेत. कारण ते मित्र फिशरबाबत वर्तमानपत्रांबरोबर चर्चा करतात. असे म्हणतात की, फिशरला दाट संशय येतो की, अजूनही तो रशियन नजरेखाली असावा आणि कदाचित केजीबीला त्याचा खून करावयाचा आहे. फिशरची वार्ताहरांबद्दलची नावड तर सर्वश्रुतच आहे. संपूर्ण भूमिगत होण्याच्या आधी सुद्धा तो वार्ताहरांवर रागवत असे, त्याना धमकावीत असे आणि कधी कधी त्याना दगड मारण्यासही कमी करत नसे !

प्राथमिक शाळेतील शिक्षक रॉन ग्रॅास, ४७ हा फिशरच्या जुन्या मित्रांपैकी एक आहे. एक वर्षापूर्वी मासेमारीच्या छंदासाठी फिशरसमवेत तो मेक्सिकोत गेला होता, हाच फिशरबाबत मिळणाऱ्या माहितीचा शेवटचा दुवा. तो म्हणतो की, बॉबीचा दिवस बहुतेक पुढील त्याच्या तीन उत्कट आनंदाच्या गोष्टीत विभागला जातो. व्यायाम, बुद्धिबळ व राजकीय तत्त्वज्ञान. त्याच्या राजकीय तत्त्वज्ञानाप्रमाणे एक गुप्त राजकीय सरकार जे ज्यूच्या वर्चस्वाखाली आहे व त्याचे केंद्रस्थान मास्को असून तेथूनच जगाचा कारभार चालतो.

बॉबी पहाटे झोपी जातो ते थेट दुपारपर्यंत ! त्यानंतर त्याच्या जागेत किंवा व्यायामशाळेत जाऊन तो व्यायाम घेतो. त्याच्या राहण्याच्या खोलीत जिकडे तिकडे बुद्धिबळाची पुस्तके विखुरलेली असतात. ताज्या सत्र्यानी भरगच्च भरलेल्या पिशव्या इकडे तिकडे पडलेल्या असतात. व्हिटॅमिनच्या बरण्या व भारतीय काष्ठौषधी औषधानी खोली तुडुब भरलेली असते. तो जिकडे जाईल तिकडे त्याची ही आरोग्यसाधने त्याच्याबरोबर असतात. कारण बॉबी डॉक्टरावर विश्वास ठेवीत नाही. त्याबरोबरच त्याच्या चेहऱ्यावरील असलेले तीन मोठे केसाळ मस काढण्यासही तो सदैव नकार देतो.

दुपारी उठल्यानतरचा मग सगळा दिवस तो एकटाच काढतो. स्वतःबरोबरच तो बुद्धिबळ खेळत बसतो. मध्येच उठून जुन्या पुस्तकांच्या दुकानात जाऊन कारस्थानकथा आणि बुद्धिबळ-पुस्तके चाळत बसतो. तेथून उठून मग सार्वजनिक ग्रंथालयात जाऊन त्याच्या स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानावर संशोधन करीत बसतो. फिशरला त्याचे स्वत.चे राजकीय तत्त्वज्ञान आता बरवर तरी त्याच्या बुद्धिबळप्रेमापेक्षाही आवड लागले आहे असे वाटते.

अमेरिकेत प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार बॉबी सपूर्ण शरीर झाकणारा कोट घालून पसाडेनामध्ये मोटारी ठेवावयाच्या सार्वजनिक जागेतून रात्री-बेरात्री हिंडताना दिसला. तेव्हा तो त्याच्या स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानाची पत्रके वाटत होता. त्याच्या पत्रकात त्याने लोकाना शनीच्या गुप्त राजकीय सरकारच्या अदृश्य शक्तीपासून जागरूक रहाण्याचा इशारा दिला आहे.

## धक्का-तंत्र

ग्रॅास म्हणतो की, बॉबी पक्का उजव्या बाजूचा असून तो फॅसिस्ट आहे. त्याचे राजकीय बायबल म्हणजे

प्रोटोकॉल्स् ऑफ द् एल्डर्स ऑफ झिऑन (Protocals of the Elders of Zion.) त्याच्याजवळ हिटलरच्या दुर्मिळ छायाचित्राचा संग्रह आहे. तो ज्यूचा उल्लेख नेहमीच तिरस्काराने करतो. काळ्या लोकांबद्दल जरा ज्यूपेक्षा थोडे बरे मत फिशरचे आहे. अर्थात वैयक्तिक जीवनात फिशर मोकळ्या मनाने ज्यूचा स्वीकार करतो. त्याची आई ज्यू आहे व अर्थात ग्रॅासही ज्यू-रक्ताचाच समजला जातो. त्याबद्दल फिशर म्हणतो, आपण सगळे कारस्थानाचे बळी आहोत. अभिमान व सकोच यांच्या द्वद्वात गुरफटलेला ग्रॅास म्हणतो की, त्याने नाझी वाङ्मयाच्या दुकानाना भेट देण्यासाठी फिशरचे सारथ्य केले आहे. त्याबरोबर ग्रॅासने फिशरला माशांच्या शिकारीसाठी मेक्सिकोलाही नेले होते. ह्या मौजमजेचा 'सर्व खर्च दुसऱ्याच कोणी तरी केलेला होता. मात्र जेव्हा ग्रॅासने ह्याबाबत वार्ताहराशी चर्चा केली तत्क्षणी तो बॉबीच्या माजी मित्राच्या यादीत दाखल झाला.

सॅन हाऊजे, कॅलिफोर्निया येथील श्रीमती रूथ हॅरिंग व तिचा पती श्री. पीटर बियॉसिस हे दोघेही बुद्धिबळक्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्ती मानल्या जातात. गेल्या अठरा महिन्यात बॉबीने अक्षरशः इतके दिवस त्याच्या आदरातिथ्याचा पाहुणचार घेतला की, शेवटी ह्या जोडप्याने फिशरला हाकलून लावले. हे जोडपे व फिशरचे इतर मित्र ह्यात फरक एवढाच की, बॉबी स्वतः आपल्या मित्राचा रामराम घेत असे; पण येथे मात्र त्यास शेरास सव्वाशेर अशीच वागणूक मिळाली. हॅरिंगला पैशाच्या दृष्टीने फिशरची स्थिती जेवढी लोकाना वाटते तेवढी वाईट वाटत नाही. जेव्हा बॉबीने रूथच्या घराला भेट दिली तेव्हा चित्रपट व खाण्यापिण्यावर खर्च करण्यासाठी चिक्कार पैसे बॉबीकडे होते. कदाचित त्याने जिंकलेल्या बक्षिसाच्या रकमा त्याने गुतविलेल्या असाव्यात किंवा अजूनही त्याला त्याने लिहिलेल्या पुस्तकांचे मानधन मिळत असावे.

रूथ मान्य करते की, बॉबी अतिशय चमत्कारिक विचार व्यक्त करतो'; परंतु तिरस्काराने ती ह्या बॉबीच्या वागणुकीचा बहुतेक दोष त्याच्या मित्राच्या उत्तेजनास देते की, तिला असे नक्की सांगता येणार नाही की, बॉबीचासुद्धा अशा विचारांवर खरोखरच विश्वास आहे का नाही ? का केवळ लोकाचे कुतूहल कायम रहावे म्हणून धक्कातंत्र म्हणून तो अशा एका टोकाच्या विचारांचा उल्लेख करतो.'

दोघेही जण रूथ व ग्रॉस म्हणतात की, बॉबी सध्या स्वतःला टकलेखन शिकवीत आहे. कारण त्याला दोन पुस्तके प्रसिद्ध करावयाची आहेत. एक बुद्धिबळावर, पण त्याआधी एक प्रचंड ग्रंथ त्याच्या स्वत.च्या राजकीय विचारावर, ज्याचे महत्व त्याला फारच मोलाचे वाटते, हा लिहावयाचा आहे !

त्यामुळे उद्याचा लेखक म्हणून बॉबी हळूहळू सराव करीत आहे. त्याने कित्येक वर्षांत जगाशी साधलेला सुसंवाद म्हणूनच एक १४ पानांची पुस्तिका लिहिली आहे. ह्या पुस्तिकेचे नाव आहे 'पसाडेना तुरुंगात माझी झालेली छळवणूक !' ह्या पुस्तिकेच्या शेवटी फिशरची खरडलेली स्वाक्षरी आहे. ह्या स्वाक्षरीच्या आधी त्याने लिहिले आहे की, ही पुस्तिका रॉबर्ट डी जेम्स् (व्यवसायानुरूप ज्याला रॉबर्ट जे फिशर, जागतिक अजिक्य बुद्धिबळपटू म्हणतात) याने लिहिली व प्रसिद्ध केली. ह्या पुस्तिकेत बॉबीने पोलिस कस्टडीत त्याचा दोन दिवस कसा छळ झाला याची साद्यंत हकीकत दिली आहे. पोलिसाने पळून जाणारा बँकचोर म्हणून चुकीने त्याला पकडले. पसाडेनामधील एका रस्त्याच्या कोपऱ्यावर ही घटना घडली. ही पुस्तिका अतिशय सोप्या भाषेत असून फिशरच्या स्नेही असलेल्या एक बाई ह्या पुस्तिकेची १ डॉलरला एक प्रत याप्रमाणे विक्री करीत असतात व बुद्धिबळजगात ही पुस्तिका तडाखेबंद खपणारी ठरली आहे.

बॉबी आता काही असले तरी ४० वर्षाचा झाला आहे. जरी त्याचे जुने स्नेही म्हणतात की, बॉबीचे डोके पूर्ण ताळ्यावर आहे व व सध्याचे हे एकाकी जीवन बॉबी बहुतेक 'आनदाने व्यतीत करीत आहे. तरी बहुतेक लोकांना मात्र आठवतो तो, 'बुद्धिबळातील प्रतिष्ठा व यश भिरकावून देणारा, एक हरवलेला प्रतिभावंत, एके काळचा अमेरिकन जीवनातील नायक, मनस्वी, अतिशय उद्धट, तरीही आपल्या अद्वितीय खेळाने सपूर्ण जगाला आपली दखल घ्यावी लावणारा थोर कलावत अनभिषित सम्राट !

## प्रकाशझोतापासून दूर

जवळजवळ लहानपणापासूनच बॉबीच्या वैभवशाली बुद्धिबळजीवनास सुरुवात झाली. ह्या तेजस्वी खेळाडूचा जन्म ९ मार्च १९४३ रोजी शिकागो येथे झाला. त्याचे वडील जर्मन असून व्यवसायाने डॉक्टर होते आणि बॉबी दोन वर्षांचा असतानाच त्यांनी घर सोडले. बॉबीची आई ज्यू असून राजकीयदृष्ट्या कार्यरत असून ती डाव्या विचारसरणीची होती. बॉबीच्या वडिलानी घर सोडल्यावर तिने आपले बिऱ्हाड ब्रुकलिनला हलविले व मध्यमवयाची असतानाच डॉक्टर बनण्यासाठी शिक्षण घेण्यास सुरुवात केली.' सध्या ती इंग्लंडमध्ये रहाते. त्याची थोरली बहीण जोन उत्तर कॅलिफोर्नियात रहाते; परंतु ती स्वत.च्या भावाबद्दल एक शब्दही बोलत नाही.

बॉबीच्या ह्या थोरल्या बहिणीचा त्याच्या जीवनाच्या वाटचालीत फार मोठा वाटा आहे. कारण तिनेच बॉबीला त्याच्या सहाव्या वाढदिवसादिवशी बुद्धिबळाचा खेळ भेट म्हणून दिला. वयाच्या १४ व्या वर्षी बॉबीने शाळा सोडली व अमेरिकेचे बुद्धिबळातील अजिक्यपद जिकले. जे त्याने पुढील दहा वर्षे स्वत:कडेच राखले. फक्त मधले एक वर्ष सोडून, ज्या वर्षी त्याला ह्या स्पर्धेत भाग घेण्याचा मनस्वी कंटाळा आला होता आणि मग १९७२ साली रशियन जागतिक अजिक्य बुद्धिबळपटू बोरिस स्पास्कीचा पराभव करून तो पहिला अमेरिकन जागतिक अजिक्य बुद्धिबळपटू झाला. अर्थात् लोकांना त्याचे आश्चर्य वाटले नाही. कारण तोच लोकांचा लोकप्रिय अंदाज होता.

बुद्धिबळाच्या इतिहासातील जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळालेली आणि दोन्ही राजकीय शक्ति विरोधात ठाकल्यामुळे आणखीनच खळबळजनक घटनांनी भरलेला असा तो सामना होता. ह्या सामन्यात परंपरागत बुद्धिबळवर्चस्वाचा बॉबीने एकट्याने पाडाव केला आणि बॉबी फिशर बॉबी फिशरप्रमाणेच वागला.

हट्टी, स्फोटक अतिशय बेअंदाज वागणाऱ्या बॉबी फिशरने आइसलँडमध्ये झालेल्या या स्पर्धेत आपले सर्व कसब पणाला लावले होते. या सामन्यांत सातत्याने फिशर जवळजवळ सगळ्या गोष्टींबद्दल तक्रार करीत राहिला. अगदी सगळ्या गोष्टींबद्दल-टेलिव्हिजन कॅमेरे, बुद्धिबळपटाचा आकार, रशियन डावपेच आणि स्पर्धेचे नियम येथपासून ते विजेत्याच्या नगण्य बक्षिसापर्यंन्त आणि आता सामना होतो की नाही अशा निर्णयक्षणी श्रीमान इंग्लिश बुद्धिबळ आश्रयदाते जेम्स स्लेटर यांनी १५०००० डॉलर्सचा चेक पाठवून बॉबीला खेळण्यास उद्युक्त केले व बुद्धिबळाच्या खेळाला बॉबीने फार मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली. जागतिक बुद्धिबळअजिक्यपदाची बक्षिसाची रक्कम होती आता २,५०००० डॉलर्स !

तरी फिशर काही स्थिरावला नव्हता, तो त्याच्या हॉटेलरूममध्ये रुसून मी खेळणार नाही म्हणून त्याच्या मागण्या वाढवीतच होता. त्याच्या मित्रानी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. बुद्धिबळस्पर्धेच्या सयोजकांनी त्याच्यापुढे हात टेकले. रशियन तर भडकलेलेच होते.

त्या वेळचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन याचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. हेन्री किसिंजर यानी अमेरिकेहून रेकजाविकला फोन केला आणि अमेरिकन सरकारच्या शुभेच्छा व्यक्त केल्या आणि त्याच्याकडून मोठ्या पराक्रमाचा आशावाद व्यक्त केला.

अमेरिकन जनता जी आतापर्यंत केवळ बॉबी म्हणजे एक सनसनाटी खेळाडू एव्हढीच त्याला ओळखत होती ती आता त्याच्यावर प्रेम करू लागली. ह्या दोन महिन्याच्या स्पर्धेच्या काळात बॉबी अक्षरशः 'हिरो' बनला.

आइसलँडहून जागतिक अजिक्यपटू म्हणून परतल्यावर मात्र बॉबी प्रसिद्धीच्या प्रकाशझोतापासून स्वतःहून दूर राहिला. आपल्याला मिळालेल्या यशाचा त्याने सत्कारसमारंभ, मानमरातब यासाठी थोडासुद्धा उपयोग केला नाही. त्याने व्यावसायिक वा इतर बुद्धिबळसामन्यात पुन्हा खेळण्यास नकार दिला आणि हे सर्व सोडून तो हर्बर्ट डब्ल्यू. आर्मस्ट्रांगच्या वर्ल्ड वाईड चर्च ऑफ गॉड ह्या पसाडेना येथील सस्थेच्या सुरक्षित जगात अदृश्य झाला. तत्परतेने त्याने आपल्या बक्षिसांतील ६१००० डॉलर्स चर्चला देऊन टाकले आणि आर्मस्ट्रांगने भविष्य वर्तविल्याप्रमाणे ख्रिस्ताच्या १९७५ मधील अवताराची तो वाट पाहू लागला.

जरी १९७५ साली ख्रिस्ताचा पुनश्च अवतार झाला नव्हता तरी जागतिक अजिक्यपदाची स्पर्धा जवळ आली होती व फिश-

रचा प्रतिस्पर्धी होता नवा उमदा तरुण रशियन खेळाडू अनातोली कार्पोव्ह. हीच वेळ होती फिशरला त्या संपूर्ण एकाकी जीवनातून बाहेर येऊन आपले अजिंक्यपद राखण्याची व लढण्याची; परंतु फिशरने नकार दिला.

पुनश्च एकवार फिशरचे स्पर्धेच्या नियमांबद्दल जागतिक बुद्धिबळ-संघटनेशी (FIDE) भांडण जुंपले. फिशरने अतिशय रागावून (आणि काही म्हणतात अगदी तुच्छतेने) स्पर्धेत भाग न घेता अजिंक्यपदाचा त्याग करण्याचे ठरविले. ह्या जागतिक अजिंक्यपदाच्या अंतिम लढतीसाठी फिलिपाइन्सचे अध्यक्ष फर्डिनंड मार्कोस यांनी ३ दशलक्ष डॉलर्सचे भव्य पारितोषिक जाहीर केले होते. अर्थात फिशरला हे बक्षीससुद्धा खेळायला लावू शकले नाही.

फिशरने माघार घेतली; पण आता तो चर्चकडे परतला नाही. कारण आर्मस्ट्राँगच्या भविष्यवाणीप्रमाणे ख्रिस्ताचा अवतार तर झाला नाहीच; परंतु ह्याबद्दल त्याने साधी क्षमासुद्धा न मागितल्याने फिशर त्याच्यावर जाम भडकला होता.

फिशरला ओळखणाऱ्या त्याच्या जुन्या मित्रांचेच विचार व्यक्त करताना त्याचा माजी मित्र ग्रॉस अंदाज व्यक्त करतो की, 'घटकाभर फिशरची तत्त्वे व हट्टीपणा जरी बाजूस ठेवला तरी फिशर अंतर्यामी व्यावसायिक बुद्धिबळ खेळण्यास घाबरतो व बहुतेक तो यापुढे कधीच व्यावसायिक बुद्धिबळ खेळणार नाही.

तो हरला तर काय होईल? आता त्याला माहीत आहे की, जागतिक बुद्धिबळाच्या इतिहासात त्याचे स्थान अत्युच्चपदीच फक्त राहील व माझा अंदाज तो यालाच घाबरतो की, हरलो तर आपल्या ह्या अमूल्य इभ्रतीस धोका पोहोचेल.

फिशरच्या पसाडेना येथील मध्यस्थामार्फत लिना ग्रमेट ही महिला लोकांच्या निरनिराळ्या व्यावसायिक मागण्या त्याच्या कानांवर घालीत असते. तिच्या म्हणण्याप्रमाणे फिशरच्या मागण्या दरवर्षी वाढत चालल्या असून दिवसेंदिवस त्या अधिकाधिक अव्यवहार्य होत आहेत. याचा अर्थ अर्थातच फिशरचा स्वतःबद्दलचा अभिमान अगदी जुन्या काळातल्याप्रमाणे ठणठणीत निरोगी आहे असाच होतो. ती म्हणते, मी तुम्हाला हे सांगू शकते की, अगदी शेकडो आणि शेकडो हजार डॉलर्सच्या मागण्या बॉबीने सहज धुडकावून दिल्या आहेत. एकच उदाहरण सांगते, 'अदमासे सहा वर्षांपूर्वी आम्ही लासवेगास मधील 'सिझर्स पॅलेस' ह्या हॉटेलशी एका प्रदर्शनीय सामन्यासाठी करार ठरवीत होतो. ह्या प्रदर्शनीय सामन्यात नुसता भाग घेण्यासाठी बॉबीला २,५०००० डॉलर्स मिळणार होते आणि आम्हाला हेही माहीत होते की, लासवेगास व सिझर्स पॅलेस ही दोन्हीही बॉबीला अतिशय प्रिय आहेत. मला वाटले छान! ह्या वेळेस आम्ही नक्कीच यशस्वी होणार. सगळे कसे अगदी जमून आले आहे!! पण छे! अगदी शेवटच्या क्षणी बॉबीचा फोन खणाणला, 'मी १०,००,००० डॉलर्स मिळाल्याशिवाय सामन्यात भाग घेऊ शकणार नाही!'

ग्रमेट म्हणते की, आता ती क्वचितच फिशरकडे मागण्या पाठविते. ती म्हणते, 'फिशर ठासून सांगतो की, येणाऱ्या प्रत्येक पत्रावर बॉबी फिशर, जागतिक बुद्धिबळ-विजेता असा माझा उल्लेख पाहिजे.' ह्यानंतर तिरकस हास्य करून ती म्हणते, हे सोडून वर स्वारी फक्त पत्र फोडून वाचण्यासाठी १००० डॉलर्सची मागणी करते!'

ही ग्रमेटची मुलाखत चालू असतानाच बॉबी फिशरच्या जीवनातील महत्त्वाचे स्थान असलेली एक स्त्री अचानकपणे उपस्थित झाली. अगदी साधी आणि आपल्या पांढऱ्या-पिंगट केसांची आपल्या स्वतःच्या पद्धतीने रचना केलेली ही स्त्री श्रीमती क्लॉर्डीया मोकारोव्ह ही जवळपास पन्नास-पंचावन्नला पोचलेली आहे. ती व तिचा नवरा, जो व्यावसायिक सल्लागार म्हणून काम करतो, दोघांनाही बॉबीबद्दल आपुलकी आहे; परंतु त्यांनीही हताश होऊन फिशरचा नाद सोडून दिला आहे. ह्या बाईची व फिशरची पहिली भेट चर्च ऑफ गॉड ह्या संस्थेतच झाली. तेव्हापासून आजतागायत त्या बॉबीला सर्व प्रकारची मदत करीत आलेल्या आहेत.

त्या म्हणतात, 'मी फक्त त्याच्यातर्फे उत्तरे देण्याची कामगिरी करीत असते. मी असे म्हणत नाही की, त्याच्या सगळ्या उत्तरांना माझाही होकार आहे.

सगळे उत्साही आणि पुढाकार घेणारे वार्ताहर मला भेटतात आणि असे वागतात की, जणू फिशरशी बातचीत करण्याचे सर्वाधिकार कोणी तरी त्यांना बहाल केले आहेत. आपल्या बोलण्यावर जोर देऊन बोटे उंचावून त्या पुढे म्हणाल्या, 'मी तुम्हाला एकच गोष्ट सांगते!' अतिशय तिरस्कारयुक्त चेहरा करून रागावून त्या म्हणाल्या, 'मला असे अनेक लोक माहिती आहेत, चित्रपटअभिनेते व हॉलीवुडमधील लोक जे मुलाखतीसाठी काय वाट्टेल ते देतील; परंतु फिशरसारख्या एखाद्या व्यक्तीला त्याचे काय? ह्या मुलाखतीमुळे तुम्हालाच शाबासकी मिळणार! ह्यात आमच्या बॉबीसाठी काय आहे?'

श्रीमती मोकारोव्ह ह्या बॉबीला येणारी सर्व पत्रे वाचतात व त्यांना विश्वास वाटतो की, ही पत्रे फिशरला वाचावीशी वाटतील तेवढीच पत्रे त्या फिशरच्या हवाली करतात. जेव्हा त्यांना विचारण्यात आले की, बाहेरच्या लोकांना फिशरची गाठभेट घ्यावयाची असेल तर त्यांनी काय करावे? ह्या प्रश्नाबरोबर त्यांच्या चेहऱ्यावरील मार्दव अकस्मात मावळले व त्या शांतपणे म्हणाल्या, 'मी तुम्हाला एवढेच सांगते! तुम्ही फिशरला मागणी करा व कदाचित फिशर तुम्हाला प्रतिमागणी करेल! आता किती?' श्रीमती मोकारोव्ह खुर्चीत पुढे रेलल्या व तोंड घट्ट मिटून हास्य करीत त्या म्हणाल्या, 'आता तुम्ही बोलायला लागलात! तर तुम्हाला खरंच फिशरला भेटावयाचे आहे! आता तुम्ही असं करा, तुमच्या वर्तमानपत्रांतील सर्वांत वरच्या माणसाकडे जा व त्याला सांगा की, तुम्हाला जर खरोखरच बॉबीची खास मुलाखत पाहिजे असेल तर तशाच भरघोस रकमेचे फिशरला आवाहन करा, साधारण १ दशलक्ष डॉलर्स आणि मग बॉबी तुम्हाला कळवेल!'

# रंगभूमी

## नाट्यसंपदा + नाट्यसुमन सहयोगनिर्मिती

डॉ. वि. भा. देशपांडे

'निष्पाप' हे दिलीप परदेशींचे नवे नाटक. नाटकाच्या नावावरून नाही तरी विषय, आशय आणि व्यक्तिरेखन यांच्या ढाच्यावरून हे नाटक शेक्सपिअरच्या ॲथेल्लो नाटकावरून घेतले आहे हे सहज ध्यानात येते. शेक्सपिअरच्या ज्या काही महत्त्वपूर्ण नाटकांचा मोह मराठी नाटककाराला पडलेला आहे त्यामध्ये ॲथेल्लो हे एक महत्त्वाचे नाटक. अगदी महादेवशास्त्री कोल्हटकरांपासून आजतागायत या नाटकाची भाषांतरे, रूपांतरे होत राहिली. वि. वा. शिरवाडकरांनी केलेले भाषांतर सर्वश्रुत आहेच; पण ॲथेल्लोमधल्या काही व्यक्तिरेखांना मराठी पेहेरावात आणावे असाही प्रयत्न झाला. त्यामध्ये कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांनी 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' या नाटकात केशवशास्त्र्याच्या निमित्ताने इयागो आणला. वसंत कानेटकरांनी 'गगनभेदी' मध्ये खुद्द ॲथेल्लो ही व्यक्तिरेखा नाटकाच्या काही भागासाठी वापरली. अशाच प्रकारचा मोह दिलीप परदेशींनाही झाला.

परदेशींनी 'निष्पाप'ची रचना करताना सर्वार्थाने ॲथेल्लोचा आराखडा डोळ्यांसमोर ठेवला. ॲथेल्लो, इयागो आणि डेस्डिमोना ह्या ती प्रमुख व्यक्तिरेखा मेजर विश्वनाथ; चिंतामणी आणि गौरी यांच्या रूपाने या नाटकात आल्या. संशयाचे सूत्र केन्द्रीभूत ठेवले, ते तर या नाटकाचा प्राण आहे. संशय ही मानवजातीतील सहजप्रवृत्ती आहे. या संशयातून व्यक्तीचे किंवा कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त होते हे अनेकदा आपण पाहतो, अनुभवतोही; पण हे संशयाचे सूत्र वापरताना जी तार्किक संगती आणि अपरिहार्यता अपेक्षित असते ती 'निष्पाप'च्या संदर्भात दूरान्वयाने आढळते. ॲथेल्लोमध्ये कुरूपता, विषम जातिविवाह, नियतीची अटळता आणि संशयाचे वीष पेरण्याची निर्घृणवृत्ती यांचे खोलवर दर्शन आहे, तशी सखोलता या नाटकाला लेखनाच्या संदर्भात प्राप्त झालेली नाही. मेजर विश्वनाथचे कुरूपपण, बेढबपण, त्याच्या आणि गौरीच्या वयातील अंतर, गौरीचे लोभनीय सौंदर्य, चिंतामणीची विषारी वृत्ती याचा वापर परदेशी करतात; परंतु हे सारे व्यक्त होण्यासाठी जी प्रसंगनिर्मिती करतात ती ढोबळ आणि बटबटीत वाटते. मेजर विश्वनाथची गुलाबाच्या फुलांची शेती, त्या विषयात प्रयोग करू पाहणारा आणि नोकरीची गरज असणारा, गौरीचा पूर्वप्रियकर शेखर नेमक्या इतक्या आडगावी नोकरीला येणे, विश्वनाथचा बालपणीचा मित्र चिंतामणी त्याच ठिकाणी येणे आणि काही घडणे वगैरे हे सारे संभाव्यतेच्या स्तरावर मान्य केले तरी पुरेसे सतर्क वाटत नाही. त्यातही कक्कड आणि गौरीचे वडील या व्यक्तिरेखांची निर्मिती आणि त्यांच्या संदर्भातील प्रसंगांची निर्मिती ही तर केवळ उथळ नाही तर हास्यास्पद वाटावी इतकी सुमार आहे. तेव्हा या नाटकाची तुलना एका मर्यादेपर्यंतच ॲथेल्लोशी करावी. कारण पुढची तुलना नाटककाराच्या दृष्टीने फारच त्रासाची आहे. म्हणूनच हे नाटक दर्शनी एका कुरूप असलेल्या पण अंतरी प्रेमळ असणाऱ्या माणसाला संशयाचा डंख झाला तर त्याचा विजोड वाटणारा, पण 'सौंदर्ययुक्त' संसार कसा होरपळून टाकतो एवढ्याच अर्थाने पहायचे. त्यातले प्रसंगांचे, संवादभाषेचे, व्यक्तिरेखांचे भडकपण गृहीत धरून !

नाट्यलेखनातले गुणदोष गृहीत धरून सदाशिव अमरापूरकर यांनी या नाटकाचे केलेले दिग्दर्शन आणि उभे केलेले प्रयोगरूप खूपच सुसह्य आहे. त्यांनी कलवंतांकडून अतिशय संयत रीतीने अभिनय करवून घेतला आहे असे जाणवते. विशेषत: विश्व



'निष्पाप' नाटकात अनिल क्षीरसागर–सविता प्रभुणे

नाथ, गौरी, चिंतामणी ह्या तीन व्यक्तिरेखांना दिलेल्या रंगमचीय हालचाली,त्याच्या केलेल्या विरचना ह्या नाट्यविषयाला, प्रसगाला गती देणाऱ्या, परिणाम वाढवणाऱ्या होत्या. तरीही दिग्दर्शक म्हणून त्यांनी संहितेचे संपादन आहे, त्यापेक्षाही अधिक काटेकोरपणे करणे आवश्यक होते. विशेषत: गुलाब फुलाचे किंवा एकूणच विविध फुलांचे पुनरोक्त संदर्भ, त्यातून 'निष्पाप' शब्दाकडे, त्याच्या अर्थाकडे होणारे अंगुलिदर्शन प्रमाणाबाहेर जाणार नाही याची काळजी घ्यायला हवी होती.

या नाटकाचे प्रयोगदर्शन सुसह्य करण्यामध्ये जसा दिग्दर्शक म्हणून अमरापूरकरांचा महत्त्वाचा वाटा आहे, तसाच या प्रयोगातील कलावंतांचाही आहे. या नाटकातील कलावंतांच्या संदर्भात एक गोष्ट आवर्जून सांगण्यासारखी आहे. ती म्हणजे हे सारेजण ( चदू पारखीचा अपवाद वगळता ) नव्याने रंगभूमीवर आले आहेत. त्यातही आणखी तपशील सांगायचा झाला तर प्रभाकर पणशीकर आणि नाट्यसुमन सस्थेच्या भावनाबाई यांनी त्यांच्या सस्थेच्या वतीने काही महिन्यांपूर्वी नवीन कलावतांसाठी जाहिरात देऊन त्यांची रीतसर चाचणी घेतली. त्यातून जे काही कलावंत हाताशी लागले त्यातले काही या नाटकासाठी घेतले. नाट्यसंपदा आणि नाट्यसुमन या दोन संस्थाच्या सहयोगाने हा उपक्रम आणि हा प्रयोग उभा राहिला, ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्याचबरोबर काही नवे कलावंत हाताशी लागले ही त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट आहे !

### नवी सतेज नायिका

अशा या नव्या कलावंतांमध्ये सर्वांत लक्षवेधी ठरले ते म्हणजे सविता प्रभुणे आणि अनिल क्षीरसागर. सविता प्रभुणे ही मूळची वाईची. तिने तीन वर्षे दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यप्रशालेत प्रशिक्षण घेतले आहे. ते शिक्षण पूर्ण करून सहा महिन्यांपूर्वी ती पुण्या–मुंबईत भूमिकांचा शोध घेऊ लागली. त्या शोधात असतानाच तिला पणशीकरांनी 'महाराणी पद्मिनी' या नाटकाच्या पुन्हा एकदा उभ्या केलेल्या पद्मिनीचे काम दिले. ती भूमिका तिने अतिशय मन:पूर्वक केली· या नाटकाच्या निमित्ताने ती मराठी प्रेक्षकासमोर प्रथमच आली; पण नाही म्हटले तरी ते नाटक आणि भूमिका एकदा होऊन गेलेली होती. 'निष्पाप'मधल्या गौरीच्या निमित्ताने नव्या वेगळचा भूमिकेत ती रंगमचावर आली. तिचा अभिनय पाहताना तिचे नवखेपण कोठेच जाणवत नव्हते इतके तिने समरसून काम केले. तिला रंगमंचीय आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे. ती शारीर उचीने मध्यम असली तरी गौरवर्णाने आणि भावपूर्ण चेहऱ्यामुळे ती आपल्याकडे लक्ष वेधून घेते. केवळ आकर्षक व्यक्तिमत्त्व एवढेच तिचे रंगमंचीय भाडवल किंवा जमेची बाजू नाही तर तिला भूमिकेतील नाट्यगुणांची समज चांगली आहे. ती दिल्लीच्या नाट्यशाळेत जे काही नाट्यतंत्र शिकली असेल त्याचा वापर तिने कोणताही बडेजाव न मिरवता आपल्या भूमिकेच्या दर्शनातून अभिव्यक्त केलेला आहे. फक्त एकच गोष्ट आहे की, तिचा आवाज काहीसा सानुनासिक आहे. क्वचित तो घोगरटपणाकडेही जातो. आवाजाच्या या गुणधर्माची एक मर्यादा म्हणजे त्या आवाजात नितळपणा, तसेच आवाजातली फिरत कमी असते. यावर तिने काही मार्ग काढणे आवश्यक आहे. हे सांगणे एवढ्यासाठीच की तिच्या निमित्ताने एक नवी उत्फुल्ल, सतेज, प्रशिक्षित, सतेज नायिका मराठी व्यावसायिक नाटकाला लाभलेली आहे. असाच आणखी एक चांगला नट लाभला तो म्हणजे अनिल क्षीरसागर. हा नगरचा. त्याला घरात वडलांकडून नाट्यगुणांचा वारसा जाणतेपणाने मिळालेला आहे. त्याला असलेली देहयष्टी, भरदार आवाज आणि अभिनयाची जाण या बळांवर त्याने मेजर विश्वनाथची भूमिका स्मरणीय अशी केली. जशा सविताने विविध प्रसंगातल्या भावछटा परिणामकारक रीतीने व्यक्त केल्या तशाच अनिलनेही व्यक्त केल्या. ह्या दोघांच्या बरोबरीने लक्षात राहिला तो चंदू पारखी. हा अनुभवी कलावत आहे. कमलाकर सारंगाच्या अनेक नाटकांतून आपण त्याला पाहिलेला आहे; पण एखाद्या कलावंताच्या साऱ्या अनुकूल–प्रतिकूल गोष्टी एकत्रित होऊन भूमिका मिळावी आणि त्याचे सोने करावे तसे चंदूचे 'चिंतामणी'च्या भूमिकेत झाले आहे. याव्यतिरिक्त राजन पाटील, शुभांगी, सुनील दिघे, शाम तेंडोलकर, प्रमोदकुमार जोशी हे कलावंत होते. त्यातल्या राजन पाटीलला कलावंत म्हणून चांगले व्यक्तिमत्त्व आहे; पण त्याचा प्रभाव या नाटकात अपेक्षेइतका पडला नाही. त्याला आणखी एखादी सधी मिळेल तेव्हा त्या गुणांचा अदाज बांधता येईल. यातले बहुताश जण नवे असल्याने त्यांच्याकडून अधिक अपेक्षा आहेत !

या नाट्यप्रयोगाच्या उभारणीत पांडुरंग कोठारे यांचे नेपथ्य आणि अनंत अमेंबल यांचे पार्श्वसगीत याचा वाटा लक्षणीय स्वरूपाचा आहे. कोठारे यानी दाखवलेले घर, मागचे डोंगर आदि भाग नाट्यविषयाला पूरक असाच होता; पण दिग्दर्शकाने एक–दोन गोष्टींकडे अधिक जाणतेपणाने लक्ष द्यायला हवे, ते म्हणजे पाऊस आणि वादळ यांचे दृश्यरूप कृत्रिम वाटता कामा नये सद्य:स्थितीत ते फारच त्रासदायक वाटते. या गोष्टी दुरुस्तीतल्या आहेत.

नाट्यसंपदा आणि नाट्यसुमन यांच्या सहयोगाने घडलेला हा नवकलावंतांचा 'प्रयोग' निश्चितच पाहण्याजोगा आहे ! ❑

---

## अभिनंदन

६४ व्या नाट्यसंमेलनाच्या नियोजित अध्यक्षा श्रीमती ज्योत्स्ना भोळे यांची अविरोध निवड झाल्याबद्दल मुंबई आणि पुणे येथील नाट्यपरिषदेने त्याचे भव्य सत्कार नुकतेच केले. संमेलन ४, ५, ६, फेब्रुवारी १९८४ ला पणजी येथे आहे.

❑

श्री. मामा पेंडसे याना तीन वर्षांपूर्वी ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जो सत्कार झाला, त्यातून जो निधी जमा झाला, त्या निधीतून यदापासून मामा पेंडसे पुरस्कृत आणि केशवराव दाते स्मरणार्थ कलावंताचे सन्मान देण्यास आरंभ झाला. यंदा हे सन्मान गायकनट भार्गवराव आचरेकर यांना अडीच हजार रुपये आणि नाना पाटेकरला सुवर्णपदक देऊन करण्यात आले आहेत.

❑

यंदाच्या राज्य नाट्यस्पर्धेच्या पहिल्या फेरीत पुणे केंद्रातून दलित रंगभूमी या सस्थेचे भि. शि. शिंदे लिखित 'पालवी' नाटक अंतिम फेरीसाठी निवडले गेले. ❑

# नाट्यपंढरी



## □ मी करतो शारदा

'स्वदेशहितचिंतक नाटकमंडळी 'चा मुक्काम पंढरपूरला होता. शारदा हा त्यांचा पेटंट खेळ. 'किर्लोस्कर संगीत मंडळी' पेक्षाही त्यांचा शारदेचा प्रयोग सफाईदार होत असे. एका शनिवारी शारदेचा प्रयोग जाहीर केला होता. गावातून जाहिरातीचा गाडा, ताशे-वाजंत्र्यासह फिरत होता. गुरुवारपासून तिकिटविक्री सुरू झाली होती; पण शारदेचे काम करणारा कृष्णा देवळी तापाने फणफणला होता. ताप उतरण्याचे चिन्ह दिसेना. खेळ बदलावा असा विचार कंपनीचे मालक जनुभाऊ निमकर यांनी मांडला; पण मॅनेजर म्हैसकर म्हणाले, 'तिकीटविक्री' झाली आहे; आता खेळ बदलून कसे चालेल? जनुभाऊ गोंधळात पडले. त्यांचा अक्षरशः हॅम्लेट झाला होता म्हणाना (To be or not To be) तेवढ्यात नऊ-दहा वर्षांचा केशव पुढे झाला. 'जनुमामा, मी करतो शारदा!' 'अरे वेड्या, तुला कसे इतके मोठे काम झेपणार? दोन दिवसात तुझी नक्कल कशी पाठ होणार? गाणी कशी बसणार? शारदेचे काम म्हणजे चेष्टा आहे का? जा पळ!' इति जनुभाऊ. तरीही केशव तिथेच ठाम उभा राहिला. 'घ्या म्हणून माझी नक्कल. घ्या म्हणून माझी गाणी.' असे म्हणून त्याने चोख पाठ असलेली शारदेची नक्कल खाडखाड म्हणण्यास सुरुवात केली. तीसुद्धा भूमिकेच्या पदांसह.

जनुभाऊ आश्चर्यचकित झाले; पण तरीही केशव ही धडाडी स्टेजवर दाखवील की नाही याची त्यांना मनातून शंका वाटत होती; पण त्यांनी केशवला तालीम द्यायला सुरुवात केली नि तिकीटविक्रीही चालू ठेवली. शनिवार उजाडला. थिएटर गच्च भरले होते. केशव शारदा म्हणून रंगला. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे पडद्याची पूजा झाली. तिसरी घंटा झाली. धूप दरवळला. नांदीचे सूर सुरू झाले नि जनुभाऊंच्या पाया पडून तो आपल्या प्रवेशात रंगभूमीवर आला. ही नवी शारदा लोकांना कशी काय रुचते, हे पहात जनुभाऊ स्तब्ध उभे होते; पण केशवने सुरुवातीपासूनच अशी बाजी मारली की प्रेक्षक बेहद्द खूष! त्याने 'मूर्तिमंत भीति उभी' हे पद असे म्हटले की प्रेक्षकांचे देहभान हरपले. हे पद संपते न संपते तो वन्समोअर ठेवलेला! केशवने त्या दिवशी नुसती शारदा उभी केली नाही तर तो कायावाचामने शारदाच झाला होता. त्या दिवसापासून केशव 'स्वदेश हितचिंतक 'ची रंगशारदाच ठरला. तो उजळून निघाला कौतुकाच्या 'शारदीय चंद्रकलेत' तो न्हाऊन निघाला! मातेची पुण्याई, जनुभाऊंचे आशीर्वाद नि पंढरीच्या पांडुरंगाची कृपा!

रसिकहो, हा केशव, हा केशव म्हणजेच पुढे आपल्या तडफदार गान-अभिनयाने कीर्तिशिखर गाठणारे संगीतसूर्य केशवराव भोसले! 'ललितकलादर्श' नाटक मंडळीचे संस्थापक, मालक नि चालक!

## □ पगडी नि जिरेटोप

आज मराठी रंगभूमी समृद्ध आहे नाटकाला लागणाऱ्या साऱ्या सुविधा उपलब्ध आहेत. रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य या साऱ्याच गोष्टीत बहुमोल सुधारणा झाल्या आहेत; पण एक काळ असा होता की, पडदे निविंगसाठी पातळे वापरली जात होती. मेकपसाठी सफेदा नि हिंगूळ, पिवडी वापरली जात होती; पण परदेशात मेकपसाठी 'ग्रीनपेंट्स' वापरतात असे भागवतांच्या वाचनात आले. नटश्रेष्ठ गणपतराव भागवत हे रंगभूमीविषयक सर्वच गोष्टींचे थोर अभ्यासक होते. मग ती शेक्सपिअरची नाटके असोत, नाही तर नाट्यमंचविषयक साहित्य असो! ते सदैव अशाच विषयाच्या वाचन-चिंतनात गर्क असत. त्यांनी ते इंग्रजी मासिकातले कात्रण अप्पा टिपणिसांना दाखविले. अप्पांनी मुंबईतल्या एका इंग्लिश कंपनीतून ते रंग विकत आणले. मग अप्पांनी आपल्या कल्पनेप्रमाणे, तसे व्हॅसलिनमधील रंग तयार केले. मेकपच्या आवश्यकतेनुसार त्याची प्रतवारी करून, निरनिराळ्या शेडस्ना निरनिराळे नंबर दिले. आपल्याकडे मेकपसाठी तसे रंग प्रथम उपलब्ध करून देण्याचे श्रेय भागवत नि अप्पा यांच्याच कल्पकतेला आहे. यातूनच मग पुढे रंगभूषेचे तंत्र विकसित होत गेले.

रसिकहो, हे अप्पा टिपणीस-म्हणजेच यशवंत नारायण टिपणीस. महाराष्ट्र नाटक मंडळीचे एक मालक-नट नि नाटककार! अप्पा हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व होते. त्यांना नाट्यविषयक सर्वच क्षेत्रांत गती होती.

नाटकात वास्तववादी नेपथ्य अप्पांनीच आधी उभे केले. पर्वती, शनिवारवाडा, त्यातला गणेशमहाल, ओंकारेश्वर इत्यादी दृश्ये त्यांनी हुबेहुब उभी केली. (सवाई माधवराव यांचा मृत्यू आणि भाऊबंदकी या नाटकांसाठी) काकासाहेब खाडिलकरांच्या विनंतीवरून मानापमान नाटकातला तंबूचा सीन (की जो आजतागायत लोकप्रिय आहे) अप्पांनीच उभारून दिला होता.

आज शिवाजी-संभाजींच्या जिरेटोपांची, पेशवाई पगड्यांची अपूर्वाई वाटत नाही. कुठल्याही नाट्यसंसारात (ड्रेपरीच्या दुकानात) सहज भाड्याने मिळतात; पण आज रंगभूमीवर दिसणारा (एस्टाब्लिश झालेला) जिरेटोप प्रथम अप्पांनीच तयार केला आहे. सुरुवातीला तर ते हाताने बांधीत असत. मग पुढे त्याचा साचा (Mould) तयार झाला. सुरवारी, ढोपऱ्या, पेशवाई, मराठेशाही, रजपुती अंगरखे त्यांनीच स्वतः कापून देऊन शिवून घेतले. रामशास्त्र्यांचे पागोटेही त्यांचेच. नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या 'बहुरूपी 'त अप्पांवरील निरतिशय प्रेमाने अशा किती तरी नवलाईच्या गोष्टींची नोंद मनोभावे केली आहे.

पगडीवरून सहज आठवण झाली. 'भाऊबंदकी' नाटकात नटवर्य त्र्यंबकराव प्रधान रामशास्त्र्यांची भूमिका करीत. त्यांची पगडी लाल रंगाची होती. बोलण्याची ढब थोडीशी लोकमान्यांसारखीच ठेवीत. सोंगही टिळकांसारखेच दिसे. मग काय विचारता, साहजिकच नाटकावर बंदी आली. मग तात्यासाहेब केळकर आदी सुज्ञांच्या सूचनेवरून पगडी बदलली. पांढरी घातली नि गंमत अशी की पगडी बदलताच (फिरवताच प्रयोगाला परवानगी मिळाली!

वा. रं. ढवळे

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


# मिरज

एके काळी तिथल्या नैसर्गिक चांगल्या हवेमुळे ' मेडिकल सेंटर ' म्हणून हे गाव माहीत होतं. आज ' अरब सेंटर ' म्हणून ते बदनाम झालं आहे. मिरजेतल्या अरबांच्या चाळचांमुळं तिथलं सारं जनजीवनच भ्रष्ट झालं आहे.

**दुबई ते मिरज असं एक फार मोठं दुष्टचक्र तयार झालं आहे आणि त्यात बळी दिल्या जाताहेत अल्पवयीन मुली. हे थांबवण्याचं धाडस कोणाच्यातच नाही.**

कारण प्रत्येकाचेच हात त्यात अडकले आहेत.

मिरजेच्या आसपासच्या सांगली–कोल्हापूर यासारख्या गावांनी या अरबी रोगाचा धोका वेळीच ओळखला आहे. अरबांचा शिरकाव होऊ नये म्हणून ' अरब हटाव 'च्या पाटचा तिथे लागल्या आहेत.

इचलकरंजीतही गुंडगिरी–असंतोष वाढतो आहे.

या भ्रष्टाचाराविरुद्ध, या गुंडगिरीविरुद्ध आता धडाडीने आवाज उठवला आहे ' हिंदू एकता 'ने.

हिंदू एकताच्या जोडीला काही इतर संघटनांचे कार्यकर्ते उभे राहिले आहेत.

चळवळ सुरूच आहे. या कार्यकर्त्यांना सर्व थरातील सर्वसामान्य लोकांची सहानुभूती वाढत्या प्रमाणात मिळत आहे.

**या भ्रष्टाचार–गुंडगिरीचा आणि त्याविरुद्धच्या आंदोलनाचा सविस्तर वृत्तांत देणारी वार्तापत्रे ७ जानेवारी ' माणूस ' अंकापासून प्रसिद्ध होणार....**

---

## मिरज–इचलकरंजी वार्तापत्रे

---